अनमोल

CC-0. In Public Domain. Digitized by eGangotri

।। गरुड पुराण ।।

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

अनमोल प्रकाशन, पुणे २.

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

॥ अथ गरुडपुराणप्रारंभः ॥

अनमोल प्रकाशन, पुणे - २

मूल्य : पन्नास रुपये

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ जय सद्गुरु कर्पूरगौरा ॥
अनन्यभक्तांच्या माहेरा ॥ चतुराननादि सुरवरां ॥ स्मरहरा अगम्य तूं ॥ १ ॥
भक्तवत्सला भक्तपाळका ॥ नमन माझें गणनायका ॥ आदित्या आणि कंसां-
तका ॥ देवी अंबिका नमस्कारूं ॥ २ ॥ चतुष्टय वाचांची स्वामिणी ॥ जी राहिली
मातृकालक्षणीं ॥ तिये ब्रह्मकुमारीलागूनी ॥ अंतःकरणीं ध्याइंजे ॥ ३ ॥ सकळ
देवतांसह शिवासी ॥ पुनः नमस्कारोनि आज्ञेसी ॥ मागोनियां प्रेतकल्पासी ॥
प्राकृतासी आरंभितों ॥ ४ ॥ नैमिषारण्यीं सूतमुनी ॥ पुराण सांगे अनुदिनीं ॥
तो कोणे एके दिनीं ॥ व्यासासनीं बैसला ॥ ५ ॥ तयातें ऋषि शौनकादिक ॥
प्रश्न करिते झाले सम्यक ॥ यम सर्वांचा जो अंतक ॥ यातना अनेक करीतसे ॥ ६ ॥
तयाच्या लोकाचा विस्तार ॥ आणि जीवांचा आचार ॥ देह त्यागिल्या
कर्मप्रकार ॥ कैसा नरजीव भोगीतसे ॥ ७ ॥ हें आद्यंत निरूपण ॥ पुराणसंज्ञा

---

१ अक्षरसमूहांत. २ सरस्वती. ३ प्रतिदिवशीं. ४ नाशकर्ता. ५ प्रारंभापासून शेवटपर्यंत.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

संक्षेपान ॥ आम्हां सर्वांसी कथन ॥ एकीकडोन पैं कीजे ॥ ८ ॥ ऐसा ऋषींचा प्रश्नार्थ ॥ ऐकोनि सूत हर्षयुक्त ॥ दृढ धर्मवृक्ष भगवंत ॥ तयासी नेमस्त स्तवीतसे ॥ ९ ॥ म्हणे वृक्षरूपी तूं भगवान ॥ वेद तुझे स्कंध जाण ॥ पुराणें त्या शाखा गहन ॥ यज्ञ सदक्षिण तीं कुसुमें ॥ १० ॥ ऐसा वाढला जो वृक्ष ॥ तयाचें फळ असे मोक्ष ॥ वृक्षरूपी सर्वसाक्ष ॥ जो प्रत्यक्ष सर्वां घटीं ॥ ११ ॥ तो सर्वांचें करी कल्याण ॥ म्हणोनि नमस्कारिला भगवान ॥ मग म्हणे ऋषींलागोन ॥ पूर्वी सुपर्ण गरुड जो कां ॥ १२ ॥ तो विष्णूप्रती पुसता झाला ॥ तुझिया प्रसादें गोविंदा मला ॥ अव्याहतगति सर्वलोकाला ॥ असे विश्वपाळा मजलागीं ॥ १३ ॥ सर्व लोकांच्या समस्त रचना ॥ मीं विलोकिल्या मधुसूदना ॥ परी याम्यपुरीची रचना ॥ माझ्या नयनां न दिसेचि ॥ १४ ॥ जेथें पीडती पापीजन ॥ तेथें नाहीं माझें गमन ॥ या हेतूनें तुम्हांलागून ॥ प्रभो प्रश्न करीतसें ॥ १५ ॥ भूर्लोकीं भरतखंड

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

१ क्रमानें. २ धर्मरूप वृक्ष. ३ दक्षिणायुक्त. ४ विष्णु. ५ सर्वत्र मार्ग मोकळा. ६ भूमीवर.

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

विरल्यात ॥ लवणसमुद्रें[1] जें वेष्टित ॥ चतुर्वर्णसमायुक्त[2] ॥ जन्म मानुषांत होतसे ॥ १६ ॥ त्याही योनीमाझारी ॥ सुकृती[3] पापी नरनारी ॥ मागें पुढें देहधारी ॥ कर्मदोरी धरूनि येती ॥१७॥ पाप पुण्य होतां समान ॥ अप्राप्य मनुष्यदेह जाण ॥ तो पावोनि ब्रह्मज्ञान ॥ नर अज्ञान न पावती ॥ १८ ॥ अथवा तुझी नैष्ठिकभक्ती[4] ॥ मूढजन न करिती ॥ आयुष्य सरतां देहांतीं ॥ लोक तयांप्रती कोणता ॥ १९ ॥ ते मेल्यावर प्राणी समस्त ॥ यानंतर करावें काय कृत्य ॥ अधिकार कोणासी असत ॥ क्रिया समस्त करावया ॥ २० ॥ आणि देश काल द्रव्यसाहित्य ॥ कैसें तयाचें नित्यकृत्य ॥ महारोगें जाहल्या मृत ॥ स्वदेशस्थ परदेशीं जे कां ॥ २१ ॥ मरण जे पावले जन ॥ त्यांच्या मृतदिवसापासोन ॥ वर्षपर्यंत कर्म संपूर्ण ॥ अनुक्रमान सांगिजे ॥ २२ ॥ अगा हे रमानाथा ॥ कृपाहस्त माझिया माथां ॥ ठेवोनि येथें देतां प्रेता ॥ कैसें तत्त्वतां स्वर्गीं पावतसे ॥ २३ ॥ तें माधवा निरूपण ॥ मज

---

१ क्षारसमुद्रानें. २ ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र. ३ पुण्यवान्. ४ एकनिष्ठ भक्ती.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

कीजे सकल आपण ॥ ऐसा तार्क्ष्यप्रश्न[1] भगवान ॥ ऐकोनि जनार्दन बोलिला ॥ २४ ॥
वैनतेया भाग्यवंता ॥ ऐकें सर्व यथार्थता ॥ जें त्वां पुसिलें कश्यपसुता ॥ तें तत्त्वतां
तुज कथितों ॥ २५ ॥ श्राद्धांचे भेद तीन असती ॥ नंव आणि नवमिश्र[2] म्हणती[3] ॥
तिसरें पुराण निश्चिती ॥ श्राद्धपद्धती ऐशी त्रिधा ॥ २६ ॥ मृतदिवसापासून ॥
दहा दिवसांपर्यंत जाण ॥ नवश्राद्ध नामाभिधान ॥ ऋषि सज्ञान बोलती ॥ २७ ॥
एकादश दिवसापासोन ॥ होई यावद्वर्षप्रमाण ॥ तीं श्राद्धें नवमिश्र संपूर्ण ॥ श्राद्धें
पुराण यानंतर ॥ २८ ॥ चतुर्दश लोकांमाझारी ॥ भूर्लोक श्रेष्ठ असे भारी ॥ त्याही-
माजी पन्नगारी ॥ जंबुद्वीपधात्री[4] अति उत्तम ॥ २९ ॥ त्या सप्तद्वीपांआंत ॥ भरत-
खंड जें अतिविख्यात ॥ त्याहीमाजीं वर्ष भरत ॥ त्रिलोकविख्यात असे पैं ॥ ३० ॥
त्यांत जें भागीरथीतीर ॥ सर्व दोषांसी जाळणार ॥ यातुल्य अन्य लोक समग्र ॥
न होती खगेंद्रा कल्पांतीं ॥ ३१ ॥ ती भागीरथी मत्स्वरूप ॥ ब्रह्मांडही जाण तें

१ गरुडाचा प्रश्न. २ याचा अर्थ २७, २८ ओव्यांत स्पष्ट केला आहे. ३ भूमि. ४ गरुडा.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अल्प ॥ तेथें सर्व जीवांचा जल्प ॥ शास्त्ररूप पैं असे ॥ ३२ ॥ जे शास्त्राप्रमाणें आचार करिती ॥ ते मेले अथवा जिवंत असती ॥ परी तयांसी दुर्गती[1] ॥ न घडे निश्चितीं कधींही ॥ ३३ ॥ जे टाकोनि शास्त्रमार्गातें ॥ वर्तताती कामचारातें[2] ॥ ते धरोनि पापमार्गातें ॥ दुर्गतीतें पावती ॥ ३४ ॥ जरी उपजेल पश्चात्ताप ॥ तरी ब्राह्मणां प्रार्थूनि अमूप ॥ प्रायश्चित्तें होती निष्पाप[3] ॥ किल्बिषटोप[4] त्यागोनियां ॥ ३५ ॥ आणि जे पाप आचरती ॥ जयांसी नसे ज्ञान भक्ती ॥ प्रायश्चित्त नाचरतां मरती ॥ नरक भोगिती ते दारुण ॥ ३६ ॥ निरय भोगिल्यावरी जन्म पावती ॥ पूर्वपापांचीं चिन्हें उमटती ॥ त्यांची निशाणी तुजप्रती ॥ यथापद्धती निरूपितों ॥ ३७ ॥ ज्यानें पूर्वीं मारिला ब्राह्मण ॥ अथवा केला अपमान ॥ तो क्षयरोग पावे दारुण ॥ सुरापान करी जो ॥ ३८ ॥ तयाचे दंत कृष्ण[5] होती ॥ सोनें चोरितां नखें कुजती[6] ॥ जो भोगी गुरुपत्नीप्रती ॥ दुश्चर्मगती[7] त्या प्राप्त ॥ ३९ ॥

१. दुःख. २ यथेच्छ आचरण. ३ पापरहित. ४ पापाचें आवरण. ५ काळे. ६ गलितकुष्ठादि.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

आपण अथवा आणीक कोणी ॥ वृत्ति[1] दिधली ब्राह्मणालागूनी ॥ हरितां साठी
सहस्र वरुषें प्राणी ॥ कृमियोनि विष्ठेंत पावे ॥ ४० ॥ कोणी एक ब्राह्मणालागून ॥
देईन ऐसें आयकवून ॥ जो न देई नर अज्ञान ॥ कुंभीपाक स्थान तयाप्रती ॥ ४१ ॥
ऐसे अनेक नरक भोगिल्यावरी ॥ जन्मोनि होय दरिद्री ॥ यास्तव पंडितचतुरीं ॥
अयनपर्वी[2] गोदान कीजे ॥ ४२ ॥ एका गोदानें निष्पाप होत ॥ हें अज्ञानपापाचें
प्रायश्चित्त ॥ बुद्धिपूर्वकासी स्मृत्युक्त ॥ प्रायश्चित्त करावें ॥ ४३ ॥ एकपंथीं पुण्य
करावें ॥ पुण्यकर्त्यासी सेवीत जावें ॥ क्षणभंगुर देह स्वभावें ॥ परी जाणावा
अलभ्य हा ॥ ४४ ॥ ऐसा प्राप्त होऊनि देह ॥ जे न सेविती साधुसमूह ॥ सर्वांदेखतां
पडे देह ॥ ठाकोनि परिग्रहा जातसे ॥ ४५ ॥ ऐसें जाणोनियां खगपती ॥ धर्मार्थ
लावावी[3] संपत्ती ॥ गृहामध्यें धनाची वस्ती ॥ सुहृद सांगाती स्मशानीं ॥ ४६ ॥
शरीर तें अग्नि जाळीत ॥ पाप पुण्य सवें येत ॥ पापें नर असल्या लिप्त ॥ निरय[4]

१ निर्वाहार्थ भूमिआदि. २ संक्रांतिआदि महापर्वे. ३ योजावी. ४ नरक.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

प्राप्त जाणिजे ॥ ४७ ॥ पुण्य असत्या बरोबरी ॥ तो प्राणी चढे स्वर्गपायरी ॥ मृतदिवसाणासोनि नरीं ॥ सर्पारिउक्त[1] विधि जो कां ॥ ४८ ॥ तो विधि करावा आवश्यक ॥ असत्याही मनुष्य रंकें[2] ॥ गृहस्थ आणि क्रियात्यागक ॥ व्रतत्याग[3] ब्रह्मचारी ॥ ४९ ॥ तपस्वी असोनि ग्राम सेवित ॥ संन्यासी इंद्रियें न रक्षित ॥ हे चारी आश्रम नव्हेत ॥ विटंबना निमित्त पैं कर्ते ॥ ५० ॥ सर्व धर्महीं ऐसे पुरुष ॥ दूर त्यजावें इतुक्यांस ॥ संसाराविषयीं आसक्त मानस ॥ असोनि विशेष ब्रह्मज्ञ बोलती ॥ ५१ ॥ ब्रह्मांडमंडपामाझारी ॥ धर्म ब्रह्म बरोबरी ॥ त्यांतें टाकिती अंत्यजापरी ॥ ते निरयनगरीं पावती ॥ ५२ ॥ जरी स्वधर्म असे हीन ॥ तरी उत्तम परधर्माहून ॥ स्वधर्मे मेल्याही कल्याण ॥ परधर्मानें वांचतां भय ॥ ५३ ॥ तस्मात् या उभयलोकांत ॥ आचार श्रेष्ठ असे सत्य ॥ आचारहीनासी वेद पुनीत[4] ॥ न करिती नित्य पठतांही ॥ ५४ ॥ आचार हाचि प्रथम धर्म ॥ तो न त्यजावा

---

१ गरुडपुराणांतील. २ द्रव्यहीन. ३ जातकर्मादि संस्कारहीन. ४ पवित्र.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अत्युत्तम ॥ संकट पडतांही परम ॥ श्रेष्ठ धर्म रक्षावा नरें ॥ ५५ ॥ सात्त्विकांची[1] करावी संगती ॥ त्यजावें राजसतामसांप्रती ॥ ज्यांचे संगतीं दोषांची प्राप्ती ॥ होय नरकगती अनुसेवनें[2] ॥ ५६ ॥ स्वर्गीं जाती सात्त्विक जन ॥ तामसांसी नरकस्थान ॥ राजसांसी भूलोक जाण ॥ गीता प्रमाण असे यासी ॥ ५७ ॥ अग्निवर्जित जे ब्राह्मण ॥ कधीं न करिती होम हवन ॥ आणि राजा ब्राह्मणहीन ॥ कूटविक्रयिण[3] वैश्य जो कां ॥ ५८ ॥ तो आणि शूद्रजातींत ॥ जन्म पावोनि सेवन न करीत ॥ पत्नी पतीलागीं वंचित ॥ नरक निश्चित भोगिती हे ॥ ५९ ॥ अस्नात करी भोजन ॥ तें अन्न नोहे विष्ठाभोजन ॥ उदकपान रुधिरासमान ॥ प्रातःस्नान म्हणोन कीजे ॥ ६० ॥ यास्तवचि आचारवंतें ॥ स्नान करोनि तर्पणातें ॥ कीजे नातरी रुधिरातें ॥ प्राशिल्या दोषातें पावतसे ॥ ६१ ॥

१ सद्वर्तनी लोकांची. २ सहवासानें. ३ भेळसेळीनें, खोट्या मापानें विकणारा.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

कंडणपेषणादि पंचसून ॥ यांचा दोष असे गहन ॥ म्हणोनि प्रायश्चित्तार्थ जाण ॥ पंच सुलक्षण यज्ञ निर्मिले ॥ ६२ ॥ ते न टाकावे एकही दिवस ॥ टाकितां घडे निरयवास ॥ अल्प अन्यायीं दंड विशेष ॥ यमधर्म सरस करीतसे ॥ ६३ ॥ सदा शौचीं यत्न कीजे ॥ धर्ममूल शौच जाणिजे ॥ बाह्यशौच मृज्जलें कीजे ॥ अंतरीं धरिजे शुद्ध भाव ॥ ६४ ॥ काम क्रोध आणि लोभ ॥ हे आंतरमल स्वयंभ ॥ त्रय उपायीं तिहींचे कोंभ ॥ निर्मूल सुलभ क्रमें कीजे ॥ ६५ ॥ काम जिंकावा धैर्यैंकरूनी ॥ शांतीनें कीजे क्रोधहानी ॥ संतोषें लोभाची निशाणी ॥ सुज्ञांनीं मोडावी लीलामात्रें ॥ ६६ ॥ दान अध्ययन आणि होम ॥ या धर्मैं ब्राह्मण उत्तम ॥ गति पावे इतरांसीं सुगम ॥ दान निःसंभ्रम गतिप्रद ॥ ६७ ॥ जिंहीं पूर्वीं न केलें दान ॥ ते नर दरिद्री होऊन ॥ दीनवाणी भाकोनि अन्न ॥ मागती मलिन होऊनि अति ॥ ६८ ॥ तस्मात् यथाशक्ती दान द्यावें ॥ परस्त्रियेसी सर्वथा त्यजावें ॥

१ कांडणें, दळणें, चूल, कचरा काढणें, पाणी ठेवण्याची जागा ह्या पांच सूना (कृमिहत्या).

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

भोगितां प्राप्त स्वभावें ॥ होई न भोगवे तैसा नरक ॥ ६९ ॥ नहुषें [1]शचीची इच्छा धरिली ॥ चंद्रानें गुरुपत्नी भोगिली ॥ [2]प्रजापतीलागीं भुली ॥ पडली स्वकन्या देखतां ॥ ७० ॥ [3]वृषभध्वजें पाहूनि मोहिनी [4] ॥ मोह पावला देवशिरोमणी ॥ तस्मात् स्त्री आणि सुराप्राशनीं ॥ मोह झेंडपणीं होतसे ॥ ७१ ॥ नारीचे दृष्टींत कामाची वस्ती ॥ म्हणोनि तिये त्यजावें निश्चिती ॥ ऐसें आचरण जे करिती ॥ ते मेल्या पावती स्वर्गसुख ॥ ७२ ॥ जैसें शीतकाळीं उष्णकाळीं ॥ तैसें कर्म करावें वर्षाकाळीं ॥ जेणें पावे सुखनवाळी ॥ दुःखकाजळी न लागे कदा ॥ ७३ ॥ ऐसें कर्म विवेकयुक्त ॥ मनुष्यजन्म जो कां पावत ॥ त्यानें व्हावें विष्णुभक्त ॥ भवपाश समस्त तोडावया ॥ ७४ ॥ विष्णुभक्तावांचोनि प्रसूत ॥ तिजहूनि वंध्या उत्तम सत्य ॥ यास्तव सर्व अवस्थांत ॥ धर्म नेमस्त अनुष्ठावा ॥ ७५ ॥ [5]अर्थ आणि [6]काम जाण ॥ हे अनर्थाचे दोघे कारण ॥

१ इंद्राणीची. २ ब्रह्मदेवाला. ३ शंकर. ४ मोहक स्त्री. ५ लागलाच. ६ द्रव्य. ७ स्त्रीसुखाविषयीं इच्छा.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

ऐसें जाणोनि मनीषिण ॥ रात्रंदिन विष्णूतें स्तविती ॥ ७६ ॥ अगा पुण्यवंता वैनतेया ॥ तुवां लोकांच्या उपकारकार्या ॥ मज पुसिली प्रश्नचर्या ॥ ती व्याख्या तुजप्रती सांगतों ॥ ७७ ॥ अनुक्रमेंचि सांगतों तुज ॥ सावध होऊनि पक्षिराज ॥ प्रश्नार्थ सर्व समज ॥ श्रवणकाज धरोनि चित्तीं ॥ ७८ ॥ जो धर्मशास्त्र न करी श्रवण ॥ तो न उद्धरे कदा जाण ॥ ऐसें बोलिला श्रीभगवान ॥ अध्याय संपूर्ण पैं होतां ॥ ७९ ॥ गरुडपुराणामाझारी ॥ पवित्र प्रेतकल्प भारी ॥ गरुडासी निरोपी श्रीहरी ॥ ऋषींसी सत्रांतरीं कथी सूत ॥ ८० ॥ माधव विनवी कर जोडून ॥ मी बोलिलों प्राकृत वचन ॥ श्रोते साधूंनीं न्यून पूर्ण ॥ कृपा करोन करीत जावें ॥ ८१ ॥

इति श्रीगरुडपुराणे प्रेतकल्पे गरुडनारायणसंवादे प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥ ॥ ७ ॥



१ गरुडा. २ प्रेतांविषयीं विचार. ३ यज्ञामध्यें. ४ ग्रंथकर्ता.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

श्रीगणेशाय नमः ॥ वासुदेव म्हणे गरुडा ऐक ॥ जें सर्वलोकोपकारक ॥ कर्म असे और्ध्वदेहिक[1] ॥ पीडानिवारक अंतकाळीं ॥ १ ॥ या समग्र ब्रह्मांडांत ॥ चौऱ्यायशीं लक्ष जंतु गणित ॥ त्यांमाजी चारी भेद आहेत ॥ जरायु[2] विख्यात एक जाती ॥ २ ॥ स्वेदज[3] उद्भिज्ज[4] आणि अंडज[5] ॥ ऐशा चार जाती सहज ॥ एकवीस लक्षांचा समाज ॥ एके भेदीं अजें निर्मिला ॥ ३ ॥ त्या संपूर्ण जीवांभीतरी ॥ मनुष्य दुर्लभ सर्पारी ॥ त्याहीमाजी भेद भारी ॥ समजें अंतरीं तूं गरुडा ॥ ४ ॥ त्यांत मुख्य चारी वर्ण ॥ त्यांहीमाजी उत्तम ब्राह्मण ॥ अनुलोमप्रतिलोमेंकरून ॥ द्वादश सामान्य ह्या जाती ॥ ५ ॥ या दोन्हीं षट्कांविरहित ॥ संकीर्णजाती बहुत ॥ जे वेदधर्मविवर्जित ॥ अंत्यज समस्त ते जाण ॥ ६ ॥ रजक आणिक चांभार ॥ नट आणिक बुरुड नर ॥ कैवर्तक आणि सुराकार ॥ भिल्ल समग्र अंत्यज हे ॥ ७ ॥ आहार आणि मैथुन ॥ निद्रा भय क्रोध जाण ॥ यांनीं व्यापिले सर्व जन ॥

१ मरणानंतरची क्रिया. २ मनुष्यादि. ३ मत्कुणादि. ४ वृक्षादि. ५ पक्षी इत्यादि.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

विवेकी मानव परम दुर्लभ ॥ ८ ॥ हे सर्व लोक मी परमात्मा ॥ यंत्रित आहें द्विजोत्तमा ॥ त्याहीमाजी शास्त्रमहिमा ॥ उत्तमाधम मध्यम सांगतसें ॥ ९ ॥ स्थावराहूनि चर श्रेष्ठ ॥ अनस्थीहूनि[1] सास्थि[2] वरिष्ठ ॥ सूक्ष्माहूनि जो गरिष्ठ[3] ॥ तो वरिष्ठ जाण पां ॥ १० ॥ पक्ष्याहूनि पशु बरवा ॥ पशूहूनि मनुष्य जाणावा ॥ मनुष्यांत शूद्र समजावा ॥ शूद्राहूनि म्हणावा उत्तम वैश्य ॥ ११ ॥ वैश्याहूनि क्षत्रिय अधिक ॥ क्षत्रियाहूनि ब्राह्मण अधिक ॥ ब्राह्मणांमाजी वेदपाठक ॥ त्याहूनि अधिक सुकृतबुद्धी ॥ १२ ॥ कर्मकर्ता अधिक त्याहुनी ॥ ब्रह्मांडांत अधिक ब्रह्मज्ञानी ॥ ब्रह्मज्ञान्याहूनि मद्भजनीं ॥ निशिदिनीं चिंती जो ॥ १३ ॥ ऐसे हे प्राणी समस्त ॥ अधिकाहूनि अधिक आहेत ॥ नरशरीर झाल्या प्राप्त ॥ नाहीं तप करीत जो प्राणी ॥ १४ ॥ तो मेल्यावरी मूढमती ॥ महाघोर जे दुःखगती ॥ ती भोगोनियां अंतीं ॥ दुष्टजन्मगती पावतसे ॥ १५ ॥ बुद्धी आणि रूप बळ ॥

---

१ भरलेला. २ हाडें नाहींत असे प्राणी. ३ हाडें आहेत असे प्राणी. ४ मोठा. ५ पुण्यमती.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

पुत्र विद्या वित्त पुष्कळ ॥ पूर्वकर्म असल्या निर्मळ ॥ यथाकाळीं प्राप्त होई ॥ १६ ॥
ज्या नरें पुण्य जैसें केलें ॥ अथवा पाप संपादिलें ॥ त्याचीं असती दोन फळें ॥
पुण्यफळें तीं सौख्यरूप ॥ १७ ॥ पापाचीं फळें अशुभरूपानें ॥ उत्पन्न झाल्या
मनुजानें ॥ नित्यकर्म[1] आत्मज्ञानियानें ॥ न त्यागावें तयानें आपण कधीं ॥ १८ ॥
त्रैलोक्यस्वामी मी वासुदेव ॥ त्रिलोकींचे सर्व जाणें भाव ॥ तथापि कर्म विहित
अभिनव[2] ॥ नित्यमेव करीतसें ॥ १९ ॥ त्रैलोक्याकर्षणीं समर्थ ॥ ब्रह्मदेव असे
साक्षात ॥ तथापि लोकाचार[3] करीत ॥ नुलंघीत आचार मनेंही ॥ २० ॥ ज्ञान-
भक्तीच्या अभिमानें ॥ आचार टाकिला जयानें ॥ दोघांचींही फलसाधनें ॥ मिथ्या
अज्ञानें नरक भोगिती ॥ २१ ॥ कर्मावांचूनि मुमुक्षु नर ॥ न उद्धरती हा निर्धार ॥
संन्यास सर्वांत थोर ॥ त्याहीमाजी सार फलत्याग[4] ॥ २२ ॥ माझा आशय न जाणतां ॥

---

१ स्नान संध्या आदि धर्मशास्त्रविहित कर्म. २ आश्चर्यकारक. ३ लोकरीति. ४ कर्माच्या फळाची इच्छा न करणें.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

कर्मनिंदेच्या करिती वार्ता ॥ त्या अधम नरांशीं तत्त्वतां ॥ भाषण करितां नरक प्राप्त ॥ २३ ॥ हा पावोनि मनुष्यजन्म ॥ जें स्वर्गमोक्षाचें साधनोत्तम ॥ दोहोंमाजी एक निर्भ्रम ॥ न साधी तो अधम या लोकीं ॥ २४ ॥ स्वात्मा तयानें वंचिला ॥ इच्छिती शत द्रव्य संग्रहाला ॥ शत मिळतां सहस्राला ॥ सहस्र मिळाल्या लक्ष इच्छिती ॥ २५ ॥ लक्ष मिळतां म्हणे राज्य व्हावें ॥ मग चक्रवर्तित्व आवडे जीवें ॥ चक्रवर्ती झाल्या स्वभावें ॥ मग वाटे देव होईन ॥ २६ ॥ देव झाल्या अमरपती ॥ सुरपतित्वें ऊर्ध्वगती ॥ ऐसी तृष्णा पापमती ॥ न विरक्ती कदा पावे ॥ २७ ॥ जे झाले तृष्णास्वाधीन ॥ ते पावले निरयस्थान ॥ जे राहिले तृष्णा त्यागून ॥ ते स्वर्गस्थान भोगिती ॥ २८ ॥ बालपणीं मातृपितृमय ॥ यौवनपणीं रक्षिती स्त्रियेचे मनोदय ॥ वृद्धकाळीं पुत्रपौत्रमय ॥ स्वतंत्रमय क्वचित् नर ॥ २९ ॥ कुरंग आणि हस्ती ॥ पतंग आणि भ्रमरजाती ॥ मीन ऐसी पांचांची गती ॥ नाश पावती

---

१ इंद्र. २ त्याहून उच्च स्थान. ३ इच्छा. ४ वैराग्य. ५ हरिण.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

पांचांविषयीं ॥ ३० ॥ हा प्रमादी एकला नर ॥ सेवी विषय पांच समग्र ॥ तो कैसा न पावे यमपुर ॥ आश्चर्य फार हेंचि असे ॥ ३१ ॥ लोहकाष्ठांचे पाशेंकरून ॥ बांधिल्या कोणी प्राणीजन ॥ तो सुटेल उपायान ॥ पुत्रपाशान जे बांधले ॥३२॥ ते न सुटती प्राणीजन ॥ जाणती यमभय गहन ॥ मृत्यु न जाणे बाल तरुण ॥ वृद्ध अज्ञान न जाणेच ॥ ३३ ॥ यास्तव सर्व प्राणियांनीं ॥ पारलौकिक आदरें-करूनी ॥ करावें विचक्षणजनीं ॥ आत्मज्ञानी जरी असे ॥ ३४ ॥ आणि मेल्याही वाराणसींत ॥ सायुज्य पावल्या साक्षात ॥ तरी करावें और्ध्वदेहिक कृत्य ॥ प्राणी समस्त जे जनीं ॥ ३५ ॥ मेल्या नराचा अभिलाष ॥ नसे शेष प्राणियांस ॥ नास्तिकी अथवा ज्ञानियांस ॥ नसे अभिलाष प्राणियासी ॥ ३६ ॥ आपुलें विकोनही शरीर ॥ अथवा सेवावा चांडाळ नर ॥ परी नित्यनैमित्तिक समग्र ॥ कर्मप्रकार आचरावा ॥ ३७ ॥ यथाशक्ति यथाविधान ॥ कर्म कीजे अनुदिन ॥ धर्म राहतो

१ शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध. २ परलोकीं हितकर. ३ सुज्ञांनीं. ४ ब्रह्मरूपता. ५ प्रतिदिवशीं.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

धनाश्रयान ॥ विशेष जाण श्रद्धकरूनी ॥ ३८ ॥ तथापि पुत्रादिकांनीं ॥ करावी और्ध्वदेहसंपादणी ॥ विधि श्रेष्ठ म्हणोनी ॥ कर्म जनीं आचरावें ॥ ३९ ॥ धन अल्प अथवा बहुत ॥ असो परी श्रद्धायुक्त ॥ निर्धन असोनि ऋषिवृंद[1] बहुत ॥ श्रद्धान्वित स्वर्गा पावले ॥ ४० ॥ भक्तिविरहित धनवान ॥ बहुत पावले निरय-स्थान ॥ जैसा पाथेयावांचून[2] ॥ पांथस्थ जन दुःख पावे ॥ ४१ ॥ तैसें नित्य नैमित्तिक ॥ कर्म टाकी जो नर मूर्ख ॥ तो क्लेश पावतसे अनेक ॥ नर निष्टंकें[3] स्वगपती ॥ ४२ ॥ पातकें जीं ज्ञाताज्ञात ॥ त्यांचें करोनि प्रायश्चित्त[4] ॥ दक्षिणोत्तरायणीं अगत्य ॥ कीजे विध्युक्त पापनिष्कृती ॥ ४३ ॥ जोंवरी हें क्षेम शरीर ॥ निरोगी आणि जरा दूर ॥ इंद्रियांत शक्ति असे फार ॥ जों असे दूर आयुष्यक्षय ॥ ४४ ॥ तोंवरी विद्वेष[5] जनान ॥ स्वकल्याणार्थ कीजे यत्न ॥ गृहीं लागलिया अग्न ॥ कूपखनन मग काय कार्या ॥ ४५ ॥ रोगाक्रांत झाल्यावरी ॥ सुदिन पाहोनि

१ मुनिसमूह. २ मार्गांतील फलाहारादि. ३ निःसंशय. ४ प्रायश्चित्त. ५ वार्धक्य. ६ विद्वान्.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

ज्योतिःशास्त्रीं ॥ तीन चार ब्राह्मण घरीं ॥ पाचारोनि नरीं प्रायश्चित्त कीजे ॥ ४६ ॥ गोमिथुनपूर्वक प्रायश्चित्त ॥ करावें आपुल्या कल्याणार्थ ॥ गोद्वयाभावीं चौसष्ट रुपयांत ॥ विष्णुश्राद्धयुक्त प्रायश्चित्त कीजे ॥ ४७ ॥ मग प्रायश्चित्तकर्त्यान ॥ देश[2] काल वयोवस्थान ॥ काम[3]काम सकृ[4]दसकृत् जाण ॥ विचारून सांगावें ब्राह्मणांसी ॥ ४८ ॥ मग हातीं घेवोनि नारळ ॥ आणि पुष्पें घ्यावीं पुष्कळ ॥ हस्त करूनि बद्धांजुळ ॥ ब्राह्मण विमल प्रार्थावे ॥ ४९ ॥ ऐसें बोलावें तयांप्रती ॥ आब्रह्मस्तंबपर्यंत जगती ॥ हें विश्व राक्षस पिशाचजाती ॥ देवांसुरांप्रति आणि मानवां ॥ ५० ॥ या सर्वांसी धर्म सांगणार ॥ तैसेचि सर्वांचे गोसांर ॥ तस्मात् माझ्या पापांचा संहार ॥ विप्र हो समग्र करा तुम्ही ॥ ५१ ॥ पूर्वीं मीं घोर पापाचरण ॥ केलें ज्ञानें अज्ञानेंकरून ॥ जन्मापासूनि अनुदिन ॥ जें पाप दारुण म्यां केलें ॥ ५२ ॥ मज उद्धरा तयापासून ॥ ब्राह्मण जंगम तीर्थ पावन ॥

१ गाईचें जोडपें. २ देशकालादि संकल्प. ३ इच्छा व अनिच्छा. ४ एक वेळ अनेक वेळ. ५ रक्षणकर्ते.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

सर्व काम देतें निश्चयेंकरून ॥ वाक्योदकान मैलिन उद्धरती ॥ ५३ ॥ ब्राह्मण
जें भाषण करिती ॥ तें वाक्य देवता मानिती ॥ उपवास व्रत स्नान तीर्थीं ॥
तप संपादिती विप्र ज्याचें ॥ ५४ ॥ त्याचें संपूर्ण घेवोनि फळ ॥ यजमानासी
देती विमळ ॥ ऐसें पूज्य तुम्हां विप्रांचें कुळ ॥ पाप निर्मूळ करा माझें ॥ ५५ ॥
मजवरी करोनि प्रसाद ॥ शुभ आज्ञा करावी शुद्ध ॥ तुमचें सामर्थ्य असे
अगाध ॥ मजलागीं शुद्ध शीघ्र करा ॥ ५६ ॥ ऐसी प्रार्थना तीनवार ॥ करोनि
तुष्टवावे विप्र समग्र ॥ मग उत्तराभिमुख नर ॥ बैसोनि शीघ्र वपन कीजे ॥ ५७ ॥
जरी नारी असे सवाशीण ॥ तिनें वेणी द्वयंगुळप्रमाण ॥ छेदावी ब्रह्महत्यासमान ॥
पापें केशां आश्रयून असती ॥ ५८ ॥ यास्तव कीजे केशवपन ॥ आणि मृदा
गोमूत्र गोमयान ॥ पय दधि घृत गोरजान ॥ भस्मउदकान स्नान कीजे ॥ ५९ ॥

---

१ वाक्यरूप उदकानें. २ पापी. ३ उत्तरेकडे तोंड करून. ४ दोन अंगुलें. ५ मातीनें. ६ शेणानें.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

शुद्ध स्नान करोनि बाहेरी ॥ आद्रवस्त्र टाकोनि दूरी ॥ अन्य वस्त्रें घ्यावीं नरीं ॥ कीजे नंतरीं विष्णुश्राद्ध ॥ ६० ॥ मागुती दोन गाई द्याव्या दान ॥ प्रायश्चित्त जें कथिलें ब्राह्मणान ॥ दान होम व्रतादिक संपूर्ण ॥ कथिल्याप्रमाण संपादावें ॥ ६१ ॥ मग करावीं अष्टदानें ॥ तिल लोह हिरण्य कार्पास[2] जाण ॥ लवण आणि सप्तधान्यें ॥ पृथ्वी गोदानें ऐशीं आठ ॥ ६२ ॥ हीं एकेक पवित्र करिती ॥ चार पायली सप्तधान्यगणती ॥ द्रोण[3]संख्या तयांप्रती ॥ तावन्मिती द्यावें लवण ॥ ६३ ॥ पावणेतीन तोळे उणे असती ॥ पक्के एकुणीस शेर गणती ॥ कापूस द्यावा विप्राप्रती ॥ दानपद्धती ऐसी जाण ॥ ६४ ॥ ऐशीं गुंजा द्यावें सुवर्ण ॥ गो प्रत्यक्ष अथवा मोलें संपूर्ण ॥ सुवर्णनिष्कें[5] किंवा रजतान ॥ गोप्रदान अगत्य कीजे ॥ ६५ ॥ गोचर्माइतुकी तरी क्षिती ॥ दान द्यावी विप्राप्रती ॥ कार्पासाइतुकी लोहगणती ॥ दानाप्रती बोलिली असे ॥ ६६ ॥

१ ओलें वस्त्र. २ कापूस. ३ दोन कुडव. ४ किंमत. ५ निष्क (४ रुपये).

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

तिलपात्र आज्यपात्र ॥ कमंडलु उपानह छत्र ॥ शय्या रथ महिषी विचित्र ॥ गृह गज पवित्र दान कीजे ॥ ६७ ॥ अजाविकादि द्यावें दान ॥ वर्षपर्यंत ब्राह्मणासी अन्न ॥ दीप उदक वर्षप्रमाण ॥ अविच्छिन्न देत जावें ॥ ६८ ॥ ऐसा विधि सकळिक ॥ केल्यावरी आज्यपात्रीं मुख ॥ पाहावें महात्मयानें सम्यक ॥ कल्याण देख पावे तेणें ॥ ६९ ॥ तें पात्र ब्राह्मणासी देऊनी ॥ बोळवावे सर्वही मुनी ॥ स्वयें ब्रह्मचर्य उपोषणीं ॥ तीर्थाभिगमनीं तत्पर व्हावें ॥ ७० ॥ अथवा घ्यावा चतुर्थाश्रम ॥ ऐसा विधि असे उत्तम ॥ जो आचरेल नरोत्तम ॥ तो स्वर्गधाम सुखें पावे ॥७१॥ ऐसें भगवंत गरुडाप्रती ॥ बोलिला स्वयें अध्यायांतीं ॥ प्रेतकल्पाची द्वय अध्यायगणती ॥ झाली निश्चितीं बाबाजी म्हणे ॥ ७२ ॥ बाबाजी नाम असे प्रसिद्ध ॥ माधव नाम नसे प्रसिद्ध ॥ पितृस्थापित असे सुबद्ध ॥ यास्तव ग्रंथीं माधव लिहिलें ॥ ७३ ॥ नैमिषारण्यीं शौनकाप्रती ॥

---

१ शेळी, मेंढा इत्यादि. २ तुपाच्या पात्रांत. ३ संन्यास.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

साच अर्थ सूत कथी ॥ मूळींचा अर्थ पाहोनि यथामती ॥ विष्टलसुत कथी माधव ॥ ७४ ॥ या अध्यायीं प्रायश्चित्तविधान ॥ श्रीभगवंतें केलें निरूपण ॥ तदनुसार केल्या आचरण ॥ पापें संपूर्ण दग्ध होती ॥ ७५ ॥ ॥ इति श्रीगरुडपुराणे प्रेतकल्पे गरुडनारायणसंवादे प्रायश्चित्तविधानं नाम द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

श्रीगणेशाय नमः ॥ पुन्हां गरुडाप्रती भगवंत ॥ बोलता झाला प्रीतियुक्त ॥ अगा तार्क्ष्या मरणसमयांत ॥ प्राणी मनुष्यांत जो जन्मे ॥ १ ॥ तयानें दक्षिणेकडे करोनि मुख ॥ भूमि गोमयानें सारवावी सम्यक ॥ दक्षिणाग्र कुश[1] सकळिक ॥ पसरावे देख मानवें ॥ २ ॥ आणि तिळांचें कीजे विकिरण[2] ॥ विधियुक्त गोपीचंदन ॥ शालिग्रामतीर्थेंकरून ॥ चंदन मिळवोन सिंचन[3] कीजे ॥ ३ ॥ तुळशी सर्व आंगावरी ॥ घालोनि नवछिद्रद्वारीं ॥ हेमखंडें[4] ब्रह्मरंध्रीं ॥ मुखाभीतरी नाभिस्थानीं ॥ ४ ॥ तैसेंचि नासिकीं नेत्रीं ॥ आणि घालिजे कर्णद्वारीं ॥ इतुक्या स्थानीं उक्तमंत्रीं ॥ सुवर्ण नरीं घालिजे ॥ ५ ॥ यथाधिकार ग्रंथाआंत ॥ मंत्र असती जे पुनीत[5] ॥ ते श्रवण करावे समस्त ॥ दानें बहुत तेथें द्यावीं ॥ ६ ॥ प्राणोत्क्रमणसमयांत[6] ॥ पिंडदान करावें विधियुक्त ॥ अधिकारी प्राचीनावीत ॥ होऊनि निश्चित दक्षिणमुख ॥ ७ ॥ शिवाचें

१ दर्भ. २ टाकणें. ३ सडा घालणें. ४ सोन्याचे तुकडे. ५ पवित्र. ६ मरणकाळीं.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

नाम घेऊनी ॥ व्रीहि अथवा यवेंकरूनी ॥ शिबिकेवरी स्थापूनी ॥ द्वारदेशस्थानीं आणावा ॥ ८ ॥ प्राचीनावीती जो असेल ॥ सुत बंधु अथवा सपिंडांतील[1] ॥ पुत्रानें पिंड निर्मळ ॥ पांथनामें विमळ पैं द्यावा ॥ ९ ॥ चार पिंड खेचर-नामान ॥ विश्रामस्थानीं[2] भूतनामान ॥ पिंड द्यावे विधीकरून ॥ ब्राह्मणानें पश्चिमद्वारीं ॥ १० ॥ उत्तरेकडे क्षत्रियानें ॥ पूर्वेकडोनि वैश्यें जाणें ॥ दक्षिणेचे अनुमानें ॥ शूद्रानें प्रेत काढिजे ॥ ११ ॥ चांडालअग्नि चिताअग्नी ॥ वर्ज्य करावा सूतिकाअग्नी ॥ शूद्रपतितें[3] आणिला जो अग्नी ॥ वर्जोनि काष्ठाग्नि शुद्ध घ्यावा ॥ १२ ॥ स्मशानींची भूमि शोधन ॥ करावी शुद्ध गोमयान ॥ उदकें संमार्जन करून ॥ शुष्क काष्ठानें चिता कीजे ॥ १३ ॥ मग होवोनि उदङ्मुख ॥ पेटवावीं काष्ठें अनेक ॥ सवस्त्र गंधमाल्यादिक[4] ॥ घालोनि सम्यक दहन कीजे ॥ १४ ॥ साधकाख्यास पिंडदान ॥ करावें आणि शवाहुतीहवन ॥ शव आज्यें

१ सातव्या पुरुषापर्यंत सपिंड. २ शव ठेवतात तेथें. ३ शूद्रानें किंवा भ्रष्टानें. ४ पुष्पमाळा.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

विलेपन ॥ तिलसर्षपान संमिश्रित ॥ १५ ॥ मुखामाजी [1]आज्याहुती ॥ देवोनि मंत्रोक्त [2]शेवाप्रती ॥ अग्नि लावोनि ऐशी भारती ॥ बोलावी निश्चिती प्रेतस्थानीं ॥ १६ ॥ येथें तूं उत्पन्न झालासी ॥ आणि येवोनि मनुष्यदेहासी ॥ स्वर्गलोकाप्रति जाशी ॥ तरी आहुतीसी तूं घेईं ॥ १७ ॥ ऐसें बोलोनि प्रेतवस्त्र ॥ स्मशानीं टाकावें अपवित्र ॥ मग रोदन सहमित्र ॥ गाढ विचित्र करावें ॥ १८ ॥ निःशेष झाल्यावरी दहन ॥ अस्थींचें करावें सिंचन ॥ आर्द्र [3]मृन्मय पात्रांत जाण ॥ पंच-रत्नांनीं संमिश्रित ॥ १९ ॥ गंगादितीर्थ पवित्र स्थानीं ॥ अस्थि टाकाव्या नेवोनी ॥ रक्षण केल्या भूमिस्थानीं ॥ खणोनि देवालयीं स्थापिजे ॥ २० ॥ चौथे दिवशीं अस्थिसंचयन ॥ अथवा तृतीय द्वितीय दिन ॥ नातरी [4]सद्यःसंग्रहण ॥ सर्व वर्णांनीं करावें ॥ २१ ॥ प्रेतनामें पिंड देऊनी ॥ मग अस्थि ठेविजे पुरूनी ॥ नंतर स्नान सर्व जनीं ॥ लहानथोरांनीं करावें ॥ २२ ॥ करोनियां [5]प्राचीनावीती ॥ दक्षिणमुख

---

१ तुपाच्या आहुती. २ प्रेताला. ३ मातीच्या. ४ त्याच दिवशीं. ५ अपसव्य.

Sri Vidyabharathi Sodh Centre, Srinagar

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

वस्त्रासहिती ॥ सव्य अनामिकांगुल्यें निरुती ॥ स्नानविधि करूनियां ॥ २३ ॥
मग करोनि आचमन ॥ त्यासी सपिंडीं उदकदान ॥ स्थापोनि एक पाषाण ॥
नामगोत्र उच्चारपूर्वक ॥ २४ ॥ सपिंडांनीं तिलांजुळी ॥ देवोनि स्नान तत्काळीं ॥
करोनि पूर्वभूमीजवळी ॥ संबंधीमेळीं[1] पैं यावें ॥ २५ ॥ मग चावोनियां निंबपत्र ॥
पाय ठेवोनि पाषाणावर ॥ यावें गृहाप्रति सत्वर ॥ हे खगेंद्रा[2] ते दिनीं ॥ २६ ॥ ज्या
द्रव्यें अधिकारियानें ॥ पट्टपिंड केले शास्त्रप्रमाणें ॥ तीं द्रव्यें दशपिंडांकारणें ॥
नरपंडितानें पैं व्यावीं ॥ २७ ॥ असगोत्री[3] अथवा सगोत्री[4] ॥ जो प्रथम दिनीं
कर्म करी ॥ पुरुष अथवा असो नारी ॥ दशाहवरी[5] त्यानेंच कीजे ॥ २८ ॥ प्रेतत्वा-
पासोनि प्राणी ॥ न सुटे नवश्राद्धांवांचूनी ॥ द्वादशदिनांत केल्या प्राणी ॥
पाप तरोनी स्वर्गीं जाय ॥ २९ ॥ प्रथम तृतीय पंचम दिन ॥ सप्तम नवम एकादश ॥ १४ ॥
जाण ॥ या विषम श्राद्धांलागून ॥ अगत्यान आचरावें ॥ ३० ॥ संध्याकाळीं ओल्या

१ कुटुंबी व मित्र यांसह. २ गरुडा. ३ भिन्न गोत्राचा. ४ त्याच गोत्राचा. ५ दहा दिवसपर्यंत.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

पात्रीं ॥ पय घालोनि अंजुळीभरी ॥ प्रेतोद्देशें मृतभूमीवरी ॥ दहा दिवसवरी नित्यनित्य ॥ ३१ ॥ अथवा तीन दिवसपर्यंत ॥ नातरी [१]एकाह निश्चित ॥ ठेवावें नसोनि [२]प्रमत्त ॥ सावध अत्यंत असावें कर्मीं ॥ ३२ ॥ प्रथम दिवशीं न कीजे भोजन ॥ कोणीं दिल्या आणोनि अन्न ॥ अथवा विकत घेऊन ॥ [३]अलवण भोजन करावें ॥ ३३ ॥ सर्वांनीं निजावें भूमीवरी ॥ तत्पर असावें श्रवणा आचारीं ॥ ज्ञान वैराग्य परोपरी ॥ श्रवण निर्धारीं करावें ॥ ३४ ॥ देह झाल्या [४]दह्यमान ॥ पीडा होत असे दारुण ॥ यास्तव तच्छांत्यर्थ गोदान ॥ धार्मिक नरानें करावें ॥ ३५ ॥ [५]पयसिंचन चितास्थानीं ॥ गरुडा करावें अगत्यानीं ॥ यमदूत जीव घेऊनी ॥ यमसदनीं शीघ्र जाती ॥ ३६ ॥ मग पुसोनि यमरायासी ॥ पुन्हां येती भूलोकासी ॥ त्रयोदश दिन जीवासी ॥ द्वारदेशीं ठेविती ॥ ३७ ॥ तो जीव फार कष्टी होत ॥ हाहाकारें सुदुःखित ॥ स्वजन जे रुदन करीत ॥ अथवा मुंचितं [६]श्लेष्मादिक ॥ ३८ ॥

१ एक दिवस. २ उन्मत्त. ३ अळणी. ४ पेटल्यावर. ५ दुधाचा सडा. ६ टाकलेला

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

तेणें पावे अति दुःख ॥ त्याचें त्यासी भोजन देख ॥ यास्तव जे आप्तलोक ॥ त्यानीं
क्षणेक न रडावें ॥ ३९ ॥ स्वशक्तीनें क्रिया करावी ॥ प्रथम दिवशीं श्राद्धें करावीं ॥
[1]असंस्कृताची विधि वरवी ॥ त्वां ऐकावी अगत्यरूप ॥ ४० ॥ असंस्कृतासी भूमी-
वरी ॥ पिंड द्यावा निर्धारीं ॥ संस्कृतासी कुशोपरी ॥ दशपिंड सपारी पैं द्यावे
॥ ४१ ॥ जेथें दिला प्रथम पिंड ॥ तेथेंचि दीजे इतर पिंड ॥ ती सर्व करावी अखंड ॥
देहरूप पिंड होतसे ॥ ४२ ॥ सुमरणें अथवा दुर्मरणें ॥ प्राणी मेल्या देहपिंडानें ॥
उत्पन्न होतो प्रथम पिंडानें ॥ शिर द्वितीयानें कर्णाक्षि नासिक ॥ ४३ ॥ गळा तोंड
आणि भुज ॥ वक्षःस्थळ तृतीयपिंडज ॥ नाभि आणि गुद सहज ॥ होई उपज
लिंगासी ॥ ४४ ॥ चतुर्थ पंचम पिंडेंकरूनी ॥ [2]ऊरू जंघा सहावे दिनीं ॥ आणिक
होती या दोनी ॥ [3]सप्तमेहनी रुधिरादिक ॥ ४५ ॥ अष्टम पिंडें देह संपूर्ण ॥ क्षुधा-
तृषेचा नवम दिन ॥ दहावे दिवशीं क्षुधा गहन ॥ प्रेतप्राण पावतसे ॥ ४६ ॥

१ दहनसंस्कार न केलेल्याची. २ दर्भावर. ३ मांड्या. ४ सातवे दिवशीं.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

एकादश द्वादशांत ॥ भोजन करीतसे प्रेत ॥ यास्तव भूरिभोजन बहुत ॥ प्रेत-
प्रीत्यर्थ करावें ॥ ४७ ॥ दश दिवसांमध्यें आला दर्श ॥ तरी श्राद्धांचा होय अपकर्ष ॥
म्हणोनि दशाहांत कर्मास ॥ अमावास्येस पूर्ण होत ॥ ४८ ॥ पित्याचे दिनत्रयाउपरी ॥
दर्श व्यतीपात आला जरी ॥ दशाहांत कर्म तरी ॥ तये अवसरीं संपादावें ॥ ४९ ॥
दोन इंदु झाले असतां ॥ पुन्हां शवत्व पावे तत्त्वतां ॥ यास्तव अगत्य खगनाथा ॥
प्रेतकृत्या आचरावें ॥ ५० ॥ प्रेतकृत्यादि विरहित कर्म ॥ अन्य न करावें सर्व
नेम ॥ हास्य लास्य गीत परम ॥ कौतुक संभ्रम वर्जावा ॥ ५१ ॥ प्रेतश्राद्धीं जीं
वर्ज्य ॥ तीं तुज कथितों सहज ॥ आशीर्वादाचें नसे काज ॥ द्विगुण वर्ज्य दर्भ
असती ॥ ५२ ॥ स्वस्तिवाचन तथा प्रणव ॥ अग्नौकरण उच्छिष्ट सदैव ॥ श्राद्ध
आणि वैश्वदेव ॥ आवाहन अभिनव न साधिजे ॥ ५३ ॥ आणि स्वधा विकिर ॥
उल्मुक पितृशब्दमात्र ॥ आणि दक्षिणा समग्र ॥ पक्व अन्नसार वर्जावें ॥ ५४ ॥

---

१ आगंतुकांचें मोठें भोजन. २ अमावास्या. ३ पुढील कृत्य अगोदर करणें. ४ चंद्र.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अन्नाभावीं आमान्न द्यावें ॥ पक्क अन्नें पिंड करावे ॥ ब्राह्मणमात्रासी बरवें ॥
इतरांसी वर्ज्य भक्तपिंड ॥ ५५ ॥ धूपार्थ धूप सर्जरस ॥ सूत्रार्थ ऊर्णा विशेष ॥
प्रेतश्राद्धें ऐसीं अशेष ॥ करोनि स्नानास मग कीजे ॥ ५६ ॥ जळांजुळी
उत्तरोत्तर ॥ वृद्धीनें द्यावी निरंतर ॥ प्रेततृप्त्यर्थ ऐसा आचार ॥ गोत्रजीं समग्र
आचरावा ॥ ५७ ॥ सपिंडजातीसह भोजन ॥ प्रेततृप्त्यर्थ करावें आपण ॥
तेणें घडे परम कल्याण ॥ गरुडा जाण निश्चयें ॥ ५८ ॥ मृतप्राणोत्क्रमणापासून ॥
दश दिवसांचा विधि आपण ॥ गरुडासी श्रीभगवान ॥ निरूपण करिता
झाला ॥ ५९ ॥ ऐसा आचार मनुष्यान ॥ करोनि पाविजे कल्याण ॥ ऐसें
सांगे सूत पुराण ॥ विठ्ठलसुत माधव म्हणे ॥ ६० ॥ ॥ इति श्रीगरुडपुराणे
प्रेतकल्पे गरुडनारायणसंवादे दशमदिनकृत्यकथनं नाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

श्रीगणेशाय नमः ॥ मागुती गरुडाप्रति मधुसूदन ॥ स्वयें सांगतसे आपण ॥ पिंडदेह झाला निर्माण ॥ त्रयोदश दिन प्राप्त होतां ॥ १ ॥ महामार्गें गमन करी प्रेत ॥ दिवारात्रौ बुभुक्षित[1] ॥ मार्गीं असिपत्रादि[2] वनें बहुत ॥ दुःख अत्यंत तेणें पावती ॥ २ ॥ क्षुधेतृषेची पीडा फार ॥ ऐसें प्रेत पावे यमपुर ॥ शायशीं हजार त्रिशतें वर ॥ तीन उपर योजनें वरती ॥ ३ ॥ इतुकें अंतर यमलोकासी ॥ भूलोकाहूनि प्रेता जावयासी ॥ दोनशें सत्तेचाळीस योजनांसी ॥ प्रतिदिवशीं चालावें लागे ॥ ४ ॥ महादुःख मार्गीं पावत ॥ यमपाशें बद्ध[3] नित्य ॥ हाहा ऐसें रुदन करीत ॥ स्वगृह त्यजोनि यमपुरीं जाई ॥ ५ ॥ पूर्ण संवँत्सरांत षोडश ॥ विश्राम असती प्रेतास ॥ प्रतिश्राद्धीं एक मुहूर्त[4] प्रेतास ॥ सावकाश बैसविती ॥ ६ ॥ तेथें श्राद्ध केल्याचें अन्न ॥ भक्षविती प्रेतालागून ॥ षोडश पुरांचीं नामें भिन्न ॥ एकीकडोन श्रवण करीं ॥ ७ ॥ याम्य आणि सौरिपुर ॥ नरेंद्रभवन गंधर्वनगर ॥ शैला-

१ क्षुधित. २ तरवारीच्या धारेसारखीं. पानें. ३ बांधलेला. ४ वर्षांत. ५ दोन घटिका.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

गम आणि क्रूर ॥ क्रौंचपुर विचित्रभुवन ॥ ८ ॥ बव्हापद दुःखद नाम ॥ नाना-
क्रंदनपुर संतप्तभुवन ॥ रौद्रपयोवर्षण जाण ॥ शीताढ्याभिधान बहुभीती ॥ ९ ॥
धर्मभुवन याम्यपुर ॥ ऐशीं सोळा पुरें समग्र ॥ मार्गीं प्रेतासी विश्रामकर ॥ असती
खगेंद्रा जाण पां ॥ १० ॥ त्या मार्गें मर्कटोपरी[1] ॥ प्रेत जातां रुदन करी ॥ काय
कर्म म्यां जन्मांतरीं[2] ॥ केलें अंतरीं आठवीत ॥ ११ ॥ मज मनुष्यजन्म असतां ॥
धर्म अनुष्ठिला[3] नाहीं तत्त्वतां ॥ आळस आणि निद्रा करितां ॥ त्यागिला सर्वथा
शिष्टाचार ॥ १२ ॥ ज्या शौचाच्या[4] मुळेंकरून ॥ धर्म वाढतो रात्रंदिन ॥ तपही
वाढतसे गहन ॥ बाह्याभ्यंतर[5] जाण मळ जाती ॥ १३ ॥ ज्या निंदेनें प्राप्त नरक ॥
ती निंदा मीं केली न करितां विवेक ॥ धर्मार्थ असे हा लोक ॥ तेथें अविवेक
म्यां केला ॥ १४ ॥ दारा गृह आणि पुत्र ॥ यांत वय गेलें समग्र ॥ नित्य अन्नदान ॥ १७ ॥
परोपकार ॥ नाही लवमात्र खर्चिलें ॥ १५ ॥ ज्या पुरुषानें धनसंचय ॥ केला

१ माकडाप्रमाणें. २ मनांत. ३ आचरिला. ४ शुद्धतेच्या. ५ बाहेरील व आंतील.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

त्याचा जीवित्वान्वय ॥ धिक्कारी जीव प्रेतमय ॥ दुःखसमय प्राप्त झाला ॥ १६ ॥ मीं नाहीं केलें दान ॥ अथवा नाहीं घडलें हवन ॥ हिमपर्वतगव्हरीं[1] जाण ॥ नाहीं गमन म्यां केलें ॥ १७ ॥ नाहीं सेविलें भागीरथीजळ ॥ जिच्या प्रभावें स्वर्ग अतुळ ॥ प्राप्त होई अंजुळीजळ ॥ एक वेळ सेवितांचि ॥ १८ ॥ आणि नाहीं खणिले तलाव[2] ॥ मनुष्यपक्ष्यांचा धरोनि भाव ॥ निर्जल देश जेथें स्वयमेव ॥ नाहीं सोज्वळ जळ केलें ॥ १९ ॥ नाहीं केलें नित्य दान ॥ आणि न केलें गोसेवन[3] ॥ स्वशरीरशुद्धी-लागून ॥ कांहीं आचरण नाहीं केलें ॥ २० ॥ ब्रह्मयज्ञ देवयज्ञ ॥ भूतयज्ञ मनुष्य-यज्ञ ॥ शीतवारितर्पण[4] पितृयज्ञ ॥ पंचमहायज्ञ शरीर हें ॥ २१ ॥ म्यां नाहीं केलें देहीं असोनी ॥ नाहीं रुद्रजप विष्णुपूजनीं ॥ देह न लाविला तीर्थयात्राकरणीं ॥ सत्रसंग्रह नाहीं केला ॥ २२ ॥ नाहीं केलें ब्रह्मचर्यव्रत ॥ न निजलों भूमीवरी नित्य ॥ स्वार्थ धरोनियां मनांत ॥ वंचना जनांत म्यां केली ॥ २३ ॥ लोभकाम-

---

१ हिमालयाच्या गुहेंत. २ तळीं. ३ गाईची सेवा. ४ थंड पाण्यानें पितरांचें तर्पण.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

क्रोधेंकरून ॥ द्रोह भूतगणांशीं[1] जाण ॥ शरीरहेतु मनीं धरून ॥ नाहीं कल्याण आपुलें केलें ॥ २४ ॥ ब्राह्मणभुक्तशेष नाहीं सेविलें ॥ मातापितयांचे चरण न वंदिले ॥ मधुरवाणीं न तोषविले ॥ स्त्री म्हणे चांगलें पतिमन ॥ २५ ॥ पति मरतां अग्निप्रवेश ॥ नाहीं केला मीं सावकाश ॥ वैधव्यधर्म विशेष ॥ व्रतोपवास नाहीं केला ॥ २६ ॥ नाहीं केलें शरीरशोषण[2] ॥ परान्नाविषयीं उद्युक्त मन ॥ प्रतिग्रहाचें दुष्ट धन ॥ कूटसाक्षीन[3] वारंवार ॥ २७ ॥ द्रव्य मेळविलें अपार ॥ नाहीं तृष्णा शमली लवमात्र ॥ समान पंक्तीसह भोजन सांद्र ॥ पूजाप्रकार न संपादिला ॥ २८ ॥ पाकामाजी केली वंचना[4] ॥ न संतोषविलें स्वजना ॥ ऐसी शरीराची धरोनि तृष्णा ॥ परलोकसाधना नाहीं केलें ॥ २९ ॥ ऐसा प्राणी विलाप बहुत ॥ मार्ग क्रमितां नित्य करीत ॥ क्रूर यमदूत ताडीत ॥ कष्टें प्रेत मार्ग चाले ॥ ३० ॥ पदोपदीं मूर्च्छायमान ॥ ऐसा प्राणी विलाप गहन ॥ जायापुत्रादिक स्मरोन ॥

१ प्राणिमात्रांशीं. २ व्रत-उपवासांनीं देह कृश करणें. ३ खोटी साक्ष देऊन. ४ भेद.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

क्रंदायमान होतसे ॥ ३१ ॥ म्हणे हा जाये हा सुत ॥ ऐसा अहोरात्र शोक करीत ॥ तयाचे दुःखाचा भावार्थ ॥ किती म्हणोनि सांगावा ॥ ३२ ॥ एकादशदिनींचें जें श्राद्ध ॥ तें चतुर्धा[1] तृप्तिकर प्रसिद्ध ॥ आद्य मासिक जें शुद्ध ॥ वर्षमासिक एकादशादि ॥ ३३ ॥ मासादिक[2] श्राद्ध मासिक ॥ प्रेततुष्ट्यर्थ ऐशीं सम्यक ॥ मासिकें करावीं पक्षिनायक ॥ आद्यमासावसानीं[3] ग्रामपुरीं ॥ ३४ ॥ दूत जाती प्रेत घेऊन ॥ पुष्पभद्रा नदी तेथें जाण ॥ आणि न्यग्रोध[4] प्रियदर्शन ॥ असे सुलक्षण यमपुरी ॥ ३५ ॥ त्या पुरीं विश्राम करविती ॥ जायापुत्रादिकांची स्मृती ॥ दुःखें जीव करी निश्चिती ॥ दूत त्याप्रती बोलती मग ॥ ३६ ॥ म्हणती तुझें कोठें धन ॥ कोठें पुत्र जाया सुलक्षण ॥ कोठें मित्र बंधुजन ॥ पूर्वपुण्यानें प्राप्त धन जें ॥ ३७ ॥ तें त्वां नाहीं देशकाल पाहुनी ॥ बापा न दिधलें विप्रांचिया पाणीं[5] ॥ यास्तव या तुजलागुनी ॥ यातना आम्ही भोगवितों ॥ ३८ ॥ यमगीता जी

१ चार प्रकारांनीं. २ महिन्याचे आरंभीं. ३ महिन्याचे शेवटीं. ४ वटवृक्ष. ५ हातावर दान.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

यमें आम्हां कथिली ॥ ती शुभ त्वां कां नाहीं आइकिली ॥ ऐकोनि भक्ती कां नाहीं वैसली ॥ नास्तिक्यें भासली तुज खरी ॥ ३९ ॥ यास्तव लौकिकाचार[1] केला ॥ न धर्म त्वां आचरिला ॥ म्हणोनि क्लेश हे तुजला ॥ करावे आम्हां लागती ॥ ४० ॥ ऐसें प्रेत व्याकुलांतर[2] ॥ दूत आश्वासिती समग्र ॥ द्वयमासिक तेथें साचार ॥ घेवोनि शौरिपुर मग पावे ॥ ४१ ॥ ज्याचें नाम त्रैपक्षिक ॥ तेथें होतसे तें मासिक ॥ पुढें नरेंद्रनगरोन्मुख[3] ॥ प्रेत सम्यक पावतसे ॥ ४२ ॥ आणि गरुडा द्वादश दिवशीं ॥ त्रैपक्षिक आणि षण्मासीं ॥ पूर्ण संवत्सरीं कुंभासी ॥ प्रेतोद्देशीं अगत्य कीजे ॥ ४३ ॥ त्या दिवशीं न केल्या कुंभदान ॥ दूत होऊनि कोपायमान ॥ शाप देती तेणेंकरून ॥ कधीं कल्याण न पावे कर्ता ॥ ४४ ॥ उदकाचा भाग दूतांसी ॥ मिळत असे त्या दिवशीं ॥ यास्तव यत्नें दीजे प्रेतासी ॥ न देतां दुःखासी पात्र होई ॥ ४५ ॥ दोन मासांचें मासिक

१ लोकांप्रमाणें वर्तन. २ व्यग्रचित्त. ३ या नांवाचें पुर.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

जेवून ॥ गंधर्वनगरीं करी गमन ॥ तृतीय मासिकाचें अन्न ॥ प्रेत जेवून सुखी होई ॥ ४६ ॥ पुढें शैलांगमीं यमदूत नेती ॥ तेथें प्रेतावरी पाषाण वर्षती ॥ तेणें दुःख पावे अती ॥ छत्रदानें निश्चितीं पीडा हरे ॥ ४७ ॥ चतुर्थ मासिक होतां तेथें ॥ अन्न जेवूनि जाय क्रूरपुरातें ॥ तेथें पंचम मासिकातें ॥ होतां क्रौंचपुरातें जातसे ॥ ४८ ॥ तेथें ऊनषाण्मासिक[2] ॥ करावें अगत्य नेमें देख ॥ तेणेंकरूनियां कांहीं सुख ॥ नागांतका[3] प्रेत पावे ॥ ४९ ॥ ऐसें श्रीभगवंत गरुडासी ॥ कथी सूत सांगे ऋषींसी ॥ विष्ठलसुत साधुजनांसी ॥ माधव भक्तीसीं निवेदीत ॥ ५० ॥ या अध्यायीं षण्मासपर्यंत ॥ यममार्गाची कथा समस्त ॥ ती ऐकोनि यथास्थित ॥ सज्ञान नरें तैसीच कीजे ॥ ५१ ॥ इति श्रीगरुडपुराणे प्रेतकल्पे गरुडनारायणसंवादे मासिकोपाख्याने चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥ ॥

---

१ या नांवाचें नगर. २ सहा महिन्यांपूर्वीचें. ३ गरुडा.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

॥ श्रीगणेशाय नमः ॥ पुन्हां म्हणे लक्ष्मीपती ॥ ऐक गरुडा श्राद्धपद्धती ॥ अ० ५
सहा मासांची होतां समाप्ती ॥ बव्हापदपुराप्रति प्रेत जाई ॥ १ ॥ तेथें आपदा
अनिवार ॥ वैतारणी नदी महादुर्धर ॥ पूयशोणितकर्दमसार[1] ॥ तिचा विस्तार
शत योजनें ॥ २ ॥ नानाजंतुसमाकीर्ण[2] ॥ लोहचंचूंचे पक्षिगण ॥ तटीं तिच्या
विराजमान ॥ वाळू संपूर्ण तप्त जिची ॥ ३ ॥ अपार फेणें डबडबीत ॥ भयानक
अपार दिसत ॥ वृक्षच्छायाविवर्जित ॥ सहस्रशा कैवर्त[3] तेथें असती ॥ ४ ॥
ते प्रेतापुढें येऊनी ॥ नानाप्रकारच्या बोलती वाणी ॥ तूं गोदान स्वहस्तांनीं ॥
अथवा अन्य हस्तांनीं करविलें ॥ ५ ॥ असल्या या नौकेआंत ॥ बैसोनि चलावें
त्वरित ॥ केलें नसल्या या नदीआंत ॥ महाडोहांत बुडोनि जाई[4] ॥ ६ ॥
ऐसें कैवर्त भाषण करिती ॥ यास्तव वैतरणीधेनु विप्राप्रती ॥ विधिपूर्वक ॥ २० ॥
पात्रभूताप्रती ॥ पात्राची गणती ऐक किंचित ॥ ७ ॥ पात्र एक विद्वान्

१ पू व रक्त इत्यादि चिखलाची. २ अनेक प्राण्यांनीं भरलेली. ३ नावाडी. ४ दानास योग्य.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

ब्राह्मण ॥ अथवा करी जो तपाचरण ॥ या सर्व पात्रांत उत्तम जाण ॥ नाहीं शूद्रान्न भक्षिलें जेणें ॥ ८ ॥ सोमपानासमान[1] ब्राह्मणाचें अन्न ॥ अमृतोपम क्षत्रियाचें जाण ॥ सुशील वैश्याचें हविरन्न[2] ॥ आणि शूद्रान्न अन्नसम ॥ ९ ॥ ब्राह्मणान्न जरी न मिळे ॥ तरी क्षत्रियवैश्यांचें चांगलें ॥ शूद्राचें अन्न शुष्क भलें ॥ पक्व बोलिलें उच्छिष्ट निंद्य ॥ १० ॥ ऐसें शास्त्रवेत्ते बोलती ॥ जे विप्र शूद्रान्न भक्षिती ॥ कर्म करितां त्यांचीं पापें जाती ॥ नाहीं निष्कृती[3] पक्वान्न भक्षिल्या ॥ ११ ॥ उपाधीस्तव शूद्र अन्न ॥ ब्राह्मणासी देई आपण ॥ देता घेता दोघेजण ॥ नरक दारुण भोगिती ॥ १२ ॥ शूद्रान्न ब्राह्मणास्तव ॥ पचन करी द्विजाधम मानव ॥ अनुमोदन देता भक्षिता ते सर्व ॥ नरक बहुत भोगिती ॥ १३ ॥ तस्मात् सर्व शूद्रजनीं ॥ आमान्न[4] द्यावें ब्राह्मणालागुनी ॥ महायज्ञाचें फळ इतुकेनी ॥ पावे निदानीं खगेश्वर ॥ १४ ॥ संनिकृष्ट[5] विद्वान्

१ यज्ञांतील सोमरस. २ हविष्यान्न. ३ परिहार. ४ कोऱ्या अन्नाचा शिधा. ५ जवळ.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

ब्राह्मण ॥ त्याचें न करावें [1]अतिक्रमण ॥ ज्वलित अग्नि टाकून ॥ न कीजे हवन
भस्मामाजी ॥ १५ ॥ न कीजे ब्राह्मणातिक्रम ॥ [2]आचारदूषित विप्र परम ॥
आचारेंच नाहीं उत्तम ॥ अलंकृत परम तपोविद्येनें ॥ १६ ॥ केवळ विद्या केवळ तप ॥
एकेंच नाहीं पात्ररूप ॥ दोन्ही असती तें स्वरूप ॥ ब्रह्मरूप पात्र तेंचि ॥ १७ ॥
[3]महामंत्रमात्र अध्ययन ॥ तो पवित्र आचारसंपन्न ॥ नाहीं पवित्र चतुर्वेदी ब्राह्मण ॥
सर्व भक्षण सर्व विकी जो ॥ १८ ॥ पात्र लक्षणहीन जरी ॥ तरी पात्रपंक्तींत वास
करी ॥ पंक्तीं पावनयोगें पात्रसरी ॥ पावत श्रुति [4]उरगारि निश्चयें ॥ १९ ॥ ब्राह्मणासी
दोन नेत्र ॥ श्रुति स्मृति अति विचित्र ॥ एक नसल्या काणा नर ॥ अंध निर्धार
दोन्ही नसतां ॥ २० ॥ ज्ञानी जो क्रियारहित ॥ तो पशूसमान निश्चित ॥ अज्ञानी
आणि क्रिया करीत ॥ तोही अंधवत जाणिजे ॥ २१ ॥ पंक्तीं [5]मूर्धनीं जैसा ॥ २१ ॥
ब्राह्मण ॥ तैशा पंक्ती सर्व म्हणोन ॥ यास्तव उत्तम ब्राह्मण पाहून ॥ आद्यस्थान

१ उल्लंघन. २ कर्मभ्रष्ट. ३ वेदाध्ययन. ४ गरुडा. ५ आद्यस्थानीं.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

तयासी द्यावें ॥ २२ ॥ वैतरण्यादिक जीं दानें ॥ असती प्रेतोपकाराकारणें ॥ उत्तम ब्राह्मण महायत्नें ॥ पाहोनि नेमानें पैं द्यावीं ॥ २३ ॥ षण्मासांच्या अवसानीं ॥ द्यावी गाई वैतरणी ॥ नदी तरोनि तो प्राणी ॥ तृप्त मनीं होतसे ॥ २४ ॥ पुढें प्रेत बव्हापदपुरीं ॥ भोजन करोनि दुःखदनगरीं ॥ पावोनि भोजनानंतरीं ॥ नानाक्रंदपुरीं प्रेत जाई ॥ २५ ॥ नानाक्रंदगण पाहुनी ॥ आपणही रडे दीर्घ स्वरांनीं ॥ जीं दानें केलीं स्वहस्तांनीं ॥ तीं महामार्गांनीं सुख देती ॥ २६ ॥ दुष्ट प्रारब्धयोगेंकरून ॥ दानीं विमुख जे नर जाण ॥ ते स्थावराहूनि शोच्यमान ॥ वैनतेया सधन असतांही ॥ २७ ॥ धनवंत आणि अदातार ॥ दरिद्री आणि अतपस्वी नर ॥ चांडाल दोघे समग्र ॥ भाषावेव्हार करूं नये ॥ २८ ॥ तेथें मासिक जेवुनी ॥ सुतप्तनगरीं तृप्त होउनी ॥ जाई तेथें अवश्य दहनीं ॥ अति पीडा प्राणी पाव-

१ शेवटीं. २ पुष्कळ आपत्तीचें. ३ आक्रोशी लोकांचे समुदाय. ४ दगडाहून नीच.
५ श्रीमान् असून दानधर्म न करणारा. ६ भक्ति न करणारा.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

तसे ॥ २९ ॥ तेथें उपानह[1] वस्त्र छत्र ॥ गृह आराम[2] सुरालय[3] विचित्र ॥ वृक्ष पाणी विंतानादि[4] प्रकार ॥ केले असतां नर सुख पावे ॥ ३० ॥ एकादशमासीं रौद्रपुर ॥ जेवूनि तेथें पयोवर्ष नगर ॥ पावे तेथें मेघ अनिवार ॥ कोपें अपार वर्षती ॥ ३१ ॥ ऊर्णावस्त्रदानेंकरून ॥ ती पीडा होय निवारण ॥ पुढें शीताढ्यपुरीं जाण ॥ द्वादश मासान जातसे ॥ ३२ ॥ तेथें शीतें पीडा पावत ॥ कंपायमान रुदन करीत ॥ आपुले बांधव आठवीत ॥ म्हणे उपकार करीत कोणी तरी ॥ ३३ ॥ कापसाचा आंगरखा करूनी ॥ दान दिधल्या शीतनिवारणीं ॥ सुख पावतों मी स्वहस्तांनीं ॥ सुवस्त्रें आणूनि दिलीं असतां ॥ ३४ ॥ मी माझ्या अभिमानदोषें ॥ अथवा पाप-दूषणमिसें ॥ किंवा देशकालादिवशें ॥ अश्रद्धादोष केल्याही न फळती ॥ ३५ ॥ उपकाराच्या लोभेंकरून ॥ किंवा संकटीं पडतां जाण ॥ केलीं असतांही आपण ॥ अश्रद्धेनें न फळती मातें ॥ ३६ ॥ यास्तव दान श्रद्धायुक्त ॥ केलें असतें शास्त्रोक्त ॥

१ जोडा. २ बगीचा. ३ देवालय. ४ छत, मंडप आदि. ५ लोंकरीचें वस्त्र.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

तें होतें उपकारभूत ॥ दुःख बहुत होतां येथें ॥ ३७ ॥ ऐसें प्रेत चिंतातुर ॥ मग पाहे दिशा समग्र ॥ परी शीताचा परिहार ॥ न दिसे समोर कोठेंही ॥ ३८ ॥ यास्तव प्रेतोद्देशें दान ॥ बांधवीं करावें आपण ॥ देहोपयोगी संपूर्ण ॥ पदार्थ याहोन तेचि द्यावे ॥ ३९ ॥ मग तेथें सुखें जेवुनी ॥ बहुभीतिपुरा जाई प्राणी ॥ अन्वर्थ नाम त्यालागुनी ॥ बहु भीति धरूनि कांपे प्रेत ॥ ४० ॥ तें चित्रगुप्ताचें नगर ॥ तेथें नाना नरक घोर ॥ कर्म करिती धन्य ते नर ॥ वैराग्य निरंतर असे ज्यांसी ॥ ४१ ॥ शिवविष्णूंची भक्ती करिती ॥ ते या लोकासी न पावती ॥ ऐसें प्रेत बहुतां रीतीं ॥ प्रलापितां ताडिती यमदूत ॥ ४२ ॥ मग म्हणती शंकर-विष्णूंची ॥ भक्ती केली नाहीं साची ॥ आशा धरोनि भार्यापुत्रांची ॥ बांधवांचीं पोशिलीं कुटुंबें ॥ ४३ ॥ ऐशा उपाधीनें दान ॥ नाहीं केलें तूं पापियान ॥ त्याचें फळ हें दारुण ॥ भोगिसी अनुदिन तूं प्रेता ॥ ४४ ॥ ऐसें बोलोनि यमदूत ॥

---

१ थंडीचा. २ नांवाप्रमाणें भयंकर. ३ शोक करीत असतां. ४ अडचणीनें. ५ प्रतिदिवशीं.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

पूर्णसंवत्सरीं धर्मराजपुरींत ॥ संयमिनीप्रति नेती प्रेत ॥ यमाचे दूत खगपती ॥ ४५ ॥ ऐशा यममार्गींच्या यातना ॥ पंचमाध्यायीं कथिल्या जाणा ॥ यास्तव करोनि शिवविष्णुभजना ॥ चुकवा यातना यमलोकींच्या ॥ ४६ ॥ या लोकीं करितां आळस ॥ दुःख होय यमलोकास ॥ म्हणोनि नित्य कर्मास ॥ सज्ञान मानुषें करीत जावें ॥ ४७ ॥ ऐसें निरूपण गरुडाप्रती ॥ स्वमुखें करी लक्ष्मीपती ॥ सूत सांगे नैमिषारण्याप्रती ॥ शौनकादि ऐकती माधव म्हणे ॥ ४८ ॥ इति श्रीगरुडपुराणे प्रेतकल्पे गरुडनारायणसंवादे प्रेतयमपुरप्रवेशो नाम पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

१ यमलोकाला. २ यमलोकाचें नांव.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

॥ श्रीगणेशाय नमः ॥ भगवंत म्हणे गरुडा परियेसीं ॥ शत योजनें विस्तार यम-
नगरीसी ॥ वेष्टित हेमप्राकारेंसीं ॥ त्यासी चार वेशी पैं असती ॥ १ ॥ अगा गरुडा
भाग्यवंता ॥ पुरी रथ्याचत्वर[1] शोभिता ॥ सप्तभूमीकरोनि व्याप्ता ॥ गृहसौध[2]-
युक्ता विराजित ॥ २ ॥ शाळा मयूर हंस चक्रवाक ॥ चकोर रावे आणि पिक ॥
कदली चंपक अशोक ॥ जंबू कदंब चूत पैं ॥ ३ ॥ आणिक नाना वृक्षेंकरोनी ॥
अत्यंत शोभे संयमिनी ॥ धूपादि वास सर्वां सदनीं ॥ निशिदिनीं सर्वदा ॥ ४ ॥
मृदंग आणि शंख ॥ वीणा रेणुरव अनेक ॥ धर्मस्तुति बंदिलोक ॥ अधर्म जिंक
ऋणती सदा ॥ ५ ॥ चारी दिशा मुनिव्रातेंकरून ॥ मार्ग शोभती निशिदिन ॥
उत्तरद्वार पुरीलागून ॥ दीड योजन उंच असे ॥ ६ ॥ रुंदी असे एक योजन ॥
स्फटिकाट्टाल शोभायमान ॥ स्वर्णचित्रकपाट गोपुरान ॥ शतपताकान संकुल
सदा ॥ ७ ॥ अनेक जनसमायुक्त ॥ नानारत्नें विराजित ॥ त्या स्थानीं देव

---

१ सोन्याच्या तटानें. २ मार्ग, अंगण. ३ राजवाडा. ४ कलामंदिरें. ५ स्फटिकाचे कळस.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

विख्यात ॥ श्रवण निश्चित जाण पां ॥ ८ ॥ ते देव दिव्य सिंहासनावरी ॥ बैसले चवरी ढाळिती उपरी ॥ प्रसन्नरूप दिनरात्रीं ॥ कमलायतनेत्री[1] ते सर्व ॥ ९ ॥ भूलोकावरून मनुष्य येती ॥ प्रेतशरीरी श्रांत दिसती ॥ पूर्ण संवत्सर क्लेश अती ॥ प्राणी भोगिती यममार्गीं ॥ १० ॥ हाहाभूत[2] क्षुधाविष्ट ॥ दूर गमनाचे महाकष्ट ॥ आणिक यातना यथेष्ट ॥ यमदूत स्पष्ट करिती सदा ॥ ११ ॥ ऐसिया जीवासी देखोनी ॥ हितैषी ते करुणेंकरूनी ॥ शुभ वाक्यें जीवालागुनी ॥ उपदेशूनि आश्वासिती ॥ १२ ॥ मग ते त्या जीवाचें कर्म ॥ चित्रगुप्तासी सांगती निर्भ्रम[3] ॥ तयाचें पुण्य उत्तम ॥ ब्रह्मवाक्याप्रमाणें निवेदिती ॥ १३ ॥ भूलोकीं जरी पूजन ॥ तार्क्ष्यार्था श्रवणांचें घडेल जाण ॥ तरी सर्व पातकांचें दहन ॥ पूजाप्रभावान होत पैं ॥ १४ ॥ नाहीं पूजन घडलें जरी ॥ ते प्रेतातें घेऊनि सत्वरीं ॥ धर्मराजाचे सभांतरीं ॥ नेत लवकरी श्रवणदेव[4] ॥ १५ ॥ तेथें जे पुण्यवंत असती ॥ त्यांसी

१ कमलपत्राकार नेत्राचे. २ हाहाकार करणारे. ३ निःसंशय. ४ श्रवण नांवाचे तेरा देव.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

यम दिसे रमापती ॥ घनश्याम चतुर्बाहुमूर्ती ॥ पिंवळा निश्चिती पीतांबर ॥ १६ ॥
शंख गदा आणि चक्र ॥ पद्मादियुक्त चारी कर ॥ वनमाला विराजित सुंदर ॥
वदनचंद्र प्रसन्न तो ॥ १७ ॥ ऐसें विष्णुरूप सुंदर ॥ पाहोनि प्राणी नमस्कार ॥
घालूनियां स्तुति अपार ॥ रक्षीं निरंतर ऐसें वदती ॥ १८ ॥ धर्मराज त्यांतें
देखूनी ॥ कीं ते सत्यवादी आणि मौनी प्राणी ॥ परोपकारकर्ते अनुदिनीं ॥
परदारा स्वप्नीं न भोगिती जे ॥ १९ ॥ परद्रोह परद्रव्यीं विमुख ॥ प्रियवादी
दर्शश्राद्धनेमक ॥ मातृपितृभक्ति सम्यक ॥ गुरुसेवा अनेक जे करिती ॥ २० ॥
देवपूजा निरंतर जे करिती ॥ पंचयज्ञ नित्य आचरती ॥ स्नान तर्पणादि यथा-
पद्धती ॥ द्वादशाक्षर जपती मंत्र सदा ॥ २१ ॥ तुलसीसेवा करिती नित्य ॥ विप्र-
पादोदक सेवीत ॥ परपीडानिवारक दान्त ॥ अव्यसनी शांत जे प्राणी ॥ २२ ॥
आणि कर्ते भूमिदान ॥ तैसेचि करिती कपिलादान ॥ वेदांत आणि पुराण-

१ विष्णूसारखा. २ स्वधर्माभिमानी. ३ अमावास्येचें श्राद्ध. ४ ब्रह्मयज्ञादि. ५ शांत स्वभावाचे.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

श्रवण ॥ तीर्थीं स्नान आदरें करिती ॥ २३ ॥ शिवपूजापरायण ॥ शाक-अन्न-जलदान ॥ तक्रादि गोरसदान ॥ विनतानंदना जे कर्ते ॥ २४ ॥ ते प्राणी पुण्यवंत ॥ पिंडज[1] देह यमलोकीं टाकीत ॥ दिव्य देह धर्मराज देत ॥ पुण्यवंत नर देहांतर पावे ॥ २५ ॥ स्वर्गादि लोक पावुनी ॥ अनेक भोग भोगिती अनुदिनीं ॥ आतां पापकर्मी जो प्राणी ॥ यमपाशांनीं बद्ध जो कां ॥ २६ ॥ तो धर्मराजासी कैसा पाहात ॥ विक्राळ आणि भयानक अत्यंत ॥ महाहनु दीर्घदंष्ट्रायुक्त ॥ दंडहस्त आणि कर्कश ॥ २७ ॥ लोमशतनू[2] भीषणास्य[3] ॥ भयानक दाढा विशेष ॥ भयानक सभा देखोनि त्रास ॥ पाहोनि अंगास कंप सुटे ॥ २८ ॥ मग तयाच्या पातकाप्रमाण ॥ चित्रगुप्ताचे मतेंकरून ॥ नरकयोनी देती दारुण ॥ अति कठिण भोगावयासी जे ॥ २९ ॥ चौऱ्यायशीं नरक तेथें असती ॥ अगा तार्क्ष्या जे महापापें करिती ॥ अट्ठावीस नरक तयांप्रती ॥ नामें निश्चिती त्यांचीं ऐक ॥ ३० ॥

१ पिंडांनीं बनलेला. २ केंसाळ शरीर. ३ भयंकर तोंडाचे.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

तामिस्र आणि अंधतामिस्र ॥ रौरव महारौरव घोर ॥ कुंभीपाक आणि कालसूत्र ॥ असिपत्र[1] खगाधिपा ॥ ३१ ॥ अंधकूप सूकरमुख ॥ तैसाचि संदंश[2] कृमिभोजक ॥ वैतरणी शाल्मली वज्रकंटक ॥ तप्तभूमि अनेक यातना जेथें ॥३२॥ लालाभक्षक विशसन[3] ॥ पूयोद[4] प्राणरोधक जाण ॥ सारमेय वीचीरय[5] गहन ॥ पानपात्र दारुण तैसाचि ॥ ३३ ॥ रक्षोदन दंदशूक ॥ क्षार चिखलनिरोधक ॥ पर्यावर्त सूचीमुख ॥ अष्टाविसावा देख शूलवेध ॥ ३४ ॥ जे करिती परस्त्री-गमन ॥ आणि दुसऱ्याचें हरिती धन ॥ ते प्राणी अन्नोदकविहीन ॥ पावती ताडन तामस नरकीं ॥ ३५ ॥ आणिक जे वंचना करिती ॥ बळेंचि परद्रव्य हरिती ॥ नष्टदृष्टि ते पापमती ॥ अंधतामिस्र गति त्यांसी प्राप्त ॥ ३६ ॥ शरीराच्या अभिमानेंकरूनी ॥ भूतद्रोह संपादिती प्राणी ॥ स्वशरीरें पोषिती अभिमानी ॥

---

१ तीक्ष्ण धारांच्या खड्गांचा नरक. २ जेथें तप्त सांडशीनें मांस तोडतात. ३ दांभिकाचें आंग फोडणारे. ४ पुवानें भरलेला. ५ प्राण्यांचा विरोध.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

महारौरवस्थानीं ते जाती ॥ ३७ ॥ परद्रोहें कुटुंबपोषण ॥ करी त्यासी रौरव- स्थान ॥ द्रोहानुसारें पक्षी येऊन ॥ शरीर भेदन करिती बळें ॥ ३८ ॥ पशु- पक्षी जे मारिती ॥ त्यांसी कुंभीपाकीं घालिती ॥ तप्त तैलामाजी न्हाणिती ॥ ब्रह्मद्रोहाची गति ऐकें गरुडा ॥ ३९ ॥ कालसूत्र महानरक ॥ कटाह[1] तप्ताम्रमय देख ॥ खालीं वरी असे देख अर्क ॥ तेजें देख जळतसे ॥ ४० ॥ वेदमार्गाचा करूनि त्याग ॥ पाखंडें सेवी अनेक ॥ त्यासी असिपत्रवनीं सवेग ॥ नेवोनि अंग छेदिती ॥ ४१ ॥ अदंड्यासी[2] जे दंड करिती ॥ विप्राचा देह दुखविती ॥ सूकरमुख तयांप्रती ॥ पीडा निश्चिती इक्षुदंडवत ॥ ४२ ॥ कीटकमत्कुणसंहारक ॥ त्यासी अंधकूप नरक ॥ तेथेंही जंतू अनेक ॥ दंशिती प्रापक क्षुत्तृण्मूर्च्छी[3] ॥ ४३ ॥ वैश्वदेवहीन जे नर ॥ त्यांसी भोजन समग्र ॥ कृमीही भक्षिती सर्व शरीर ॥ आपण सत्वर तयांसी भक्षी ॥ ४४ ॥ ब्राह्मणाचें

१ कढई. २ निरपराध्यास. ३ भुकेनें आणि तहानेनें व्याकुळता.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

हरिती धन ॥ त्यांचें मांस तप्तशस्त्रेंकरून ॥ तोडिती यमदूत जाण ॥ परस्त्रीगमन जो करी ॥ ४५ ॥ अथवा नारी असे जार ॥ लोहमूर्ति अग्नितप्त समग्र ॥ त्यासी आलिंगवी सूर्यपुत्र ॥ जो नर करी अज्ञान ॥ ४६ ॥ नानापरी पाखंडसेवन ॥ जो नर करी अज्ञान ॥ वैतरणी नदीमाजी त्यासी पतन ॥ पूयविण्मूत्रान पूर्ण जी कां ॥ ४७ ॥ रजस्वलेचा संपर्क करिती ॥ स्नान शौच न आचरती ॥ पूयपूर्ण समुद्रांत घालिती ॥ भास्कर निशापति जंव असे ॥ ४८ ॥ जे आचरती दंभयज्ञ ॥ वृथा पशूचें करिती हनन ॥ तेही भोगिती नरक दारुण ॥ मृगयामिषान जंतु वधिती ॥ ४९ ॥ एक लक्ष लावूनि निरंतर ॥ बाण सोडिती निर्दय नर ॥ तैसेंचि त्याचें समग्र शरीर ॥ यमकिंकर खोंचिती बळें ॥ ५० ॥ अग्नि लावी आणि घाली विष ॥ चोरी करी रात्रंदिवस ॥ शतावधि श्वानें त्यास ॥ डसती मांस भक्षावया ॥ ५१ ॥ तेणेंकरूनि रुदन ॥

---

१ तापलेला लोखंडाचा पुतळा. २ यम. ३ पू. विष्ठा आणि मूत्र यांनीं. ४ वेध.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

जो करी कूटक्रयपण[1] ॥ कूटसाक्षी[2] देई समजोन ॥ तयासी गहन नरक प्राप्त ॥५२॥
शत योजनें उंच पर्वत ॥ अधोशिरें[3] खालीं ढकलीत ॥ सुरापान जे अधम करीत ॥
तयांचे वांधीत पाय दोन्ही ॥ ५३ ॥ अग्नीमाजी टाकूनि देती ॥ लोहरस पान
करविती ॥ नरनारींची ऐशी गती ॥ निश्चयें खगपति होतसे ॥ ५४ ॥ रूप विद्या
तप वित्त ॥ आणि जन्म होतां ब्राह्मणांत ॥ अभिमानें जे परनिंदा करीत ॥
क्षार कर्दमांत ते पडती ॥ ५५ ॥ अभिचारें[4] हरिती प्राण ॥ राक्षस त्यांसी भक्षिती
जाण ॥ रक्षोगण रुधिरपान ॥ उरगनाशना करिती पें[5] ॥ ५६ ॥ ग्रामांत अथवा
अरण्यांत ॥ गृहांतही जे विश्वासघात ॥ करिती त्यांसी वक काक निश्चित ॥
लोहतुंडें विदारीत शूलप्राय ॥ ५७ ॥ सत्यें अथवा अनृतेंकरूनी ॥ वारंवार युद्धीं
जिंकी प्राणी ॥ तो पडे दंदशूकस्थानीं[5] ॥ पंच वदनांनीं भक्षिती सर्प ॥ ५८ ॥
क्रोधें नेत्र करूनि आरक्त ॥ अतिथियासी विलोकित ॥ वज्रतुंड बक वहुत ॥

१ बनावटी व्यापार. २ खोटी साक्ष. ३ खालीं डोकें करून. ४ जारणमारणानें. ५ सर्पाच्या ठिकाणीं.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

नेत्र फोडिती तयाचे ॥ ५९ ॥ धनव्ययाचे[1] भीतीकरून ॥ जो तिर्यक्[2] करी प्रेक्षण ॥ सर्वांपरी अभिशंकिन[3] ॥ वायस नाशन त्याचें करिती ॥ ६० ॥ जो अग्नीचें न करी सेवन ॥ नावडे ज्यासी धर्माचरण ॥ लज्जेनें नसे ज्यासी भान ॥ व्रत दान कधीं न करी ॥ ६१ ॥ टाकी वर्णाश्रमआचार ॥ विष्णुभक्तीविमुख निरंतर ॥ तो मेल्यावरी नर ॥ महाभयंकर नरक भोगी ॥ ६२ ॥ कल्पपर्यंत नरकभोग ॥ पापानुरूपें भोगावा सांग ॥ लागतो यास्तव अव्यंग ॥ स्मरण सांग माझें कीजे ॥ ६३ ॥ सर्वकाल करितां नामस्मरण ॥ अशेष यातना चुकती जाण ॥ पापरूपी रोग दारुण ॥ भेषज सुलक्षण नाम माझें ॥ ६४ ॥ पूर्ववयीं केलें पातक ॥ उत्तरवयीं भजन सम्यक ॥ करितां सर्व जळे पातक ॥ शेखीं लोक उत्तम मिळे ॥ ६५ ॥ क्रोधलोभविवर्जित ॥ परम धर्म नित्य आचरत ॥ सर्वकाळ सत्य बोलत ॥ असत्यांत जें कां सत्य असे ॥ ६६ ॥ सत्यरूप होय

---

१ द्रव्यखर्चाचे. २ वांकड्या दृष्टीनें. ३ खोटा आरोप करणारा.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

असत्य ॥ असत्यरूप होई सत्य ॥ कित्येक असत्यें स्वर्गीं जात ॥ कित्येक भोगीत सत्य नरक ॥ ६७ ॥ वैनतेया तुजलागून ॥ स्पष्ट करितों निरूपण ॥ गोब्राह्मणांचें हित जाण ॥ हिंसा सुलक्षण वर्णीं याची ॥ ६८ ॥ आणि स्त्रियांचें प्रोत्साहन ॥ वरकन्येची कीर्ति सुलक्षण ॥ आणि जेथें सर्वस्वनाशन ॥ प्राणहनन प्राप्त झालिया ॥ ६९ ॥ इतुक्या स्थानीं बोलतां असत्य ॥ तेंचि स्वर्गीं होतसे सत्य ॥ यालागीं बोलावें प्रिय हितें[2] ॥ प्रियविरहित बोलूं नये ॥ ७० ॥ सभेमाजी न कीजे गमन ॥ गेल्यासी बोलावें समजोन ॥ बोलतां अबोलतां पाप गहन ॥ आहे म्हणोनि न जावें सभेसी ॥ ७१ ॥ व्रतबंध[3] वृषोत्सर्ग ॥ प्रायश्चित्तचिकीर्षक[4] ॥ शास्त्रविरहित बोलतां देख ॥ ब्रह्मघातक तो होई ॥ ७२ ॥ न पुसतांही यथातथ्य ॥ पुशिल्या धर्म सांगिजे समस्त ॥ धर्मज्ञ बोलावया निश्चित ॥ नियुक्तानियुक्त[5] योग्य असे ॥ ७३ ॥ क्रूर अथवा कठोर ॥ खळ

१ मरण. २ हितकारक. ३ मौंजीबंधन. ४ प्रायश्चित्त करूं इच्छिणारा. ५ खरेंखोटें. ६ धर्माधिकारी.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

भूतद्रोही शठ नर ॥ ते गंगातटवासें[1] निरंतर ॥ पावन सत्वर पैं होती ॥ ७४ ॥
शांत स्थिर आणि दान्त ॥ दयालु आणि क्षमावंत ॥ प्रियवादी संतोषयुक्त ॥
मम पुराप्रत हे येती ॥ ७५ ॥ जे करिती नित्य स्नान ॥ आणि करिती अन्नदान ॥
क्षुधित पात्र अन्नासी जाण ॥ तृषित सुलक्षण जळासी पात्र ॥ ७६ ॥
वस्त्रदानासी नग्न पात्र ॥ धनदानासी ऋषिवर ॥ कष्टें मिळवूनि द्रव्य समग्र ॥
घरीं पुरोनि ठेविती ॥ ७७ ॥ परोपकारा कधीं न लाविती ॥ ते मेल्यावरी
पिशाच होती ॥ स्वगृहामाजी वास करिती ॥ कदा न सोडिती धनहेत ॥ ७८ ॥
ऐसे जे सद्धर्मविमुख[2] ॥ त्यांचा ऐसा प्रकार देख ॥ जे आपुलें धन सकळिक ॥
धर्मार्थ अनेक वेंचिती सदा ॥ ७९ ॥ ते सर्व मनुष्यरूपेंकरून ॥ माझे अंश
असती जाण ॥ ते मेल्यावरी माझें स्थान ॥ पावती जाण खगपती ॥ ८० ॥
या षष्ठाध्यायीं निरूपण ॥ नरकसंख्या सांगितली पूर्ण ॥ प्रत्येक यातना

---

१ गंगातीरीं राहिल्यानें. २ चांगल्या धर्माकडे विन्मुख.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

दारुण ॥ अनुक्रमान निवेदिल्या ॥ ८१ ॥ हें पाहोनि ऐकोनी ॥ पाप न आचरावें मनुजांनीं ॥ माधव निवेदी गरुडालागुनी ॥ सूत मुनींप्रति माधव म्हणे ॥ ८२ ॥ ॥ इति श्रीगरुडपुराणे प्रेतकल्पे गरुडनारायणसंवादे नरकवर्णनं नाम षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ओव्या ॥ ८२ ॥ ॥ छ ॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

॥ श्रीगणेशाय नमः ॥ भगवंत म्हणे गरुडाप्रती ॥ पुन्हां ऐकें कर्मगती ॥ अधर्मे अहितप्राप्ती ॥ यमदंड निश्चिती होतसे ॥ १ ॥ शास्त्रावरी नसे भक्ती ॥ तो नास्तिक जाण निश्चिती ॥ त्यासीं भाषण करितां नरकप्राप्ती ॥ प्राणियांप्रती होतसे ॥ २ ॥ पुन्हां सर्व धर्मांचें सार ॥ महावाक्यें ऐकें खगेंद्र ॥ मद्भक्ति करिती अहोरात्र ॥ स्वर्गद्वार ते सुख पावती ॥ ३ ॥ मागुती आलिया जन्मासी ॥ सत्संग घडे दिनानिशीं ॥ महाधर्म सत्संग परियेसीं ॥ स्वर्ग तुळणेसी तुळे सदा ॥ ४ ॥ कुसंग तेंचि महापाप जाण ॥ महानरक त्यासी अभिधान ॥ यास्तव प्रयत्नेंकरून ॥ असत्सेवन करूं नये ॥ ५ ॥ साधूंचें करावें सेवन ॥ तें सद्गती स्वर्गस्थान ॥ आतां पापचिन्हित जन्म जाण ॥ त्यांचें विंदान परियेसीं ॥ ६ ॥ अनृतवादी आणि पिशुन ॥ अनिबद्ध करी प्रलापन ॥ मृगपक्ष्यांमाजी जनन ॥ परदारासेवन जो करी ॥ ७ ॥ आणिक असे अदत्त ॥ तो जन्मे रोगसंयुक्त ॥ हिंसक प्राणी जे

---

१ नांव. २ परिणाम. ३ चहाडखोर. ४ अमर्याद. ५ कंजूष.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

जगांत ॥ ते स्थावरांत जन्म घेती ॥ ८ ॥ निद्रालू क्रूर लुब्धक ॥ नास्तिक तैसे वंचक[2] ॥ प्रमादी भिन्नवृत्ति देख ॥ तिर्यंचांमाजी[3] सम्यक जन्म त्यांसी ॥ ९ ॥ मृग उष्ट्र श्वान सूकर ॥ ब्रह्महत्यारियासी योनी उष्ट्र ॥ पुल्कस[4] वैनतेया खर ॥ सुरापी नर जन्म पावे ॥ १० ॥ कृमि कीटक आणि पतंग ॥ स्वर्णहर्त्यासी जन्म देख ॥ तृण गुल्म लता सम्यक ॥ गुरुतल्पक क्रमेंचि जन्मे ॥ ११ ॥ अन्नहर्ता याची अन्न ॥ वाणी चोरी तो मूक जाण ॥ धान्यहर्ता रक्तांग संपूर्ण ॥ तैसाचि पिशुन दुर्गंधि-मुख ॥ १२ ॥ तैलहर्ता तेली होत ॥ चहाडीकर्त्याच्या मुखासी दुर्गंधि बहुत ॥ पत्रशाखा चोरितां किंचित ॥ मयूर होत अरण्यामाजी ॥ १३ ॥ जरी चोरिलें गंधद्रव्य ॥ तरी पावे चिचुंदरीकाय[5] ॥ धान्य चोरितां मूषकान्वय ॥ यान रमणीय चोरितां उंट ॥ १४ ॥ फळ चोरितां होई वानर ॥ काक होई पाक चोरणार ॥ मधु चोरितां मक्षिका क्रूर ॥ फळें गृध्र होतसे ॥ १५ ॥ गो चोरितां गोधाँयोनी ॥

१ वृक्ष – पाषाणादिकांमध्यें. २ दुष्ट. ३ पक्ष्यांत. ४ चांडाळ. ५ सुगंध पदार्थ. ६ शरीर. ७ घोरपड.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अग्नि चोरितां बकयोनी ॥ चित्र वस्त्रें श्वापित[1] योनी ॥ चिरि[2] योनी लवण चोरितां ॥ १६ ॥ जो यांचा संसर्ग करी ॥ तो त्यांचा फलभागी निर्धारीं ॥ यास्तव दुष्टसंग क्षणभरी ॥ न कीजे सर्पारि रेहस्य[3] हें ॥ १७ ॥ अग्नि लाविता आणि बाळघाती ॥ स्त्रीघात करी मूढमती ॥ या सर्वांचा सांगाती ॥ जो साक्ष भौंरती अनृत वदे ॥ १८ ॥ जो हस्ताचे ठायीं घे खापर ॥ विनासिक गलत्कुष्ठ शरीर ॥ अंध होऊनि शत्रूचें अंगार[4] ॥ मिथ्या साक्ष देणार पावतसे ॥ १९ ॥ जें पाप तीर्थ न दवडीत ॥ तें पाप साधुदर्शनें जात ॥ साधूंनीं फार केलें पुनीत ॥ माझिया पदातें बहु आले ॥ २० ॥ व्याध पूतना आदिकरूनी ॥ असुर कंसादिक जनीं ॥ साधूंचे समागमेंकरूनी ॥ गेले तरोनी भवसिंधू ॥ २१ ॥ साधूंचे संगाचा लव तुळणेसी ॥ न तुळे स्वर्ग परियेसीं ॥ मुक्ति न पावे साम्यतेसी ॥ यास्तव सर्वांशीं उत्तम साधुसंग ॥ २२ ॥ सर्व यज्ञ सर्व दान ॥ सर्व तीर्थें व्रताचरण ॥ मी सर्वां घटीं असें

१ सालिंदर. २ चिमणी. ३ तात्पर्य. ४ वाणी. ५ गृह.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

पूर्ण ॥ तैसाचि जाण माझा भक्त ॥ २३ ॥ मी ज्ञानी मी निर्गुण ॥ रूप मुख माझेंचि जाण ॥ आनंददेह मी धरोन ॥ पन्नगाशना[1] फिरतसें ॥ २४ ॥ मी एक आकाशवत ॥ घटमठीं असें व्याप्त ॥ घटभंगें घटाकाश[2] नासत ॥ मी तैसाचि शाश्वत देहभंगें ॥ २५ ॥ कर्दळीस्तंभाचियेपरी ॥ मनुष्यदेह असे निर्धारीं ॥ निःसार निश्चयें पन्नगारी ॥ जलबुद्बुदसरी जाणिजे ॥ २६ ॥ पंचतत्त्वांची[3] काया होत ॥ मागुती पंचतत्त्वीं मिळत ॥ जीं कर्में केलीं प्रकृत ॥ तेणेंचि होत बद्ध प्राणी ॥ २७ ॥ ऐसिया जीवासी मजवांचून ॥ नसे सोडविता अन्य जाण ॥ मृत्यु जन्म देहासहवर्तमान ॥ अद्य[4] शंतवर्षान निश्चयें ॥ २८ ॥ अगा हे साधो पन्नगारी ॥ त्वां प्रश्न केला मज निर्धारीं ॥ मेलिया जीवासी परलोकाभीतरी ॥ और्ध्वदेहिकसामग्री कैसी पावे ॥ २९ ॥ आश्चर्य मज वाटे अत्यंत ॥ मनुष्याचीं चेष्टितें[5] बहुत ॥ प्रत्यक्ष पाहात असतां मृत ॥ अन्य नाहीं भीत मरणभयें ॥ ३० ॥ त्यांचें धन हरावया जाण ॥ उगाचि कर्में करिती

१ गरुडा. २ घटांतील पोकळी. ३ पंचमहाभूतांची. ४ आज किंवा शंभर वर्षांनीं. ५ कृत्यें.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

जाण ॥ माया अनृत दंभेंकरून ॥ जनांसी करून दाविती ॥ ३१ ॥ पुत्र पत्नी आणि जननी ॥ पिता सुख पावे धनेंकरूनी ॥ हीं माझीं भाषणें ऐकूनी ॥ जनांच्या मनीं भीती न उपजे ॥ ३२ ॥ काय करील चतुर वक्ता ॥ जेथें नाहीं सावध श्रोता ॥ यास्तव एकचित्तें तत्त्वता ॥ माझ्या वाक्यार्था परिसिजे ॥ ३३ ॥ अंतकाळ जहालियावरी ॥ प्रेतकार्याचा काळ अवधारीं ॥ एकादश दिवस निर्धारीं ॥ मुख्य पन्नगारी जाणिजे ॥ ३४ ॥ तैशाचि सकळ क्रिया जाण ॥ वृषोत्सर्ग आदिकरून ॥ सूतक मृतकादि जाण ॥ एकादश दिन प्रशस्त पैं ॥ ३५ ॥ श्राद्धकार्यासी पुत्र प्रशस्त ॥ त्याच्या अभावीं भार्या युक्त ॥ तिच्या अभावीं कनिष्ठ बंधु युक्त ॥ तदभावीं युक्त ज्येष्ठ भ्राता ॥ ३६ ॥ तो नसल्या भ्रातृपुत्रान ॥ क्रिया समस्त करावी जाण ॥ मावशी-आतेपुत्रक समान ॥ मातुलाचे नंदन आत्मबांधव ॥ ३७ ॥ एवं मातृ पितृ जाण ॥ सप्त पुरुष सपिंडविधान ॥ तदूर्ध्व सप्त सोदक म्हणवोन ॥

---

१ खोटें. २ वसु सोडणें. ३ आशौच. ४ आपल्यापासून मागील सात पुरुष. ५ आठव्यापासून चवदापर्यंतचे.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

पन्नगाशना जाणिजे ॥ ३८ ॥ क्रिया कीजे आत्मबंधूनें ॥ किंवा पितृबंधूंनीं जाणें ॥ आणि करितां मातुलानें ॥ शिष्यगुरूनें अवश्य कीजे ॥ ३९ ॥ श्वशुरानें अथवा जामातानें ॥ क्रिया करावी शालकानें ॥ स्वजातीय अथवा गोत्रजानें ॥ नसतां कोणी राजानें कीजे ॥ ४० ॥ ऐसाचि प्रकार स्त्रीचा समस्त ॥ क्रिया कीजे शास्त्रयुक्त ॥ ब्रह्मचाऱ्यानें प्रेतकृत्य ॥ पिता मेल्यातें सुखें कीजे ॥ ४१ ॥ संन्याशानें न कीजे किंचित ॥ करितां महापातकी होत ॥ उपनीत[1] अथवा मुंजीरहित ॥ अधिकारी सुत पितृकार्या ॥ ४२ ॥ प्रेतश्राद्ध न कीजे गृहीं ॥ तें बाहेर कीजे जेथें शुद्ध मही ॥ पंचवर्षाधिक कर्ता पाहीं ॥ एकादशान्हीं[2] दैर्श जरी ॥ ४३ ॥ असला आणि आहिताग्नी[3] ॥ क्रिया कीजे अनुक्रमांनीं ॥ सपिंडी कीजे स्वसदनीं ॥ यास्तव वचनीं शास्त्र वदे ॥ ४४ ॥ संन्यासी मेलियावरी ॥ पुत्रें पार्वणें[4] श्राद्ध कीजे निर्धारीं ॥ एकादश दिनीं पन्नगारी ॥ शास्त्रप्रकारीं कीजे पुत्रें ॥ ४५ ॥ नाहीं पिंडक्रिया

१ मुंज झालेला. २ अमावास्या. ३ अग्निहोत्री. ४ बाप, आजा, पणजा यांना उद्देशून श्राद्ध.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

त्यास ॥ नाहीं आशौचाचा लवलेश ॥ नाहीं शोकासी अवकाश ॥ विष्णुरूपी सरस म्हणोनियां ॥ ४६ ॥ पुत्रवती सवाशीण मरतां नारी ॥ तिचा वृषोत्सर्ग न कीजे निर्धारीं ॥ विध्युक्त गोप्रदान द्विजकरीं ॥ उरगारी अवश्य दीजे ॥ ४७ ॥ एक मतें कीजे वृषोत्सर्ग ॥ एकादश दिनीं केल्या सांग ॥ प्रेतत्व स्थिर कोटि श्राद्ध देख ॥ केल्या सम्यक न उद्धरे ॥ ४८ ॥ श्लोक ॥ एकादशाहे प्रेतस्य यस्य नोत्सृज्यते वृषः ॥ प्रेतत्वं सुस्थिरं तस्य श्राद्धैर्दत्तैस्तु कोटिभिः ॥ १ ॥ ऐसें वृषोत्सर्गमाहात्म्य ॥ जाणोनि अवश्य करावा उत्तम ॥ गरुडासी कथी पुरुषोत्तम ॥ शौनकादि ऋषींना सूत कथी ॥ ४९ ॥ तेचि प्राकृत वाणी युक्त ॥ सप्तमाध्यायीं श्रद्धायुक्त ॥ कर्मनिष्ठादि प्राणी बहुत ॥ माधव निवेदीत तयां-प्रती ॥ ५० ॥ इति श्रीगरुडपुराणे प्रेतकल्पे गरुडनारायणसंवादे वृषोत्सर्गकथनं नाम सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

॥ श्रीगणेशाय नमः ॥ पुन्हां भगवंत म्हणे खगपती ॥ ऐकें वृषोत्सर्गपद्धती ॥ नारायणबलीची[1] निश्चिती ॥ अनुक्रमें चित्तीं अवधारीं ॥ १ ॥ सर्व तीर्थें आणि कोटि यज्ञ ॥ अश्वमेध गयेसी पिंडदान ॥ महामुक्तिद बोलती सज्ञान ॥ षोडश कला समान वृषोत्सर्गचि ॥ २ ॥ तस्मात् एकादश दिवसीं ॥ बोलावूनि वैदिक ब्राह्मणांसी ॥ त्यांची आज्ञा घेऊनि वृषोत्सर्गासी ॥ विधानेंसीं पैं कीजे ॥ ३ ॥ द्विवर्षाधिक[2] असावा वत्स ॥ आणि रक्तवर्ण असावा त्यास ॥ पुष्ट अंगें असावा विशेष ॥ पाहोनि सरस आणावा तो ॥ ४ ॥ चार वर्षपर्यंत वत्स ॥ संज्ञा शास्त्रीं असे विशेष ॥ एक वर्षाचाही असल्यास ॥ वृषोत्सर्गास योग्य तो ॥ ५ ॥ उभयतांची माता जिवंत ॥ असल्या उत्तम पूजा यथोक्त ॥ वस्त्राभरणसंयुक्त ॥ करावें निश्चित भाग्यवंतें ॥ ६ ॥ आचार्य करावा शास्त्रवेत्ता ॥ औदार्य प्रायश्चित्त विधानता ॥ दशमेऽहनि[3] स्नान विधानता ॥ ग्रामांत सर्वथा

॥ ३३ ॥

१ या नांवाचें अनुष्ठान. २ दोन वर्षांहून अधिक वयाचा. ३ दहाव्या दिवशीं.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

करूं नये ॥ ७ ॥ ग्रामाबाहेर करूनि स्नान ॥ टाकावे श्मश्रु नख वस्त्र जाण ॥ सपिंड जे असती लहान ॥ त्यांसी वपन कृताकृत ॥ ८ ॥ माता आणि पितर ॥ स्त्रियेनें मेल्या भ्रतार ॥ प्रथमादि विषम दिनीं समग्र ॥ वपनप्रकार निजेच्छया ॥ ९ ॥ गृहशुद्धि पात्रशुद्धी ॥ आणि करोनि वस्त्रशुद्धी ॥ सर्व सामग्री करूनि आधीं ॥ सप्तपंचावधी ब्राह्मण ॥ १० ॥ अथवा बोलावूनि चार ॥ मुद्रिका कुंडल वस्त्रें समग्र ॥ गंध चंदन माल्यादि प्रकार ॥ तांबूल परिकरें पूजिजे ॥ ११ ॥ और्ध्वदेहिक प्रेतकर्म सकळ ॥ ब्राह्मणहस्तें करितां निर्मळ ॥ दुष्ट मृत्यु जाहल्या उतावेळ ॥ नरें नारायणबळी कीजे ॥ १२ ॥ प्रेताच्या मुक्तीकारणें ॥ गरुडा नारायणबळी जाणें ॥ ब्रह्मा विष्णु शिवाकारणें ॥ यम प्रेतनामानें करावा ॥ १३ ॥ पूर्णपात्र सह कलश ॥ स्थापूनि पंच पल्लवांस ॥ हिरण्य मौक्तिक रौप्यास ॥ विद्रुम वज्रास घालोनियां ॥ १४ ॥ हीं पंच रत्नें

१ क्षौरकर्म. २ सात अथवा पांच. ३ कलशावर ठेवण्याची तबकडी. ४ पोंवळें. ५ हिरा.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

आणि वास[1]स ॥ प्रतिमा सुवर्ण रजत विशेष ॥ ताम्र लोह अशक्तास ॥ कर्षमानें विशेष मूर्ति कीजे ॥ १५ ॥ करोनि मूर्तीचें पूजन ॥ पंच श्राद्धें सुलक्षण ॥ आणि पंच धान्यें दान ॥ द्रोणार्धार्ध मान पैं कीजे ॥ १६ ॥ यव व्रीही[3] आणि तिल ॥ माष[4] गोधूम[5] निर्मल ॥ पंच विप्र पाहोनि सुशील ॥ दान तत्काल करावें ॥ १७ ॥ एकादश श्राद्धें कीजे मग ॥ एकोद्दिष्ट विधान सांग ॥ एकादश दानें सम्यक ॥ प्रेतप्रीत्यर्थ देइजे ॥ १८ ॥ तेथेंचि सांग पददान ॥ आसन छत्र उपान[6] ॥ मुद्रिका कमंडलू भोजन ॥ भोजनाधार वसन अष्टविध ॥ १९ ॥ आज्य आणि उपवीत ॥ येणें संपूर्ण पददान होत ॥ वृषोत्सर्गीं आदर बहुत ॥ धरोनि प्रेतार्थ करावा ॥ २० ॥ पौष्ण चरू शिजवोन ॥ अधिकारानुसार पिष्टान्न ॥ आचार्यआज्ञेनें वृषपूजन ॥ वत्सिकासह करावें ॥ २१ ॥ स्वर्णशृंग रौप्यखुर ॥ ताम्रपृष्ठ शुभ्र वस्त्र ॥ कंठीं वेष्टावीं समग्र ॥ धरिजे पुच्छाग्र सव्य हस्तें ॥ २२ ॥

१ वस्त्र. २ दोन कुडव. ३ भात. ४ उडीद. ५ गहूं. ६ जोडा, पायतण.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

वृषपृच्छाग्र धरिल्यावर ॥ दक्षिणा तिल कुशाग्र नीर ॥ अमुक गोत्र प्रेतोच्चार ॥
करोनि सत्वर वृष सोडिजे ॥ २३ ॥ तुज तारो सर्व काळ ॥ ऐसें बोलोनि तत्काळ ॥
हेमासहित सलिल[1] ॥ भूमीवरी बहुल[2] समर्पावें ॥ २४ ॥ त्याचा मंत्र संप्रदा-
यान ॥ करावें वृषाचें उत्सर्जन ॥ प्रार्थावा ऐसा वृषरूपेंकरून ॥ धर्म निर्माण
पितामहें केला ॥ २५ ॥ तुझ्या उत्सर्ग[3]प्रभावान ॥ प्रेत स्वर्गपुरा पावे जाण ॥ ऐसी
प्रार्थना करून ॥ आचार्यालागून तो द्यावा ॥ २६ ॥ मग एकादश श्राद्धें करूनी ॥
करावें नारायणबलीलागूनी ॥ बरी कृति संपादुनी ॥ अकरा आणि पंच श्राद्धें मग
॥ २७ ॥ ऐसीं श्राद्धें केलियावरी ॥ वृषोत्सर्ग तदनंतरीं ॥ ऐसेंही मत शास्त्रांतरीं ॥
सुविचारी बोलियेले ॥ २८ ॥ प्रथम श्राद्धीं ब्राह्मणाचें पूजन ॥ सर्वाभरणीं वस्त्रें-
करून ॥ वाहनादि संपदा धन ॥ प्रिय वस्तु अर्पण कराव्या ॥ २९ ॥ ब्राह्मणासी
दिधल्या भक्तियुक्त ॥ शय्या उपस्करांसहित[4] ॥ काष्ठाची करोनि दृढीभूत ॥ स्वग-

---

१ उदक. २ पुष्कळ. ३ सोडल्यानें. ४ उपसाहित्यें.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

श्रेष्ठा देतां प्रेत सुखावे ॥ ३० ॥ रम्य दंतपत्ररचित[1] ॥ हेमपृष्ठी अलंकृत ॥ हंसतुली[2] अन्नयुक्त ॥ उशी पांघरुण तयावरी ॥ ३१ ॥ आणिकही वस्त्रयुक्त ॥ गंधपुष्पादि-वासित ॥ शीर्षस्थानीं कलश जलयुक्त ॥ तांबूलयुक्त करोनि अर्पावी ॥ ३२ ॥ कुंकुम कर्पूरागरु चंदन ॥ दीपिका[3] छत्र उपानह जाण ॥ चामरासन भाजन ॥ पार्श्वभागीं जाण ऐशीं सर्व ॥ ३३ ॥ ठेवूनि सप्त धान्यभरित ॥ पात्र ठेवावें यथो-चित ॥ शृंगारसारिका[4] पूगपात्र[5] कंकत[6] ॥ तांबूलसाहित्य सर्व असावें ॥ ३४ ॥ पादुका[7] अक्षक्रीडा आदर्श[8] ॥ फळें कुसुमें वितान[9] सरस ॥ वस्त्रें भूषणें औषधास ॥ प्रेतोद्देशें समर्पावें ॥ ३५ ॥ जे जे पदार्थ येथें द्यावे ॥ ते ते त्यातें प्राप्त व्हावे ॥ म्हणोनि गरुडा मानवें ॥ सपत्नीक[10] द्विजासी पूजोनी ॥ ३६ ॥ वस्त्रालंकारें करावा पूजित ॥ उदङ्मुख[11] शुचिर्भूत ॥ दाता प्राङ्मुख[12] श्रद्धायुक्त ॥ वैसोनि जाण

॥ ३५ ॥

---

१ हस्तिदंती. २ परांची गादी. ३ समई. ४ दागिन्यांची पेटी. ५ पानसुपारीचें भांडें. ६ फणी. ७ सोंगट्या. ८ आरशी. ९ फुलें. १० छत. ११ दंपत्यास. १२ उत्तरेला तोंड करून. १३ पूर्वेस तोंड करून.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

खगेंद्रा ॥ ३७ ॥ लक्ष्मीनारायणाची मूर्ति करून ॥ सुवर्णमयी[2] तल्पीं स्थापून ॥ सर्वोपचारें पूजा करून ॥ मंत्र पावन ऐसा म्हणावा ॥ ३८ ॥ श्लोक ॥ यथा न कृष्णशयनं शून्यं सागरजातया ॥ शय्या ममाप्यशून्याऽस्तु तथा जन्मनि जन्मनि ॥ १ ॥ लक्ष्मीसह सर्वेशा ॥ निद्रा तूं करीं जगन्निवासा ॥ माझीही शय्या सर्वेशा ॥ शून्य सर्वथा नसावी ॥ ३९ ॥ हें सर्व घडो तव प्रसादान ॥ मग करावें साष्टांग नमन ॥ मग विसर्जावा ब्राह्मण ॥ सुखशय्या-दान ऐशापरी ॥ ४० ॥ विशेष प्रेतशय्येचा विधी ॥ गरुडा ऐकें एकबुद्धी ॥ प्रेतमूर्ति जांबूनदी[3] ॥ शय्येसहित पूजावी ॥ ४१ ॥ मंत्र बोलावा पूर्वप्रमाण ॥ ऊह[3] करावा प्रेतनामान ॥ बहुत दक्षिणा करावी अर्पण ॥ कर्म संपूर्ण व्हावें म्हणोनी ॥ ४२ ॥ शय्यादानाचें महिमान ॥ किती सांगूं विस्तारून ॥ पुरंदरपुरीं[4] यमपुरीं जाण ॥ सुखगमन प्राप्त त्यासी ॥ ४३ ॥ जैसें गृह

---

१ पाठवाशा. २ सुवर्णाची. ३ उच्चार. ४ अमरावतीमध्यें.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

तैशी शय्या ॥ अर्ध आयुष्याचिये कार्या ॥ तिच्या दानें द्विजराया ॥
विमानीं बैसोनियां प्राणी जाई ॥ ४४ ॥ मग तो विमानें संचरत ॥
आभूतसंप्लव जंव होत ॥ तोंवरी तो पुरुष स्वर्गीं वसत ॥ जो महाविद्वान
ब्राह्मण ॥ ४५ ॥ तयानें न घ्यावा हा प्रतिग्रह ॥ घोरें होय निःसंदेह ॥
योगक्षेमाचा व्हावा निर्वाह ॥ असमर्थ असला जरी ॥ ४६ ॥ तरी त्यानें
शंकारहित ॥ प्रतिग्रह घ्यावा विधियुक्त ॥ मग आचरोनि प्रायश्चित्त ॥
पापधौत होइजे ॥ ४७ ॥ ऐसें गरुडासी भगवंत ॥ अष्टमाध्यायीं निरूपण
करीत ॥ सूत शौनकादिकांप्रत ॥ विष्ठलसुत श्रोतयां म्हणे ॥ ४८ ॥
इति श्रीगरुडपुराणे प्रेतकल्पे गरुडनारायणसंवादे शय्यादानमहिमानिरूपणं नाम
अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ओव्या ॥ ४८ ॥ ॥ छ ॥

॥ ३६ ॥

१ गरुडा. २ फिरत. ३ महाप्रलय. ४ दान घेणें. ५ नरकप्राप्ति. ६ चरितार्थाचा. ७ निष्पाप.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

श्रीगणेशाय नमः ॥ शय्यादान झाल्यावरी ॥ पुन्हां गरुडासी मुरारी ॥ तोय-
दानाची[1] थोरी ॥ कथन करिता जाहला ॥ १ ॥ गरुडा एकादश दिवसापासून ॥
यावद्वर्ष होई पूर्ण ॥ प्रतिदिनीं तोयान्नदान ॥ ब्राह्मणासी द्यावें आदरें ॥ २ ॥
आणिकही बहुत दान ॥ पुत्रें करावें भक्तीकरून ॥ वर्षदीप[2] ब्राह्मणभोजन ॥
अवश्य जाण हें कीजे ॥ ३ ॥ स्वगृहीं विष्णुशिवालयीं ॥ अन्न शाकादि प्रत्यहीं ॥
सघृत भोजनांतसमयीं ॥ तांबूलसाहित्य सर्व द्यावें ॥ ४ ॥ याचेंही वर्ष प्रमाण ॥
देशांतरीं मेल्यासी जाण ॥ मुख्य कर्त्याचें नसे सन्निधान[3] ॥ तरी गौणें[4] करावें ॥ ५ ॥
उदकुंभावांचूनि श्राद्धें शत ॥ तृप्तीतें पितर न पावत ॥ दरिद्री दुःखी भवार्णवीं
भ्रमत ॥ तस्मात् उदकुंभ दान द्यावा ॥ ६ ॥ कर्त्यासी नित्य शक्ति नसे जरी ॥ तरी
सपिंडीसमयामीतरी ॥ द्यावा एक कुंभ पूर्ण नीरीं ॥ नित्य पिंडविधि कृताकृत
॥ ७ ॥ आतां दानाचें पृथक् महिमान ॥ ऐकें तार्क्ष्यो सावधान ॥ आसनाच्या

१ उदकदानाची. २ वर्षभर दीप. ३ जवळ नसणें. ४ शास्त्रोक्त अन्य अधिकाऱ्यानें. ५ गरुडा.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

प्रदानेंकरून ॥ सुखें वैसोन प्रेत जेवी ॥ ८ ॥ पात्र दिधल्या सावकाश जेवीत ॥ कमंडलुदानें तृषा न बाधत ॥ उपानहदानें[1] हेय[2] प्राप्त ॥ वरी बैसोनि जात यमपुरीं ॥ ९ ॥ यममार्गीं ताप दारुण ॥ खालीं तप्त वालू वरी उष्ण ॥ तेथें केल्या छत्रो-पानहदान ॥ दोन्ही ताप न बाधती ॥ १० ॥ शय्यादानें बैसे विमानीं ॥ गृहदान केल्या तो प्राणी ॥ चालण्याच्या आयासापासूनी ॥ वर्जित होई या पुण्यें ॥ ११ ॥ वस्त्रदानें[3] मंडित[3] पूजित ॥ प्राणी स्वर्गासी जाताहेत ॥ असो पंचवर्षें झाल्या अतीत ॥ कन्याही मरण पावलिया ॥ १२ ॥ उत्तम प्रकारें विधि सर्व ॥ निधनही असल्या मानव ॥ शक्त्यनुसार करितां विधि बहुव[4] ॥ स्वर्गमार्गीं जातां जीव पावे ॥ १३ ॥ प्रेतान्नभोजी जो ब्राह्मण ॥ तो पतित[5] झाला जाण ॥ मागुती करावे संस्कार संपूर्ण ॥ मग पावन तो होय ॥ १४ ॥ पिंडांचे दर्भ निर्माल्य होत ॥ प्रेतान्नभोजनें ब्राह्मण तद्वत ॥ खळाचे ठायीं वेद निर्माल्यवत[6] ॥ स्त्रिया तैशाचि जारिणी ॥ १५ ॥

१ जोडा. २ घोडा. ३ वस्त्रादिकांनीं युक्त. ४ बहुत. ५ जातिभ्रष्ट. ६ निरुपयोगी.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

लोभियाची भ्रष्ट नीती ॥ ब्रह्मविद्या अजितेंद्रियें निश्चिती ॥ [1]शठीं स्नेहनिरुती ॥ अपरमा तरी पिता निर्माल्य ॥ १६ ॥ अनादरीं संबंध व्यर्थ ॥ तेवीं भक्ति वैराग्यवर्जित ॥ दान दक्षिणाविरहित ॥ निष्ठुरभाषणी तैशीच नारी ॥ १७ ॥ तैसाचि गुरु विद्याहीन ॥ [2]आचार्य करुणारहित जाण ॥ भक्तिरहित धर्म उरगाशन ॥ धर्महीन नर तैसा ॥ १८ ॥ नरहीन जैशी नारी ॥ नारीहीन गृह संसारीं ॥ गृहहीन ग्राम धरित्री ॥ ग्रामहीन महामार्ग ॥ १९ ॥ मार्गहीन जैसा देश ॥ देशहीन तैसा नृप विशेष ॥ नृपहीन प्रजा सरस ॥ पुत्रहीन गृहाश्रम ॥ २० ॥ गृहाश्रमावीण धर्म ॥ कैसा आचरेल धर्म उत्तम ॥ आचार हा प्रथम धर्म ॥ ब्राह्मणादिकांचा तो ऐक ॥ २१ ॥ पश्चिमरात्रीं[3] पंच घटीं ॥ तेव्हां ब्राह्ममुहूर्त हितसृष्टी ॥ तेव्हां [4]आत्मचिंतन उठाउठी ॥ जागृत होऊनि करावें ॥ २२ ॥ स्तोत्रपाठादि करूनी ॥ तृणपेंडी उदक मृत्तिका घेऊनी ॥ यज्ञोपवीत दक्षिणकर्णीं ठेवोनी ॥ तृण

१ लबाडाशीं. २ विद्यागुरु. ३ पहांटेस. ४ परमात्म्याचें चिंतन.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

भूमीवरी घालावें ॥ २३ ॥ रात्रौ बैसावें दक्षिणमुख ॥ दिवसा बैसावें उदङ्मुख ॥ मूत्रपुरीष झाल्या सम्यक ॥ शिश्न धरोनि उठावें ॥ २४ ॥ गुद शिश्न अन्य स्थानीं ॥ पांच तीन वेळां मृत्तिका लावुनी ॥ गंधलेपक्षयालागोनी[1] ॥ हस्तपायांसी सप्तवार ॥ २५ ॥ लावोनि स्वच्छ धुवावे ॥ आतुरें[2] मार्गस्थें अर्ध करावें ॥ स्त्री-शूद्र-बाळ-कांनीं स्वभावें ॥ चतुर्थांश बोलिला ॥ २६ ॥ आचमन करूनि दंतधावन ॥ केल्यावरी मग प्रातःस्नान ॥ स्वाधिकारें[3] मंत्रेंकरून ॥ सनक्षत्र करावें ॥ २७ ॥ सूर्योदयकर्म स्वाधिकारें[4] ॥ जप करावा परम देवतार्चनें ॥ स्वधर्माचें अध्ययन उत्तम ॥ योगक्षेमार्थ उद्यम अनंतर ॥ २८ ॥ करावा स्वकुलधर्मानुसार ॥ अन्य राहाटी केल्या घोर ॥ भयप्राप्तता निरंतर ॥ होत असे विनतात्मजा ॥ २९ ॥ बारा घटिका आल्यावरी दिन ॥ मग करावें माध्यान्हस्नान ॥ हेंचि मुख्य काल-लक्षण ॥ प्राक्पश्चिम तो गौण ॥ ३० ॥ गृहस्थासी दोन स्नानें ॥ यतीव्रतींनीं

१ दुर्गंधिनाशार्थ. २ रोगी, प्रवासी यांनीं. ३ शास्त्रोक्त अधिकारप्रमाणें. ४ पहिला व शेवटचा.

CC-O. In Public Domain. Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

तीन करणें ॥ माध्यान्हींचें कर्म आचरणें ॥ तिलतर्पण नित्य पैं ॥ ३१ ॥
विवाह [1]चूडा व्रतें [2] ॥ वर्षसपिंडी निश्चित ॥ तिलपिंड करावे वर्जित ॥ शास्त्रमत
ऐसें असे ॥ ३२ ॥ तिथि आणि तीर्थविशेष ॥ तिलपिंडासी न दोष ॥ क्षयदिन
प्रेतकृत्यास ॥ [3]वृद्धिश्राद्धास महालयीं ॥ ३३ ॥ मग करावें देवतार्चन ॥
तैसाचि अन्यदोषनिवारणयज्ञ ॥ बाल-अतिथींसी भोजन ॥ वृद्ध रोगी
अभ्यागता [4]देइंजे ॥ ३४ ॥ हस्त पाद मुख पात्र ॥ मंडल हीं पांच आर्द्र ॥
दक्षिणमुख प्रावृत शिर ॥ क्रोधरहित असावें ॥ ३५ ॥ महामौनें घ्यावे पंच
ग्रास ॥ अन्न न निंदावें निःशेष ॥ आसनावरूनि पाय भांड्यास ॥ न लावावा
कधींही ॥ ३६ ॥ पात्र धरावें वामहस्तें ॥ सोडितां अन्न पावे राक्षसांतें ॥ [5]भग्नासनीं
भग्नपात्रीं निरुतें ॥ फुंकोनि अन्नातें न भक्षावें ॥ ३७ ॥ कीटकेशादिदूषित ॥
भस्में शुचि उदकयुक्त ॥ पळींत पक्व पदार्थ होत ॥ ते सर्व वर्जित करावे ॥ ३८ ॥

---

१ चौल. २ मुंज. ३ मंगलांतलें मांदीश्राद्ध. ४ अतिथीला. ५ फुटलेले पाट ताट यांवर.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

कांस्यपात्रीं घृतान्न वर्जित ॥ दधि मधु पायस निश्चित ॥ आज्यादि शेष समस्त ॥
मंत्रें भूमीवरी प्रेतार्थ द्यावें ॥ ३९ ॥ रौरव-पूय-नरकामाजी ॥ पद्म अर्बुद
संख्या सहजी ॥ राहाणार जीवें जीं ॥ अक्षय्य हें त्यांसी प्राप्त असो ॥ ४० ॥
ऐसें वदोनि हस्तप्रक्षालन ॥ कीजे जो चूळ प्राशी ब्राह्मण ॥ तो देव पितर आणि
आपण ॥ घात करी तिघांचेही ॥ ४१ ॥ मग मुखशुद्ध्यर्थ तांबूल ॥ भक्षोनि
[1]आसंध्याकाल ॥ पुराण-श्रवण अति निर्मल ॥ करावें जाण आदरें ॥ ४२ ॥
सायंकालीं [2]देवतार्चन ॥ इच्छा असल्या स्वल्प [3]अशन ॥ प्रहररात्र जाहलिया पूर्ण ॥
आचमन करोन निजावें ॥ ४३ ॥ पर्व श्राद्ध उपवास ॥ चतुर्थी अष्टमी द्वादशीस ॥
विषमदिनीं स्वाती रेवतीस ॥ मघानक्षत्रीं संभोग वर्जावा ॥ ४४ ॥ अस्वस्थ
चित्तीं वर्ज्य भोग ॥ ऋतुगमनीं स्नान सांग ॥ अऋतु शौचवत निष्टंक ॥
न करावा सम्यक सुपंडितें ॥ ४५ ॥ ऐसा आन्हिकविधि पावन ॥ संक्षेपें निवेदी

१ तूप आदि. २ संध्याकाळपर्यंत. ३ देवांची पूजा. ४ भोजन. ५ दैनंदिन विधि.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

श्रीभगवान ॥ सूत म्हणे ऋषींलागून ॥ श्रीमधुसूदन बोलिला ॥ ४६ ॥ तेंचि
तात्पर्य तुम्हांप्रती ॥ म्यां कथिलें यथापद्धती ॥ वाबाजी विठ्ठल सज्जनांप्रती ॥
प्राकृत [1]भारती वदे आदरें ॥ ४७ ॥ इति श्रीगरुडपुराणे प्रेतकल्पे गरुडनारायण-
संवादे आचारलक्षणं नाम नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ७ ॥

---

१ वाणी.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

श्रीगणेशाय नमः ॥ जयजयाजी कर्पूरगौरा ॥ देवाधिदेवा भक्तमाहेरा ॥ नग-
राजकन्येचिया वरा ॥ मज बुद्धिदाता तूं होईं ॥ १ ॥ स्वधर्मान्हिक झाल्यावरी ॥
पुन्हां तार्क्ष्याप्रती श्रीहरी ॥ कांहीं आचार निवेदन करी ॥ तोचि सज्जनीं परिसावा
॥ २ ॥ म्हणे ब्रह्मचारी आणि यती ॥ वपन कीजे पितृमरणांतीं ॥ नखकर्मादि केल्या
निरुती ॥ चक्षुष्मान् मानव होतसे ॥ ३ ॥ सर्व जनांच्या अर्थाकारणें ॥ केश श्मश्रु
नख छेदणें ॥ नापितासी क्रियानिमित्तानें ॥ मरणार्थ कांहीं अवश्य द्यावें ॥ ४ ॥
स्तवाव्या पूजाव्या गाई नित्य ॥ प्रदक्षिणा कराव्या बहुत ॥ गोप्रदक्षिणीं पृथ्वीप्रद-
क्षिणा होत ॥ सशैल वनकाननें ॥ ५ ॥ गाईशीं खाजवितां सर्व पाप जात ॥ गोग्रास-
दानें स्वर्गीं वसत ॥ नमस्काराव्या गाई नित्य ॥ मंत्र पुनीत म्हणोनियां ॥ ६ ॥
मंत्र ॥ नमो गोभ्यः श्रीमतीभ्यः सौरभेयीभ्य एव च ॥ नमो ब्रह्मसुताभ्यश्च पवि-
त्राभ्यो नमो नमः ॥ १ ॥ ऐसा मंत्र म्हणोनी ॥ गाई नमस्काराव्या प्रतिदिनीं ॥

१ पार्वतीच्या. २ स्वच्छनेत्री. ३ पर्वतांसह लहान मोठीं अरण्यें. ४ पवित्र.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

गोदानफल तयालागूनी ॥ प्राप्त होई असंशय ॥ ७ ॥ ज्याच्या गोठ्यांत चिखल मक्षिका ॥ आणि तैशीच मुरकुट देखा ॥ दंड करोनियां निका ॥ दुग्ध काढी वळें जो नर ॥ ८ ॥ तो कुंभीपाक नरकामाझारी ॥ चिरकाळ पडे प्रेतशरीरी ॥ वायु पर्जन्य तापाभीतरी ॥ जो रक्षण करी गाईचें ॥ ९ ॥ तो सप्त कुळांसह तरत ॥ जो गाईचें जल तृण नाशीत ॥ तो ब्रह्महत्यादोष पावत ॥ उरगनाशना निश्चयें ॥ १० ॥ मास दोन सर्व दुग्धास ॥ मानुषें द्यावें वत्सास ॥ तृतीयमासीं दोन स्तनांस ॥ एक चतुर्थ पंचममासीं न पातकी ॥ ११ ॥ सदोष[1] गाई असल्याही पाळावी ॥ विपत्तिकाळींही न टाकावी ॥ आदरें पाळितां गोप्रदानपदवी[2] ॥ प्राप्त होई असंशय ॥ १२ ॥ तृणतोयादिकेंकरूनी ॥ गाई पाळाव्या प्रतिक्षणीं ॥ दीप लावितां गोस्थानीं ॥ शत वर्षें प्राणी स्वर्गीं राहे ॥ १३ ॥ गोरजें[3] अलक्ष्मी विघ्नें जात[4] ॥ आंगीं चौदा भुवनें वसत ॥ गोवधकर्त्यासी नरक गणित ॥ एकविसांचें जाणावें ॥ १४ ॥

१ दोषयुक्त, खोडकर. २ गोदानाचें फल. ३ गाईच्या पायांच्या धुळीनें. ४ अवदसा.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

गोमूत्र गोमय क्षीर ॥ दधि सर्पी कुश[2] नीर ॥ एकरात्रोपवासें श्वेपाकवत[3] नर ॥ शुद्ध होई निश्चयें ॥ १५ ॥ पुच्छोदक मस्तकावरी ॥ धरितां सर्व तीर्थांचें फळ नरीं ॥ पावोनि पातकाची बोहरी[4] ॥ तत्काळचि होत पैं ॥ १६ ॥ शृंगाग्रीं सर्व तीर्थें रहात ॥ मध्यें महेश्वर वसत ॥ कर्णीं अश्विनीकुमार तिष्ठत ॥ शशि भास्कर नेत्रांमाजी ॥ १७ ॥ कंबलस्थानीं कंबल नाग ॥ हुंकारीं सरस्वती सांग ॥ कंठस्थानीं वेद निष्टंक ॥ ककुदस्थानीं हिरण्यगर्भ ॥ १८ ॥ विष्णु जीवनीं नासिकीं[5] पवन ॥ वरुण ओष्ठीं पितर पृष्ठीं जाण ॥ स्तन समुद्र धर्म पादस्थान ॥ पृथ्वी जाण वक्षःस्थानीं ॥ १९ ॥ मुखीं अग्नि जघनीं[6] रुद्र ॥ लक्ष्मी योनिस्थानीं स्थिर ॥ जिव्हे पार्वती पुच्छीं रश्मिभास्कर ॥ खुराग्रीं गंधर्व वसताती ॥ २० ॥ गोमयीं गंगा यमुना मूत्रीं जाण ॥ रेवा घृत दधि गोमूत्रीं पावन ॥ ऐसी सर्वदेवमयी म्हणोन ॥ पात्र सुपूजित विप्रासी द्यावी ॥ २१ ॥ वस्त्रें कुंडलें मुद्रिकायुक्त ॥ सवत्स पूजोनि मंत्रोक्त ॥ दक्षिणा द्यावी

१ तूप. २ दर्भ. ३ चांडाळाप्रमाणें. ४ नाश. ५ गळ्याखालची पोळी. ६ कटिभागीं.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

दानसांद्रुण्यार्थ ॥ पंचैस्वर्णमित प्रमाण तिचें ॥ २२ ॥ घृत कांस्यपात्रीं तिळ कुश पुच्छोदक ॥ ब्राह्मणहस्तीं दान द्यावें देख ॥ कृष्णधेनु वैतरणी सांग ॥ अथवा द्यावी पाटलावर्णी ॥ २३ ॥ ती वैतरणी नदी तारित ॥ वृद्धा भुक्तभोगा हिंसौं स्तन स्रवत ॥ यैनदोहा विक्षीरा वत्सें मरत ॥ उनाड फिरत जी सदा ॥ २४ ॥ ऐसी गाई न द्यावी दान ॥ कपिला जो देईल सुलक्षण ॥ अथवा घेता ब्राह्मण ॥ स्वर्गस्थान पावती दोघे ॥ २५ ॥ ब्रह्मलोकीं रोमसंख्या वसत ॥ उभयमुखी वत्सपाय दिसत ॥ गोदान केल्या पृथ्वीदत्त ॥ केल्याचें प्राप्त पुण्य होय ॥ २६ ॥ गावो मे अग्रतः संतु ॥ गाई पृष्ठभागीं वसतु ॥ गाई हृदयीं नित्य राहातु ॥ गायींमध्यें मी वसें नित्य ॥ २७ ॥ सर्व गोदानीं हा मंत्र ॥ बोलिलासे खगेश्वर ॥ अशक्त असल्या मनुज फार ॥ निष्क सुवर्ण अथवा रजत ॥ २८ ॥ तयाचें करावें दान ॥ वीस गुंजा निष्कमान ॥ समर्थ असोनि करितां शठपण ॥ फल संपूर्ण न पावे तो ॥ २९ ॥ प्रेतकर्मकर्ता आणि

१ फलप्राप्तीकरितां. २ सोळा मासे. ३ शुभ्रयुक्त लाल वर्ण. ४ मारकी. ५ प्रयत्नानें दुभणारी.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

प्रेत ॥ दोघेही तद्गतीतें पावत ॥ दानामाजीं तीन मुख्यभूत ॥ प्रेतोपकारार्थ बोलिलीं ॥ ३० ॥ नित्यकुंभ नित्यदीप अष्टविध पद ॥ तिलपात्र आज्यपात्र प्रसिद्ध ॥ उपानह देतां सुख अगाध ॥ प्राप्त होई प्रेतासी ॥ ३१ ॥ ऐसें गोदानाचें महिमान ॥ वैनतेया केलें निरूपण ॥ आतां अन्नदान पावन ॥ ऐकें महिमान तयाचें ॥ ३२ ॥ देवऋषिगण भूसुर[1] ॥ अन्न प्रशंसिती निरंतर ॥ अन्नीं यज्ञ सर्व लोकतंत्र ॥ विश्व समग्र अन्नें धरिजे ॥ ३३ ॥ प्रत्यक्ष अन्नमय प्राण ॥ हें सर्वीं सर्वत्र विंदान[2] ॥ असो स्वकुटुंबही पीडूंन[3] ॥ अन्नदान ब्राह्मणासी द्यावें ॥ ३४ ॥ अतिथीची अवज्ञा न करावी ॥ आदरें अन्नें अर्पावीं ॥ चांडाळ पतितें[4] शत्रुजीवी ॥ अन्नदानसमयीं समान सर्व ॥ ३५ ॥ त्यांसही अर्पावें अन्न ॥ मग काय वर्णावे ब्राह्मण ॥ शक्त्यनुसार द्यावें अन्नदान ॥ ब्राह्मणासी देतां होत अक्षय ॥ ३६ ॥ शूद्रासी दिधल्या महत्फल ॥ पितर प्रशंसिती पुष्कळ ॥ जैसा शेतीं पर्जन्यकाळ ॥ इच्छि-

१ ब्राह्मण. २ निश्चय. ३ कमी करून. ४ स्वजातिभ्रष्ट.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

ताती ॥ निर्मळ कृषिक[1] पैं ॥३७॥ तद्वत् पितर अन्न इच्छिती ॥ आमुच्या कुळीं पुत्र-
पौत्रादि संतती ॥ कोणी जरी अन्नदान करिती ॥ तरी येथें प्राप्ती घडे आम्हां ॥ ३८ ॥
ब्राह्मण हें महद्भूत[2] ॥ स्वयें जरी याचना करीत ॥ न मागतांही दिधल्या दत्त ॥
पुण्य अपार प्राप्त होई ॥ ३९ ॥ अन्नदाता पशु लाभत ॥ पुत्र कन्या धन बहुत ॥
बहुत बळ रूप प्राप्त ॥ स्वर्णभोगी होत महासुखी ॥ ४० ॥ अन्न प्रत्यक्ष करी तृप्ती ॥
अन्नें क्षुधा निवारे निश्चिती ॥ अन्नदाते स्वर्गासी जाती ॥ देव पूजिती तयांतें
॥ ४१ ॥ अन्न नसतां शरीर नासत ॥ पंच धातु क्षीण होत ॥ बळवानही नाश
पावत ॥ अन्न नसतां तयासी ॥ ४२ ॥ सायंप्रातः अग्निहोत्रहवन[3] ॥ यथाविधि
करितां जाण ॥ वृष्टि[4] होत त्या पुण्यान ॥ अन्न निर्माण वृष्टीपासूनी ॥ ४३ ॥
विवाह यज्ञ प्रेतकार्य समस्त ॥ अन्नहीन केल्या न शोभत ॥ हेम[5] रत्नें असल्या
बहुत ॥ शोभा सर्वथा न पावेचि ॥ ४४ ॥ भूतें[6] अन्नापासोनि होती ॥ अन्नें उदक-

१ शेतकी करणारा. २ श्रेष्ठ. ३ होम. ४ पर्जन्य. ५ सुवर्ण. ६ प्राणी.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

वृष्टीनें उद्भवती ॥ यज्ञें पर्जन्याची प्राप्ती ॥ अन्न निरुती यज्ञें होय ॥ ४५ ॥ अन्न विष्णु स्वयें देव ॥ अन्न असे देवभव ॥ अन्न ब्रह्मा देवदेव ॥ सोम रवि मरुद्गण अन्न ॥ ४६ ॥ अत एव वदे अन्नदान ॥ करावें प्रेतमुक्त्यर्थ जाण ॥ उदकयुक्त विशेषें पूर्ण ॥ दानमहिमान वाड असे ॥ ४७ ॥ याचेविषयीं पुरातन ॥ कथा ऐक पन्नगाशन ॥ पूर्वीं त्रेतायुगीं मीं जाण ॥ रामावतार धरियेला ॥ ४८ ॥ त्या अवतारीं अगस्तीनें ॥ कथन केलें मजकारणें ॥ तें ऐक एकाग्रमनें ॥ निरूपण करितों जें ॥ ४९ ॥ ऐकें रामा कथा विचित्र ॥ मी तीर्थयात्रा करितां अपार ॥ कोणे एके स्थळीं अरण्य सुंदर ॥ महासरोवर तयामाजी ॥ ५० ॥ एक योजन तलाव विस्तीर्ण ॥ चक्रवाककारंडवाकीर्ण ॥ आश्चर्यरूप संपूर्ण ॥ परी तपोधन न सेविती ॥ ५१ ॥ त्या सरोवरतटाकीं एक रात्री ॥ मी राहिलों रावणारी ॥ उदय पावतां तमारी ॥ तटाकावरी मी गेलों ॥ ५२ ॥ तंव तेथें पाहिलें अपूर्व ॥ सुपुष्ट आणि अजर शव ॥ उदकाच्या समीप

१ निश्चयपूर्वक. २ श्रेष्ठ. ३ चक्रवाक व कारंडव नामक पक्ष्यांनीं व्यापलेलें.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अभिनव ॥ देखोनि विस्मय मज जाहला ॥ ५३ ॥ एक मुहूर्त चिंतन करीत ॥ उगाचि राहिलों तटस्थ ॥ काय हें अपूर्व दिसत ॥ ऐसें चिंतन करीत असतां ॥ ५४ ॥ एक मुहूर्त लोटल्यावरी ॥ विमान पाहिलें मनोजवापरी ॥ येत त्यांत दिव्य शरीरी ॥ हंस विमानीं बैसला ॥ ५५ ॥ त्या विमानामाजी पंचशत ॥ अप्सरासंघ सेवा करीत ॥ सर्व सुंदरी अलंकारमंडित ॥ रमवीत तयाप्रती ॥ ५६ ॥ कित्येक गाती कित्येक नाचती ॥ कितीक वाद्यें वाजविती ॥ वीणा पटह नाना रीती ॥ स्वर्गवाद्यें मनोहर जीं ॥ ५७ ॥ तो पुरुष विमानांतून ॥ देवसंकाश उतरला जाण ॥ तृप्तीपर्यंत शवमांसभोजन ॥ करिता झाला रघुवीरा ॥ ५८ ॥ मागुती विमानीं आरूढतां ॥ मी तयासी झालों पुसता ॥ कोण तूं देवसंकाश असतां ॥ आचार निंद्य करितोसी ॥ ५९ ॥ काय याचें असे कारण ॥ आश्चर्य वाटतें मज संपूर्ण ॥ तुझ्या आहाराचें श्रवण ॥ कराया संपूर्ण इच्छितों मी ॥ ६० ॥ ऐसी ऐकोनि माझी भारती ॥ स्वर्गवासी तो प्रांजली सुमती ॥ बोलता झाला मजप्रती ॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

रघुनंदना शुभाक्षरें ॥ ६१ ॥ म्हणे ऐकें मुनिवर्या माझें वृत्त ॥ जेणें सुखदुःख मजला प्राप्त ॥ कर्माचा दुरतिक्रम होत ॥ तोचि ऐक ऋषिसत्तमा ॥ ६२ ॥ पूर्वी वैदर्भ देशाआंत ॥ सुदेव राजा मम पिता विख्यात ॥ लोकत्रयीं कीर्तिभरित ॥ असता झाला पूर्वयुगीं ॥ ६३ ॥ त्याच्या भार्या दोघीजणी ॥ पुत्र झाले तयांलागुनी ॥ मी वडील श्वेत महागुणी ॥ सुरथ धाकुटा जाहला ॥ ६४ ॥ अनंतर पिता पावला मरण ॥ पौरीं केलें मज अभिषेचन ॥ राज्य केलें न्यायेंकरून ॥ बहुत दिन वर्षसहित ॥ ६५ ॥ प्रजा पाळिल्या पुत्रापरी ॥ परंतु ब्राह्मणांसी मी संसारीं ॥ अन्न न दिधलें सत्पात्रीं ॥ दानें बहुत अन्य केलीं ॥ ६६ ॥ मग प्रवेशलों तपोवन ॥ कुंभोद्भवा तेंचि हें जाण ॥ मृगपक्षिवर्जित संपूर्ण ॥ ऐशा वनीं प्रवेशलों ॥ ६७ ॥ सुरथासी राज्य दीधलें ॥ म्यां हें सरोवर सेविलें ॥ येथें दारुण तप मांडिलें ॥ सहस्र संख्या वत्सर ॥ ६८ ॥ मग मी पावलों मरण ॥ झालें दिव्य शरीर देदीप्यमान ॥ विमानामाजी बैसोन ॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

ब्रह्मलोकाप्रति पावलों ॥ ६९ ॥ तेथें क्षुधा तृषा मज त्वरित ॥ मुनिसत्तमा लागली बहुत ॥ इंद्रियें व्यथित झालीं समस्त ॥ प्राण व्याकुळ होत पैं ॥ ७० ॥ मग ब्रह्मयासी पुशिला आहार ॥ भगवंता काय भक्षूं सत्वर ॥ ब्रह्मदेव बोलिला उत्तर ॥ स्वदेह समग्र भक्षण करीं ॥ ७१ ॥ आपुलें नित्य स्वादु मांस ॥ भक्षीत जाईं अति सरस ॥ तपोतेजें पुष्टता शरीरास ॥ राहे तुझ्या उत्तम ॥ ७२ ॥ अगा श्वेतराजा पूर्वकाळीं ॥ अन्नदान न केलें त्वां भूतळीं ॥ संन्यासी अतिथि गृहाजवळी ॥ आल्याही मोहें न दिधलें अन्न पैं ॥ ७३ ॥ त्या दोषें क्षुधा तृषा ॥ स्वर्गीं बाधते पुण्यपुरुषा ॥ परिहार याचा सहसा ॥ स्वर्गामाजी नसेचि ॥ ७४ ॥ यास्तव शरीर पुष्टमांस ॥ भक्षीत जाईं अमृतरस- ॥ समान तृप्ति तुझें मानस ॥ नित्य पावत जाईल पैं ॥ ७५ ॥ अगस्ती जो कां महामुनी ॥ तीर्थयात्राप्रसंगें त्या स्थानीं ॥ स्वतां दुर्धर्ष येईल ते क्षणीं ॥ कष्टमुक्त होसील तेव्हां ॥ ७६ ॥ इंद्रादि सुरासुरांतें ॥ आहार द्यावयापुरतें ॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

सामर्थ्य असे त्या मुनीतें ॥ तेथें तुझी कथा कायसी ॥ ७७ ॥ तेंचि मी
विधिवाक्य ऐकोन ॥ वीभत्साहार करीं अनुदिन ॥ ऐसा बहुत वर्षगण ॥
भोजन करितां पैं गेला ॥ ७८ ॥ भक्षितां शरीर नाहीं सरलें ॥ माझें मन तृप्ति
पावलें ॥ या कष्टापासूनि उद्धरिलें ॥ मुनिसत्तमा पाहिजे त्वां ॥ ७९ ॥ कुंभयोनें
तुजवांचूनी ॥ उद्धरिता नसे अन्य कोणी ॥ ब्रह्मऋषे प्रसाद करावयालागुनी ॥
योग्य आहेसी ऋषीश्वरा ॥ ८० ॥ तृषाक्रांतासी क्षीरसागर ॥ दरिद्रियासी
जैसा कुबेर ॥ भेटतांचि कष्ट समग्र ॥ नाश पावती क्षणमात्रें ॥ ८१ ॥ तैसा
ऋषीश्वरा मज भेटलासी ॥ आतां काय राहील क्लेशविवशी ॥ ऐसें श्वेतवाक्य
ऐकोनि मानसीं ॥ रघूत्तमा दुःखित जाहलों ॥ ८२ ॥ मनीं दया उपजली ॥
तदुद्धारार्थ वस्त्राभरणें घेतलीं ॥ राजऋषीची पूर्व काया नासली ॥ एकचि
राहिलें दिव्य शरीर ॥ ८३ ॥ तृप्त झालों म्हणोन ॥ नमस्कार करूनि राजनंदन ॥
विमानामाजी बैसोन ॥ ब्रह्मलोकाप्रती गेला ॥ ८४ ॥ यास्तव रामा अन्नदान ॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

भूतळीं करावें अनुदिन ॥ अन्नदानकर्ता तयान ॥ काय दानें न केलीं ॥ ८५ ॥ सर्व दानांचें पुण्य घडत ॥ तस्मात् अन्नदान निश्चित ॥ रामा करीत जाई सत्य ॥ तूं जगन्नाथ विश्वात्मा ॥ ८६ ॥ तुजप्रति काय सांगावें ॥ वृद्धिसूतक झाल्या स्वभावें ॥ त्यामाजी आमान्न द्यावें ॥ दोष नसे तयासी ॥ ८७ ॥ ऐसें अगस्तिवाक्य ऐकोन ॥ राम नित्य करी अन्नदान ॥ तस्मात् अन्नदानासमान ॥ नाहीं दुसरें दान पैं ॥ ८८ ॥ धर्में होई अर्थ प्राप्त ॥ धर्में काम जाई वाढत ॥ सर्व पुरुषार्थांत धर्म सत्य ॥ गरुडा जाण निश्चयें ॥ ८९ ॥ धर्मासमान नाहीं पुरुषार्थ ॥ जो नर धर्मविवर्जित ॥ पुत्र अथवा असो तात ॥ त्याग सत्य त्याचा कीजे ॥ ९० ॥ या प्रकारें भगवंत ॥ गरुडासी निरूपित ॥ सूत शौनकादि ऋषींप्रत ॥ कथी समस्त माधव म्हणे ॥ ९१ ॥ इति श्रीगरुडपुराणे प्रेतकल्पे अन्नदानमहिमावर्णनं नाम दशमोऽध्यायः ॥ १० ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

१ प्रतिदिवशीं. २ कच्चें अन्न. ३ द्रव्य. ४ मनोरथ.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ मागुती बोले श्रीभगवंत ॥ सपिंडीची ऐकें मात ॥ पूर्ण वर्षीं करावी निश्चित ॥ कोणी बोलत आलीकडे ॥ १ ॥ किती म्हणती द्वादश दिनीं ॥ ऐसें अनेक बोलती मुनी ॥ पुत्रें करावी सपिंडकरणी ॥ ऐसें मत बहुतांचें ॥ २ ॥ असो देशाचारानुसार ॥ सपिंडी करावी निर्धार ॥ द्वादश दिनीं सर्व वर्णीं निर्विचार ॥ सपिंडीविधान करावें ॥ ३ ॥ आधीं करावीं षोडश श्राद्धें ॥ एकादश दिवसीं शुद्धबुद्धें ॥ मुख्य कर्त्याच्या अवभेदें ॥ कालांतरातें जाणिजे ॥ ४ ॥ ज्येष्ठ असतां अन्य पुत्रें ॥ सपिंडी न करावी निर्धारें ॥ पूर्वीं केल्यासी मागुती स्वकरें ॥ ज्येष्ठ पुत्रें करावी ॥ ५ ॥ ऐसें असे एक मत ॥ श्रोतीं न मानावें विपरीत ॥ पिता पितामह प्रपितामह ख्यात ॥ ऐसे सपिंड खगेंद्रा ॥ ६ ॥ स्त्रीसपिंडीचे पक्ष चार ॥ एक चितेंत घालितां शरीर ॥ भर्त्यासह सपिंडीप्रकार ॥ निर्विचार

१ बारावे दिवशीं पूर्वीच्या तीन पिंडांत मृताचा पिंड मिळविणें. २ मासिकें. ३ अभावीं.

Sri Vidyabharati Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

असे तिचा ॥ ७ ॥ आसुरविवाहें[1] विवाहित ॥ तिची सपिंडी जनकासी उचित ॥ ब्राह्मविवाहें जी प्रणीत ॥ पुत्रें सपिंडी तिची कीजे ॥ ८ ॥ सासू आदि तिघी-जणी ॥ सपिंडीलागीं मिळवणी ॥ देशाचार कुलाचार अतिक्रमोनी ॥ न कीजे शास्त्रप्रमाण हें ॥ ९ ॥ सपिंडी करावी हा पक्ष थोर ॥ असो प्रेतकार्य[2] राहिलें जर ॥ पुन्हा शवत्व पावे निर्धार ॥ म्हणोनि सांग क्रिया कीजे ॥ १० ॥ एकोद्दिष्ट[3]-प्रमाणें सर्व ॥ षोडश श्राद्धें अभिनव ॥ कृतसपिंडी सोळा पर्व ॥ जाणें अभिनव खगेंद्रा ॥ ११ ॥ सपिंडीकरणाच्या पूर्वी ॥ प्रेतशब्द वसे जीवीं ॥ सपिंडी होतांचि अभिनवीं ॥ पितृलोकीं जातसे ॥ १२ ॥ श्लोक ॥ प्रेतलोकं परित्यज्य पितृलोकं समाश्रयेत् ॥ तेन समानतां याहि विहरस्व यथासुखम् ॥ १ ॥ या मंत्रें प्रेतासी अर्घ्य देणें ॥ तैसेंचि या मंत्रें पिंडयोग करणें ॥ चतुर्थाची निवृत्ति करणें ॥ अर्घ-पिंडार्घ्याच्या ऊर्ध्व पैं ॥ १३ ॥ निःश्वास[4] सोडावा घेऊनी ॥ शोकदूरकर्त्री भुवनीं ॥

१ राक्षसविधीनें विवाहित. २ क्रियाकर्म. ३ एकास उद्देशून श्राद्ध. ४ श्वास.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

गाय द्यावी पिंडस्थानीं ॥ विधि जाणोनी सुपुत्रें ॥ १४ ॥ कामक्रोल[1] विश्वेदेव ॥
सपिंडीकरणीं अभिनव ॥ ब्राह्मण करावे भूषित सर्व ॥ वस्त्राभरणेंकरूनियां ॥ १५ ॥
द्यावें सांग पंद[2] शुभ रत्न ॥ हेमदक्षिणादि संपूर्ण ॥ देवांकडे ब्राह्मण दोन ॥ तीन
करावे पितरांकडे ॥ १६ ॥ एक प्रेतार्थ बसवावा ॥ बहुदानें तो तृप्त करावा ॥
सपिंडीनंतर श्राद्धप्रसंग वरवा ॥ प्राप्त झाल्या पिंड तीन ॥ १७ ॥ करावें शास्त्रविधि
जाणुनी ॥ न करितां होई पितृहानी ॥ सपिंडीनंतर मग कोणी ॥ पृथक् प्रेतश्राद्ध
करील ॥ १८ ॥ तरी पुन्हां पावे प्रेतयोनी ॥ पुन्हां सपिंडी त्यालागोनी ॥ करावी
लागे हें जाणोनी ॥ प्रेतश्राद्ध न योजावें ॥ १९ ॥ एकोद्दिष्ट आणि क्षयदिवस ॥
कोणी महर्षि बोलती सरस ॥ एक दिनीं सर्व वर्णांस ॥ कीजे कुलाचार[3]व्यवस्थेनें
॥ २० ॥ करावें सर्व विधान ॥ द्वादश दिन प्रेततृप्त्यर्थ जाण ॥ घट[4] मोदक[5] सुलक्षण ॥

१ या नांवाचे श्राद्धदेव. २ पददास आठ प्रकारचें आहे. ३ आपल्या कुलाचाराप्रमाणें.
४ उदकुंभ. ५ आनंदकारक.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

प्रेततृप्त्यर्थ करावे ॥ २१ ॥ एकादश द्वादश दिन ॥ शून्य जयाचा गेला जाण ॥ तो यातनेचा अंत कशान ॥ प्राणी पावेल प्रेतलोकीं ॥ २२ ॥ प्रेतनिःश्वासकोपाग्नीनें[1] ॥ कुलक्षय होईल शापानें ॥ दरिद्र आणि दुर्दशेनें ॥ प्रेतकार्य न करितां पीडतसे ॥ २३ ॥ जें जें वृद्ध निवेदिती ॥ श्राद्धकृत्य विवाहरीती ॥ तैशीच करावी निश्चिती ॥ वैदिकीहूनि लौकिक बली ॥ २४ ॥ सपिंडी झाली न जोंवरी ॥ सपिंड अशुद्ध तोंवरी ॥ अन्न न घ्यावें त्याचे घरीं ॥ सद्भिक्षूंनीं उरगाशना ॥ २५ ॥ वर्षान्न ब्राह्मणासी ॥ पुत्रें द्यावें द्वादश दिवसीं ॥ जल व्यजन तांबूल लवणासी ॥ इंधन[2] गोरसासी पैं द्यावें ॥ २६ ॥ अक्षय्यतृतीया मकरसंक्रांती ॥ दूर्वाष्टमीसी प्रेताप्रती ॥ पर्वणीसी यथाशक्ती ॥ भक्तिपूर्वक दान करावें ॥ २७ ॥ नास्तिकबुद्धि अवलंबुनी ॥ जो प्रेतकार्यें न करी जनीं ॥ प्रेतशापें संततिहानी ॥ होय निदानीं तयाची ॥ २८ ॥ तस्मात् समाहितमनें ॥ और्ध्वदेहिक शास्त्रप्रमाणें ॥ सपिंडी-

---

१ क्रोधजन्य श्वासरूप अग्नि. २ लांकडें.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

करणांत करणें ॥ तेणें शुद्धि होतसे ॥ २९ ॥ प्रेतकार्य जो न करी ॥ तो स्वधर्मासी अनधिकारी ॥ पंक्तिदूषक[1] निर्धारीं ॥ गयाश्राद्धीं अधिकार त्यास नसे ॥ ३० ॥ दर्शश्राद्ध गयाश्राद्ध ॥ आणि औपरपक्षिक[2] श्राद्ध ॥ सपिंडी झाली असतां शुद्ध ॥ निःसंदेह करावें ॥ ३१ ॥ करावें भक्तिमान पुत्रें ॥ अभक्तिमंतासी न निर्धारें ॥ स्त्रिया अनुपनीत[3] शूद्रें ॥ वेदमंत्रें वर्जित कीजे ॥ ३२ ॥ विपत्तींत असे अधिकारी पुरुष ॥ तरी अधिकार असे स्त्रियेस ॥ दाहादिक सपिंडांत निःशेष ॥ पत्नीनें यथाविधि करावें ॥ ३३ ॥ शूद्र स्त्रियांचें न करावें वपन ॥ शूद्रासी नसे मंत्र-विधान ॥ मंत्रस्थानीं नमः म्हणोन ॥ विधि संपूर्ण करावा ॥ ३४ ॥ निरग्नि स्त्री आणि शूद्र ॥ यांचा आमश्राद्धप्रकार[4] ॥ जेणें पितरां तृप्ति फार ॥ ऐसें आमान्न देइजे ॥ ३५ ॥ साग्निक जरी ब्राह्मण ॥ प्रवासी आणि पुत्रजनन ॥ द्विज अन्न यांच्या अभावीं जाण ॥ ग्रहणीं आमश्राद्ध कीजे ॥ ३६ ॥ भार्या असतां

१ पंक्तिभोजनास अयोग्य. २ महालय. ३ मुंज न झालेला. ४ श्राद्धांत भोजनाऐवजीं शिधा देणें.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

रजस्वला ॥ पाककर्ता न मिळाला ॥ तरी [1]आमश्राद्धविधि भला ॥ पुत्रें कुशलार्थ करावा पैं ॥ ३७ ॥ दैवयोगें एके दिवसीं ॥ मरण आलें दंपत्यासी ॥ स्त्रीसपिंडी पतीसीं ॥ एकतंत्रें करावी ॥ ३८ ॥ एकदांचि बहु मेलियांसी ॥ क्रियाधिकार असतां एकासी ॥ प्रमुखें मुख्य क्रिया यथाविधिसी ॥ अन्य [2]प्रेतिनिधीनें करावी ॥ ३९ ॥ त्रयोदश दिनीं [3]पूर्वाण्हीं ॥ पूजावे श्रवण दानमानीं ॥ अस्थिक्षेप क्षयालागूनी ॥ आणिक श्राद्ध अपरपक्षीं ॥ ४० ॥ जरी असेल भक्तिमान पुत्र ॥ तरी त्यानें करावें निश्चित ॥ आणीक ऐकें मात ॥ जी पूर्वीं प्रवर्तली ॥ ४१ ॥ स्वयंभुवें [4]यमधर्मासी ॥ राज्य दिधलें प्राणिसंयमासी ॥ संयमिनीपुरी त्यासी ॥ राहावयासी दीधली ॥ ४२ ॥ पापियांसी कर्मानुसार ॥ दंड करावा म्हणोनि आज्ञोत्तर ॥ बोलिल्यावरी यमधर्म कर ॥ जोडोनि उत्तर बोलिला ॥ ४३ ॥ म्हणे अनंत कर्मे नरांचीं ॥ संख्या कैशी कळेल त्यांची ॥ ऐसी चिंता परिसोनि

१ आमान्नश्राद्ध. २ शास्त्रोक्त दुसरा अधिकारी. ३ दोनप्रहरांपूर्वी. ४ ब्रह्मदेवानें.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

त्याची ॥ विरिंचीनें [1]श्रवण निर्मिले ॥ ४४ ॥ द्वादश संख्या कुशपत्र प्राणी ॥ निर्मिले देव तेचि क्षणीं ॥ तयांसी सर्व लोकांची करणी ॥ ब्रह्मवरें कळतसे ॥ ४५ ॥ जें जें कर्म ज्या ज्या वेळीं ॥ मनुष्य करिती ज्या ज्या स्थळीं ॥ काया वाचा मनमेळीं ॥ करोनि प्राणी करिती जें ॥ ४६ ॥ तें सर्व कळतें तयांसी ॥ यास्तव पूजा कीजे विशेषीं ॥ तंडुलमंडलावरी कलशासी ॥ यथाविधि स्थापिजे ॥ ४७ ॥ उपरी लक्ष्मीनारायणमूर्ती ॥ हैमी[2] रौप्यी ताम्रमयी निश्चिती ॥ अथवा शालिग्राम-पूजा महती ॥ करावी निरुती खगेंद्रा ॥ ४८ ॥ त्रयोदश बोलावूनि ब्राह्मण ॥ वस्त्रीं भूषणीं करावें पूजन ॥ ताम्रकलश तंडुल [3]प्रस्थप्रमाण ॥ दधिपात्रसमायुक्त ॥ ४९ ॥ आणिक [4]फलमुद्रासमन्वित ॥ मृत्तिकाकुंभ असत्या अशक्त ॥ वस्त्रसूत्र समायुक्त ॥ करावें जाण खगेंद्रा ॥ ५० ॥ एक द्यावा ममप्रीत्यर्थ ॥ द्वादश द्यावे श्रवणार्थ ॥ श्रवणविष्णुश्राद्ध विध्युक्त ॥ शुद्धिश्राद्ध मग कीजे ॥ ५१ ॥ शुद्धि-

१ या नांवाचे बारा देव. २ सोन्याची. ३ पक्का शेर. ४ फळें व द्रव्य यांनीं युक्त.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

श्राद्ध जाहल्यावरी स्वस्तिवाचन ॥ करावें तेणें होय कल्याण ॥ ऐसें आचरतां फल संपूर्ण ॥ खगश्रेष्ठा होतसे ॥ ५२ ॥ ऐसें गरुडासी भगवंत ॥ श्रवणपूजन निवेदीत ॥ सूत ऋषींप्रति सांगत ॥ माधव विनवी श्रोतयां ॥ ५३ ॥ इति श्रीगरुडपुराणे प्रेतकल्पे गरुडनारायणसंवादे श्रवणोपाख्यानं नाम एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

१ शांतोदक नांवाचें पुण्याहवाचन.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

॥ श्रीगणेशाय नमः ॥ पूर्वाध्यायांतीं श्राद्धविधान ॥ झालें श्रवणांचें निरूपण ॥ आतां दुर्मरणाचें लक्षण ॥ ऐकें गरुडा आदरें ॥ १ ॥ जो मेला चांडाळहस्तें ॥ उदकीं देह पडला अवचितें ॥ सर्पदंश अमीनें देहातें ॥ जाळोनि टाकिलें जयाचे ॥ २ ॥ ब्राह्मणशापें निमाला ॥ दंष्ट्रीनें डसूनि मारिला ॥ पशूनें फाडूनि टाकिला ॥ आणि पळतां संग्रामांतूनी ॥ ३ ॥ मारूनि टाकिला अन्य वीरें ॥ विषें आणि मेला शस्त्रें ॥ कंठीं फांस लावूनि दोरें ॥ मारिलें चोरें जयासी ॥ ४ ॥ क्षणिकरोगें मृत्यु आला ॥ अंतरिक्षींच प्राण गेला ॥ खाटेवरी जो निमाला ॥ तो पावला दुर्मरण ॥ ५ ॥ सूतिका आणि रजस्वला ॥ हाही मृत्यु नव्हे चांगला ॥ वृक्षापासूनि मरण पावला ॥ आणि राहिला संस्काररहित ॥ ६ ॥ इतुकीं जाणावीं दुर्मरणें ॥ आतां पापी प्राण्यांचीं लक्षणें ॥ ऐकें गरुडा सावधमनें ॥ किंचित् कांहीं सांगतों ॥ ७ ॥ पाखंडी आणि महापातकी जाण ॥ आणिक स्त्री व्यभिचारीण ॥ ॥५०॥

१ फांशी दिला. २ व्याघ्र इत्यादिकांनीं. ३ बाळंतीण. ४ उघ्न - मुंजीविरहित. ५ विसंडवादी.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

जो कर्ता परदाराहरण ॥ शस्त्रघाती अग्निलाविता जो ॥ ८ ॥ तैसाचि जाण विषघालिता ॥ कुशल्यें[1] वृत्ती चालविता ॥ वेदब्राह्मणनिंदाकर्ता ॥ जयांचीं प्रेतें नेती जाळिती शूद्राद्रिक ॥ ९ ॥ यांची घटोदक क्रिया करावी ॥ कृच्छ्रसांतपनें[2] आचरावीं ॥ प्रायश्चित्तें पापें वारावीं ॥ शुद्धि करावी स्वकुळाची ॥ १० ॥ जो पूर्वींचा आहिताग्नी[3] ॥ मग झाला पतित जनीं ॥ त्याचा देह श्रौतस्मार्ताग्नी ॥ लावोनि त्यासी न जाळिजे ॥ ११ ॥ वैतानातें टाका कीं उदकांत ॥ आवसथ्या टाका चतुष्पथांत ॥ पात्रें होमावीं अग्नींत ॥ शव नदींत सोडावें ॥ १२ ॥ जाळिल्या लौकिकाग्नि लावावा ॥ मंत्र वर्ज्य त्यासी करावा ॥ तो काष्ठापरी जाळावा ॥ मग करावा प्राजापत्यविधि ॥ १३ ॥ अस्थींचें करोनि संचयन ॥ पुन्हां जाळाव्या विधिमंत्रेंकरून ॥ ज्याची पत्नी पतिव्रता जाण ॥ तिनें अग्नि रक्षिले असतील जरी ॥ १४ ॥ तरी त्या अग्नींनीं विधिपूर्वक ॥ क्रिया करावी और्ध्वदेहिक ॥ प्रमादपतिताचा विवेक ॥

---

१ ध्वाजावर निर्वाह करणारा. २ या नांवांचीं प्रायश्चित्तें. ३ अग्निहोत्री.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

तुज निष्टंक[1] कथियेला ॥ १५ ॥ वृद्ध आणि शौचयुक्त ॥ स्मृति त्याची झाली लुप्त ॥ भिषक्[2]क्रियेनें प्रत्याख्यात[3] ॥ तो आत्मघात जरी करी ॥ १६ ॥ उडी टाकी पर्वतावरूनी ॥ शरीर जाळी लावोनि अग्नी ॥ उपोषणें जळसमाधी घेऊनी ॥ देह नाशी जो आपुला ॥ १७ ॥ त्याचें आशौच त्रिरात्र ॥ वर्ज्य करोनि मातापितर ॥ जो झाला दुश्चिकित्सित नर ॥ महारोगें जो पीडिला ॥ १८ ॥ त्यानें प्रदीप्त अग्नि करूनी ॥ उडी घालावी विधि जाणोनी ॥ अथवा अनशनें[4] देह आवरूनी ॥ पडों द्यावा निग्रहें ॥ १९ ॥ मरावें खोल उदकांत ॥ अथवा करावा भृगुपात[5] ॥ महाप्रस्थानें देहपात ॥ तुषारपर्वतीं करावा ॥ २० ॥ प्रयागवटावरी चढोनी ॥ उडी घालावी प्रयागजीवनीं ॥ शेखीं दिव्य देह पावोनी ॥ स्वर्गामाजी तो जाई ॥ २१ ॥ या मरणासी न म्हणावा आत्मघात[6] ॥ लोकवचन वेदवचनांत ॥ बाध नाहीं गा निश्चित ॥ प्रयागमरणीं ज्याची मती ॥ २२ ॥ जो धीरवंत प्रयागीं देह ॥ संगमीं

१ निश्चयें. २ वैद्यकीनें. ३ निंदित. ४ उपवासानें. ५ पर्वतावरून उडी मारणें. ६ निषिद्ध आत्महत्या.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

टाकोनि होई विदेह ॥ तो मम तनु निःसंदेह ॥ पावे जाण वैनतेया ॥ २३ ॥
जो पावे महायुद्धीं मरण ॥ तो साठ सहस्र वर्षें प्रमाण ॥ स्वर्गभोग भोगी असाधारण ॥ गोग्रहणाची संख्या सहस्र ऐसी ॥ २४ ॥ उदकीं अकरा सहस्र ॥ भृगुपातीं सोळा हजार ॥ अनशनें अक्षय मुक्ति नर ॥ पावे जाण निर्धारें ॥ २५ ॥ असो जे मेले दुर्मरणानें ॥ त्यांचें प्रायश्चित्त करावें पुत्रानें ॥ मग क्रिया संपादणें ॥ यथाविधि भक्तिपूर्वक ॥ २६ ॥ देशांतरीं जो मरण पावला ॥ दशाहांत[2] समाचार कळला ॥ अवशिष्ट दिन सूतक त्याला ॥ त्रिपक्षांआंत समजे जरी ॥ २७ ॥ तरी आशौच त्रिरात्र ॥ सहा मासांत कळेल समाचार ॥ तरी पक्षिणी[3] आशौच निर्धार ॥ नवमास प्रकार ऐक आतां ॥ २८ ॥ एक दिवस तयासी सूतक ॥ नव मासांपुढें देख ॥ स्नानें शुद्धि निष्टंक ॥ सर्वांची देख होतसे ॥ २९ ॥ माता पिता आणि स्त्री पुरुष ॥ यांसी आशौच दहा दिवस ॥ ही क्रिया सर्व वर्णांस ॥ पालट यास नसेचि ॥ ३० ॥

१ मोठे. २ दहा दिवसांचे आंत. ३ बारा प्रहर काळ.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

दीर्घाशौचीं अल्पाशौच ॥ वृद्धींत[1] वृद्ध्याशौच ॥ क्षयांत क्षयाशौच ॥ नाश पावतें निश्चयें ॥ ३१ ॥ आतां पालाशविधिविधान ॥ ऐकें गरुडा सावधान ॥ देशांतरीं पावला मरण ॥ अदग्ध जाण तो झाला ॥ ३२ ॥ कृष्णाजिनावरी कुश ॥ घालोनि पुतळा करावा सरस ॥ ठेवोनियां पानें तयास ॥ तीनशें साठ जाणिजे ॥ ३३ ॥ पलाशवृक्षाचीं पत्रें आणुनी ॥ चाळीस घालावीं शिरस्थानीं ॥ दश मानेवरी ठेवोनी ॥ वीस वक्षःस्थळीं घालिजे ॥ ३४ ॥ जठरीं तीस अर्पिजे ॥ प्रत्येक बाहूवरी पन्नास ठेविजे ॥ हस्तांगुलींवरी दश ओपिजे ॥ जानू ऊरूंवरी पैं जाण ॥ ३५ ॥ शत पत्रें ठेवूनी ॥ तीस घालावीं जघनीं ॥ एकेक पादांगुलिस्थानीं ॥ गुह्यस्थानीं दश स्थापिजे ॥ ३६ ॥ मस्तकीं नारिकेळ[4] ॥ तालुदेशीं अलाबू[5] निवळ ॥ पंच रत्नें मुखीं सप्रवाळ[6] ॥ कदलीफळ जिव्हेमाजी ॥ ३७ ॥ दोन कवड्या नेत्रस्थानीं सुरेख ॥

१ मोठ्या दहा दिवसांच्या सुतकांत. २ एका सुवेरांत दुसरें सुवेर. ३ पळसाच्या पानांचा पुतळा करून जाळणें. ४ नारळ. ५ भोपळा. ६ पोंवळ्यासह.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

मस्तकीं घालिजे वालुक ॥ ताडपत्र कर्णस्थानीं देख ॥ वटांकुर केशस्थानीं ॥ ३८ ॥
कमलनाल[1] आंतडीस्थानीं ॥ मृत्तिका वेसा[2]धातूलागुनी ॥ धातु गंधकहरितालांनीं ॥
पारदानें रेत जाण ॥ ३९ ॥ पुरीषस्थानीं पितळ ॥ मांसीं यवपीठ निवळ ॥ तिळ-
पिष्टें संधिमेळ ॥ मधु रक्तस्थानीं घालिजे ॥ ४० ॥ त्वचास्थानीं मृगाजिन ॥ स्तन-
स्थानीं गुंजा शोभन ॥ नाभिस्थानीं कमळस्थापन ॥ वृषणीं जाण वृंताक[3] ॥ ४१ ॥
लिंगस्थानीं गाजर ॥ पट्टसूत्र परिधान वस्त्र ॥ यज्ञोपवीत घातल्यावर ॥ स्नपन
शालिग्रामशिलोदकें ॥ ४२ ॥ करावें विधिप्रमाण ॥ मुखीं घालावें सुवर्ण ॥ हृदयीं
गोपीचंदन लेपन ॥ तुलसी दर्भ तिल पंचगव्यें पवित्र कीजे ॥ ४३ ॥ सर्वौषधिसमा-
युक्त ॥ प्रेत करावें सुपूजित ॥ साग्निकविधानें समस्त ॥ यज्ञपात्रें ठेवावीं ॥ ४४ ॥
शालग्रामशिलोदकान ॥ युक्त मंत्रें करावें पावन ॥ तिलादि अष्टदानें जाण ॥
विष्णुप्रीत्यर्थ करावीं ॥ ४५ ॥ धेनु द्यावी वैतरणी ॥ विष्णु स्मरोनि लावावा अग्नी ॥

---

१ कमळाचा देंठ. २ चरबी. ३ वांगें.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

दश औषधी नामनिशाणी ॥ सांगतों तुज अंडजेंद्रा ॥ ४६ ॥ कुष्ठ[3] मांसी[3] हरिद्रा-
द्वय ॥ चंदन मुरा[4] शैलेय[5] ॥ वचा[6] चंपक मुस्ता[7] रमणीय ॥ सर्वौषधी दश ऐशा
ह्या ॥ ४७ ॥ जो गेला देशांतरासी ॥ त्याचें वर्तमान स्वजनांसी ॥ द्वादश वर्षें
न कळल्यासी ॥ क्रिया त्याची मग कीजे ॥ ४८ ॥ ऐकिलें जरी वर्तमान ॥
तरी क्रिया त्या दिवसापासून ॥ मासांत माघ भाद्रपद जाण ॥ पक्ष न समजतां
कृष्णपक्ष ॥ ४९ ॥ तिथींमाजी अष्टमी दर्श ॥ अधिकार आहे एकादशीस ॥
प्रयाणाचा जो दिवस ॥ कीजे सांवत्सरिक त्या दिनीं ॥ ५० ॥ पुतळा जो आतुर ॥
त्यासी प्रायश्चित्तादि प्रकार ॥ अष्ट दानविधि समग्र ॥ पूर्ववत करावे ॥ ५१ ॥
मातापितरांवांचुनी ॥ त्रिरात्रांतीं वृषोत्सर्गकरणी ॥ पित्याचा एकादश दिनीं ॥
वृषोत्सर्ग कीजे कश्यपसुता ॥ ५२ ॥ जे मेले दुर्मरणानें ॥ ते तरती नारायण-

१ खुणा. २ कोलिंजन. ३ जटामांसी. ४ मूर्वा, मोरवेल. ५ शिलाजीत. ६ वेखंड.
७ नागरमोथा. ८ या नांवाचें अनुष्ठान.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

बलीनें ॥ त्याचा विधि तुजकारणें ॥ अत्यादरें सांगतों ॥ ५३ ॥ गोब्राह्मणांसी जो मारिता ॥ स्वधर्मभ्रष्ट झाला असतां ॥ तो पतित जाणावा तत्त्वतां ॥ त्याची क्रिया वर्षानंतर ॥ ५४ ॥ नारायणबली करावी ॥ शरीर स्थिर नाहीं स्वभावीं ॥ यास्तव सद्यः आचरावी ॥ शुक्ल कृष्ण पक्षांत ॥ ५५ ॥ एकादशी पंचमी श्रवण ॥ सद्यःपक्ष केल्यासी जाण ॥ उक्त असे एकादश दिन ॥ नारायणबलीकारणें ॥ ५६ ॥ विप्र बोलावूनि मंत्रेंविद[1] ॥ पंच कुंभ[2] स्थापोनि शुद्ध ॥ ब्रह्मा विष्णु शिव यम प्रसिद्ध ॥ प्रेत पंचम जाणिजे ॥ ५७ ॥ सुवर्णप्रतिमा विशेषीं ॥ त्या स्थापाव्या पंचकलशीं ॥ कुंभ जल स्वर्ण गंध पल्लवेंसीं ॥ दूर्वा सर्वौषधी रत्नेंयुक्त ॥ ५८ ॥ वस्त्रयुग्में कीजे अलंकृत ॥ यवं[4] अथवा व्रीहीवरी[5] मंत्रोक्त ॥ स्थापूनि ब्रह्मादि स्थापित ॥ पृथक् मंत्रें करावे ॥ ५९ ॥ प्रेताचा मंत्र त्याचें नाम ॥ पूजा पांचांची सांग परम ॥ गरुडासी म्हणे पुरुषोत्तम ॥ अधिकारानुसार सर्व कीजे ॥ ६० ॥

---

१ एकाच दिवसांत करणें. २ वेदपाठी. ३ कलश. ४ जव. ५ भात.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

स्वगृह्योक्तविधिपूर्वक ॥ सिद्ध करावा पावक ॥ नारायणबली करूनि निष्टंक ॥ यथोक्त हवन करावें ॥ ६१ ॥ कुंभावरी दहा पिंड स्थापून ॥ विष्णुरूपी प्रेत स्मरून ॥ तन्निमित्त द्यावे भावेंकरून ॥ गोत्रनामोच्चारपूर्वक ॥ ६२ ॥ दक्षिणेकडे मुख करावें ॥ भूमीवरी दर्भ पसरावे ॥ तेथें मधु घृत तिलयुक्त पिंड अर्पावे ॥ वरी शंखोदक घालिजे ॥ ६३ ॥ यथासांग पूजूनि त्यांसी ॥ मग नदींत टाकावे निश्चयेंसीं ॥ मग करावें तर्पणासी ॥ प्रेतनिमित्त खगेंद्रा ॥ ६४ ॥ नंतर ब्रह्मा विष्णु कैलासपती ॥ तैसाचि किंकरांसह प्रेतपती ॥ ते हा बलि घेऊनि निश्चिती ॥ प्रेतासी शुभ गती देवोत ॥ ६५ ॥ ऐसी करूनि प्रार्थना ॥ मधुशर्कराज्यान्न द्यावें ब्राह्मणा ॥ प्रस्थें प्रमाण त्याचें जाणा ॥ ब्राह्मणतृप्तीकारणें ॥ ६६ ॥ रात्रौ करावें जागरण ॥ कुंभापुढें विष्णुकीर्तन ॥ दुसरे दिवशीं पंच ब्राह्मण ॥ ॥ ५४ ॥

---

१ आपापल्या गृह्यसूत्रांत सांगितल्याप्रमाणें. २ यम. ३ मध, साखर व तूप यांनीं युक्त अन्न. ४ पक्का शेर.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

बोलावूनि मध्यान्हीं पूजावे ॥ ६७ ॥ मागुती ब्रह्मादि देवांप्रती ॥ यथाविधि पूजावें निश्चिती ॥ एकोद्दिष्टविधानपद्धती ॥ पंचश्राद्धें करावीं सांग ॥ ६८ ॥ तिथ्यादि करूनि संकीर्तन ॥ प्रेतकर्म करावें संपूर्ण ॥ संप्रदानसिद्ध्यर्थ जाण ॥ श्राद्धेपंचक[2] करावें ॥ ६९ ॥ विरिंच्यादि एकतंत्रेंकरून ॥ पंचश्राद्धें करावीं जाण ॥ देवकार्य सव्येंकरून ॥ अपसव्यानें पितृकार्य ॥ ७० ॥ अक्षय्योदकसमयीं जाण ॥ तुळशी तिलोदक शंखीं घालून ॥ पिंडावरी धार घालितां संपूर्ण ॥ प्रेत पावे सद्गती ॥ ७१ ॥ प्रेतपिंडावरी सतिळ जळ ॥ ब्राह्मणें घालावें पुष्कळ ॥ स्वशाखोक्त मंत्रें निवळ ॥ पावो हें तिळोदक प्रेतासी ॥ ७२ ॥ श्लोक ॥ अनादिनिधनो देवः शंखचक्रगदाधरः ॥ अक्षय्यः पुंडरीकाक्षः प्रेतमोक्षप्रदो भव ॥ १ ॥ ऐसें प्रार्थूनि मग दक्षिणा ॥ प्रेतो-[3]द्दिश्य द्यावी जाणा ॥ सर्व प्रेतकर्मीं बहु ब्राह्मणा ॥ दक्षिणा द्यावी वैनतेया ॥ ७३ ॥ समाप्त कर्म झाल्यावरी ॥ स्नान करावें गंगातीरीं ॥ यस्य स्मृत्येति मंत्रोच्चारीं ॥

१ सांगतेकरितां. २ पांच श्राद्धें. ३ प्रेताच्या नांवानें.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

कर्म संपूर्ण करावें ॥ ७४ ॥ गरुडा मग माझें पूजन ॥ करूनि [1]आप्तांसह भोजन ॥ अवश्य करावें पायसान्न ॥ पितृकार्यीं तृप्ति कीजे ॥ ७५ ॥ धनिष्ठादि नक्षत्रपंचक ॥ मृतासी अत्यंत दुर्गतिदायक ॥ कुलासही अशुभप्रापक ॥ होय [2]आगम बोलिजे ॥ ७६ ॥ ऐसें जाणोनि त्वरित ॥ तद्दोषनिरसन करावें समस्त ॥ दर्भप्रतिमा पंचसूत्रवेष्टित ॥ पांचही कराव्या सुलक्षण ॥ ७७ ॥ [3]यवपिष्टें लेपाव्या समस्त ॥ त्या जाळाव्या पुतळ्या यथोक्त ॥ प्रेतवाहक शिरस्थानीं निश्चित ॥ नेत्रीं प्रेतसखा स्थापावा ॥ ७८ ॥ प्रेतरक्षिता वामकुक्षीसी ॥ प्रेतभूमिरक्षिता नाभिदेशीं ॥ पादीं स्थापावें प्रेतहर्त्यासी ॥ [4]आज्याहुती भिन्न नामें ॥ ७९ ॥ एकेका मुखीं तीन तीन वार ॥ घालावें गरुडा यथाप्रकार ॥ आशौचांतीं शांति समग्र ॥ नक्षत्रमूर्ति सुवर्णाच्या ॥ ८० ॥ करोनि करावी विधियुक्त ॥ पूजा करावी अद्भुत ॥ तैलपूर्ण कांस्यपात्र सुवर्णयुत ॥ माष द्रोणपरिमित पैं द्यावे ॥ ८१ ॥ एक गाई द्रोणसंख्या तिळ ॥

१ नातलगांबरोबर. २ शास्त्रें व स्मृति. ३ जवांच्या पिठानें. ४ तुपाच्या आहुति. ५ उडीद.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

शत पळें आज्य निर्मळ ॥ दक्षिणा द्यावी पुष्कळ ॥ दोषनिवारण तेणें होई ॥ ८२ ॥ पंच कलश कृष्णवर्ण ॥ सर्वौषधि जळ घालून ॥ माषराशी खालीं करून ॥ वरी कलश स्थापावे ॥८३॥ मुखीं नारिकेल ठेवावें ॥ वस्त्रेंकरूनि वेष्टावें ॥ वरी मूर्तीचें स्थापन करावें ॥ मग पूजावें यथाविधि ॥ ८४ ॥ पूजांतीं करावीं दानें ॥ पंचकीं[1] अन्य कार्यैंही वर्जणें ॥ गृह शय्या तृण काष्ठ संचणें ॥ प्रयाणादि वर्ज्य सर्व कार्यें ॥ ८५ ॥ पंच नक्षत्रांचे पंच मंत्र ॥ भिन्न असती ते निजाकार ॥ म्हणावे जाणूनि प्रकार ॥ श्रोते चतुर समजोत पैं ॥ ८६ ॥ शुभकार्य[2] पंचकामाझारी ॥ करितां अशुभ घडे सपारी ॥ ऐसा विधि करितां उरगारी ॥ प्रेतासी गती उत्तम होय ॥ ८७ ॥ कुळासही घडे कल्याण ॥ सर्पदंशें जो पावला मरण ॥ त्याच्या पुत्रें नागपूजन ॥ करावें जाण शुद्ध पंचमीसी ॥ ८८ ॥ त्या दिवशीं करावें उपोषण ॥ अथवा करावें नक्त[3]-भोजन ॥ पिष्टाचे नाग कीजे सगुण ॥ नामाभिधानें त्यांचीं ऐक ॥ ८९ ॥ वासुकी

१ धनिष्ठा आदि पांच नक्षत्रें (धनिष्ठापंचक). २ विवाह, मुंज आदि. ३ अस्तमानीं भोजन करणें.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

आणि अनंत ॥ शंख पद्म कंबल विख्यात ॥ अश्वतर धृतराष्ट्र कद्रुजात ॥ कालिय आणि शंखपाल ॥ ९० ॥ तक्षक कपिल शेष ॥ नाममंत्रें पूजा प्रतिमास ॥ पायस-भोजन ब्राह्मणांस ॥ भक्तियुक्त घालावें ॥ ९१ ॥ संवत्सरांतीं सौवर्ण नाग ॥ गाईसह द्यावा सांग ॥ नारायणबली करितां देख ॥ गति उत्तम पावतसे ॥ ९२ ॥ अन्यही शुद्धपंचमीस ॥ पूजा करावी पुष्पें विशेष ॥ शतपत्र करवीर जाती कुसु-मांस ॥ मेळवूनि पूजन करावें ॥ ९३ ॥ तेणें नाग संतोषती ॥ पितरांसी होय परम-गती ॥ सर्व पूर्वोक्त विधानरीती ॥ करितां हर्षती पितर देव ॥ ९४ ॥ ऐशी कथा गरुडाप्रती ॥ स्वमुखें निवेदी श्रीपती ॥ नैमिषारण्यीं सूत कथी ॥ बाबाजी प्रार्थी श्रोतयां ॥ ९५ ॥ द्वादश अध्यायामाझारी ॥ दुर्मरण पालाशविधि बरी ॥ आणि नारायणबली मुरारी ॥ सर्पदंशपरी कथिता झाला ॥ ९६ ॥ इति श्रीगरुडपुराणे प्रेतकल्पे गरुडनारायणसंवादे नारायणबलिनिरूपणं नाम द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥

१ वर्षाच्या अखेरीस.
Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

॥ श्रीगणेशाय नमः ॥ नारायणबलिनिरूपण ॥ जाहल्यावरी श्रीभगवान ॥
ऐसें बोलिला वचन ॥ म्हणे गरुडा अवधारीं ॥ १ ॥ सूतिका आणि रजस्वला
नारी ॥ दैवें मरण पावली जरी ॥ [1]उद्धृतोदक पंचगव्यें तरी ॥ शुद्ध नारी
करावी ॥ २ ॥ तीन करावीं चांद्रायणें ॥ आणि [2]प्रतिनिधि आचरणें ॥
यवपिष्टें लेपन करणें ॥ अष्टोत्तर स्नानें [3]शूर्पें कीजे ॥ ३ ॥ मग घेऊनि शुद्ध
वस्त्र ॥ वेष्टावें प्रेताचें शरीर ॥ दहन करावें यथाप्रकार ॥ विधान सर्व
करोनियां ॥ ४ ॥ तीन दिवसांत सूतिका नारी ॥ मरण पावली असे जरी ॥
तीन [4]अब्दांनीं शुद्ध तरी ॥ होत नारी जाणिजे ॥ ५ ॥ सहा दिवसांआंत
मरण ॥ जरी पावे बाळंतीण ॥ तरी दोन अब्दांनीं जाण ॥ नवम दिवसांत
एक अब्द ॥ ६ ॥ मरण झाल्या मासाआंत ॥ कृच्छ्रत्रयें शुद्धी होत ॥
गर्भिणीसी मरण झालें प्राप्त ॥ जलसहित [5]गोमयें न्हाणिजे ॥ ७ ॥ मंत्रें भर्त्यानें

१ वर काढलेलें पाणी. २ शास्त्रोक्त दुय्यम अधिकारी. ३ सुपानें. ४ वर्षांनीं. ५ गाईच्या शेणानें.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

कीजे प्रोक्षण ॥ प्रेत न्यावें स्मशानीं जाण ॥ भ्रतारें करावें सव्योदर छेदन ॥ जरी पुत्र जिवंत निघे ॥ ८ ॥ तरी त्या पुत्रासी घेऊनी ॥ स्तनपान करावें मंत्रेंकरूनी ॥ ग्रामामाजी पूर्वीं पुत्र नेऊनी ॥ पृषदाज्यें उदर भरावें ॥ ९ ॥ तंतूनें वेष्टन करूनी ॥ मृद्भस्म कुश गोमूत्रांनीं ॥ उक्त मंत्रें स्नान घालुनी ॥ शवधर्मे दहन कीजे ॥ १० ॥ गाई आणिक तिळ ॥ भूमि आणि सुवर्ण निर्मळ ॥ आणिकही दानें द्यावीं पुष्कळ ॥ सद्गतिप्राप्तीकारणें ॥ ११ ॥ मृत गर्भ निघे जरी ॥ प्रक्षालोनि पुरावा तरी ॥ स्त्रीचा भ्रतार मेलियावरी ॥ अग्निप्रवेश तिणें कीजे ॥ १२ ॥ पतीसह देह दहन करावा ॥ ब्रह्मचर्य नैष्ठिकें अथवा ॥ सहगमनावांचूनि बरवा ॥ धर्मोपाय नसे कलीमाजी ॥ १३ ॥ पक्षिराजा वैधव्य पाळणें ॥ अग्नीहूनि दुःसह जाणणें ॥ अधर्म घडतां काया वाचा मनें ॥ नरक प्राप्त पतीसह ॥ १४ ॥ त्या विधवेचे धर्म किंचित ॥ निरूपितों प्रसंगोचित ॥ विधवा जरी केश राखित ॥ त्या केशें बांधित भ्रतारासी ॥ १५ ॥

१ पोटाचा डावा भाग. २ दहीं व तूप यांचें मिश्रण. ३ सुतानें. ४ धुऊन. ५ एकनिष्ठ.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

यास्तव करावें शिरोमुंडण ॥ एक वेळ सदा भोजन ॥ कांस्यपात्रीं न जेवावें अन्न ॥ भूमिशयन सदा करावें ॥ १६ ॥ कंचुकी कदा लेऊं नये ॥ तैलोद्वर्तन[1] कामा न ये ॥ तांबूलभक्षण वाहनीं बैसूं नये ॥ तिलोदकें तर्पण भर्त्याचें कीजे ॥ १७ ॥ क्षयदिनीं अपुत्रिणीनें ॥ भर्तृश्राद्ध पार्वणविधीनें ॥ करावें यथोक्तविधानें ॥ मधु मद्य परान्न वर्जावें ॥ १८ ॥ उत्साह न पहावा कचित ॥ न करावें नृत्य वाद्य गीत ॥ श्रवण न करावें किंचित ॥ ज्ञानाभ्यास नित्य करीत जावें ॥ १९ ॥ वैराग्य असावें कडकडीत ॥ जप शिव हरीचा युक्त ॥ चित्रींही न विलोकावें रत[2] ॥ सेवावे वृद्ध साधु गुरु ॥ २० ॥ पुराणश्रवण नित्य करावें ॥ गुरुसेवा जितेंद्रिय असावें ॥ ऐशा शरीरनिर्वाहें बरवें ॥ पद पावावें नारीनें ॥ २१ ॥ सर्व शोषावे शरीररस ॥ जी विधवा आणि दीर्घकेश ॥ रक्तवस्त्रमंडित कंचुकीस ॥ शय्येस स्पर्शिता[3]

---

१ अंगाला तेल लावणें. २ भर्तृत्वीला उद्देशून (नवरा, सासरा व आजेसासरा). ३ स्त्रीपुरुषांचा संग. ४ पलंग - मंचकादि.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

जियेची ॥ २२ ॥ ऐशी विधवा दृष्टीस पडली ॥ तरी सूर्यावलोकनें शुद्धि भली ॥ नातरी दोषाची साउली ॥ पहात्यावरी पडतसे ॥ २३ ॥ व्रताराची प्रतिमा करावी ॥ मृत्ताम्रवर्ण रौप्य बरवी ॥ विष्णुमंत्रें पूजा आघवी ॥ करीत जावी नित्य पैं ॥ २४ ॥ शक्त्यनुसार करावें दान ॥ मोठें अथवा कीजे सान ॥ स्त्रियेसी नाहीं स्वतंत्रपण ॥ कोण्याही वयामाझारी ॥ २५ ॥ पिता भ्राता आणि सुत ॥ क्रमेंचि तिघे हे विख्यात ॥ देवर श्वशुर साधु संत ॥ पाळण करिती स्त्रियेचें ॥ २६ ॥ दंत काढूनि हास्य करीत ॥ त्यांजवळी न बैसावें निश्चित ॥ कृच्छ्रचांद्रायणें बहुत ॥ करोनि काल क्रमिजे पैं ॥ २७ ॥ ऐसा विधवेचा आचार कठिण ॥ म्हणोनि करावें सहगमन ॥ क्षणभरी दुःख भोगितां जाण ॥ सुख अपार स्वर्गीं भोगी ॥ २८ ॥ वेदोक्त कर्म सांडुनी ॥ पाखंड आचरती जे जनीं ॥ ते मरतां महापिशाचयोनी ॥ पावती चंद्र-तरणि जों ॥ २९ ॥ नाहीं जेथें ब्राह्मणपूजन ॥ हरिशंकरांचें अर्चन ॥ माता-

१ मातीची किंवा तांब्याची. २ दीर. ३ पतीसह सती जाणें. ४ चंद्र सूर्य आहेत तोंपर्यंत.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

पितरांचें तर्पण ॥ न अर्चन पितृदेवांचें ॥ ३० ॥ स्वइच्छेनें देव कल्पित ॥
स्वइच्छेनें करिती व्रत ॥ स्वइच्छेनें दानें करीत ॥ श्रुति स्मृतीं असंमत जीं ॥ ३१ ॥
न मानी विष्णुशंकरांसी ॥ तेथें शास्त्राची कथा कायसी ॥ ऐसे पुरुष भूमीसी ॥
पाखंडी निश्चयेंसीं ते मूर्ख ॥ ३२ ॥ पाखंडी अत्यंत बहिर्मुख[1] ॥ वेद विप्रीं वर्ज्य
सकळिक ॥ माझा नाममहिमा ऐक ॥ तुज सम्यक निवेदितों ॥ ३३ ॥ संकेतें[2]
अथवा परिहासानें[3] ॥ निमित्तें अथवा हेळणेनें[4] ॥ माझें नाम उच्चारितां वदनें ॥
महापापें हरताती ॥ ३४ ॥ जरी वेद सर्व आला ॥ आणि पाखंडमत आचरला ॥
तरी वेद त्या मूढाला ॥ न करी भूतळा पावन पैं ॥ ३५ ॥ माझें नाम कवणे
रीती ॥ उच्चरितां पापें हरती ॥ जे वेद जाणोनि पाखंड करिती ॥ तेही उद्धरती
मम नामें ॥ ३६ ॥ दान न कळे जन्माभीतरी ॥ दया नसेचि अंतरीं ॥ व्रतोप-
वास नानापरी ॥ न करी अघोरी[5] सर्वदा ॥ ३७ ॥ तयासी निश्चयें प्रेतयोनी ॥

---

१ धर्मकर्मांत श्रद्धा नसलेला. २ विशिष्ट खुणेनें. ३ थट्टेनें. ४ निंदेनें. ५ भयंकर कृत्यें करणारा.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

कधींही मुक्त होईना त्यापासूनी ॥ माझ्या नामउच्चारणीं ॥ उद्धरे प्राणी तत्काळ ॥ ३८ ॥ तस्मात् गरुडा सर्वकाळ ॥ मन्नामोच्चार करावा निर्मळ ॥ परोपकार करावे पुष्कळ ॥ दुर्लभ भूतळ जंबुद्वीप[1] ॥ ३९ ॥ त्याहीमाजी भरतखंड विशेष ॥ येथें साधावें स्वर्गलोकास ॥ येथींच्या कर्मेंचि नरकवास ॥ तीन्ही गतींस हे भूमि ॥ ४० ॥ यास्तव मृताचें और्ध्वदेहिक ॥ विध्युक्त करावें मनुजें सांग ॥ न करी तो जिताचि देख ॥ प्रेतलोकस्थ जाणावा ॥ ४१ ॥ मोह लोभ कामेंकरूनी ॥ पितृ-क्रिया न करी जनीं ॥ पानभोजनादि सर्वस्थानीं ॥ तयासी जनीं घेऊं नये ॥ ४२ ॥ मृतश्राद्ध न करी सांग ॥ तो जाणावा पंक्तिदूषक[2] ॥ मरतां पावे प्रेतलोक ॥ पितृ-उद्धार जे न करिती ॥ ४३ ॥ ते निश्चयें होती प्रेत ॥ सकळ प्राण्यांसी पीडा देत ॥ ऐसें ऐकोनि गरुड बोलत ॥ भगवंता ऐकें मात[3] माझी ॥ ४४ ॥ जे पावती प्रेतयोनी ॥ ते कोण्या रूपेंकरूनी ॥ कोणासी पीडिती या जनीं ॥ काय लक्षणीं

१ या नांवाचें एव द्वीप. २ पंक्तीला दोषी करणारा. ३ बोलणें (प्रश्न).

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

समजावे ॥ ४५ ॥ काय बोलती काय जल्पती ॥ भगवंता देवदेवा श्रीपती ॥ तरी हा संशय छेदीं निश्चिती ॥ कलींत होती प्रेत बहू ॥ ४६ ॥ ऐकोनि गरुडाची वाणी ॥ बोलता झाला चक्रपाणी ॥ गरुडा ऐकें प्रेतकरणी ॥ स्वकुळें धरणींं[1] पीडिती ते ॥ ४७ ॥ छिद्रें[2] पाहोनि इतर जन ॥ पीडिती पापसंधि लक्षून ॥ जिवंत असतां प्रीति गहन ॥ मेल्या पीडन तेचि करिती ॥ ४८ ॥ प्रेताची पीडा कोणासी न होत ॥ ते पुण्यात्मे ऐकें निश्चित ॥ जे रुद्रप्रीत्यर्थ जप करीत ॥ देवतातिथि[3] पूजीत नित्य पैं ॥ ४९ ॥ सत्यवादी प्रियभाषणी ॥ आणि जपकर्ते प्रतिदिनीं ॥ नित्यकर्म श्राद्धकर्ते जनीं ॥ तीर्थस्नानी जे नित्य ॥ ५० ॥ इतुके जन प्रेताचेनी ॥ वक्रदृष्टीं न पाहवती जनीं ॥ मग त्यांसी पीडा करणी ॥ घडेल कोठूनि खगपती ॥ ५१ ॥ आतां पीडिती कोणासी ॥ त्यांचीं लक्षणें परियेसीं ॥ सर्व कर्मभ्रष्ट[4] नास्तिकासी ॥

१ पृथ्वीवर. २ प्रसंगीं धर्मांत व्यंगता. ३ देव आणि अभ्यागत. ४ स्नानसंध्यादि कर्मे न करणारा.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

वेदनिंदकासी पीडिती ते ॥ ५२ ॥ असत्यवादी आणि द्वेषी ॥ हे योग्य प्रेतास
पीडेसी ॥ आतां प्रेतपीडा होते कैसी ॥ तें तुजसी निरूपितों ॥ ५३ ॥
कलीमाजी शुद्ध क्रिया ॥ होत नाहीं पक्षिराया ॥ म्हणोनि प्रेतयोनि प्राणियां ॥
प्राप्त व्हावया कारण हें ॥ ५४ ॥ कृतत्रेतद्वापरांतीं ॥ प्रेतें बहुत न होती ॥
कदाचित् झाल्या पीडावया निश्चिती ॥ प्राणी त्यांप्रति न सांपडे ॥ ५५ ॥
असो आतां ऐक प्रस्तुत ॥ एक उदरीं बहु जन्म घेत ॥ त्यांमाजी एक सुख पावत ॥
एक होत दुष्कृत[1]कर्मा ॥ ५६ ॥ एक होई संततिमान ॥ एकासी प्रेतपीडा दारुण ॥
एक होई धनवान ॥ एकाचे मरण पुत्र पावती ॥ ५७ ॥ एकासी कन्याचि होती ॥
विरोध पडे बंधुबंधूंप्रती ॥ हे प्रेतदोष निश्चिती ॥ विहंगमपति जाण तूं ॥ ५८ ॥
उपजतां पोरें मरती ॥ कोणासी न होई संतती ॥ द्रव्य पशू नाश पावती ॥ ॥ ६० ॥
विपर्यास[2] प्रकृती पैं पावे ॥ ५९ ॥ अकस्मात पडे व्यसन ॥ नास्तिक व्रतलोप[3] घडे

१ पातककर्मे करणारा. २ विरुद्ध स्वभावाचा. ३ एकादशीआदि व्रत मोडणें.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

जाण ॥ मद मोह दंभ कलह करून ॥ प्रेतपीडालक्षण ऐसें हें ॥ ६० ॥ पिता माता गुरूसी ॥ द्रोह पडे जयासी ॥ देवब्राह्मणनिंदा परियेसीं ॥ हत्यादोषासी प्रवर्तत ॥ ६१ ॥ नित्यकर्म-जप-होमवर्जित ॥ परद्रव्य हरण करीत ॥ सुभिक्षीं शेत न पिकत ॥ व्यवहार [1]आंत सर्वदा येई ॥ ६२ ॥ लोकांमध्यें कलह पडे ॥ वावटळी-माजी सांपडे ॥ हीनजातीसीं संबंध घडे ॥ हीन कर्म आवडे जिवालागीं ॥ ६३ ॥ अधर्मीं रमे नित्य मन ॥ व्यसनीं द्रव्य जाई संपूर्ण ॥ चोर राजा करी हरण ॥ प्रेतपीडालक्षण हें ॥ ६४ ॥ महारोगांची होय प्राप्ती ॥ तैशीच स्त्रीही पीडे निश्चिती ॥ देव-ब्राह्मण-तीर्थांची प्रतीती ॥ ज्या मानवासी न येतसे ॥ ६५ ॥ [3]प्रत्यक्ष [3]परोक्ष दोष घडत ॥ गृहामाजी कलह पडत ॥ भोजनकाळीं कोप येत ॥ परद्रोह अमित घडे ज्यासी ॥ ६६ ॥ सांवत्सरादिक श्राद्ध न करी ॥ तीर्थादि सत्कृत्यें त्याग करी ॥ धर्मकार्यीं संपत्ति न प्रेरी ॥ गर्भनाश नारी पावत ॥ ६७ ॥ न घडे पुण्याचा लेश ॥

१ सुवत्ता असतां. २ तोव्यांत. ३ जाणतां न जाणतां.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

मरण होई बाळकांस ॥ न मानी पितृवाक्यास ॥ संपत्तीस सेवी न जो ॥ ६८ ॥
सदा ज्याची क्रूर मती ॥ सदा उच्चाट[2] मनाप्रती ॥ स्वपत्नीसीं करितां रती ॥
गर्भ निश्चिती न राहे ॥ ६९ ॥ शुभ कर्म केलें असतां ॥ तेथें दुःखाची होई
प्राप्तता ॥ कर्म करोनि कीर्ति जोडितां ॥ अकीर्ति हाता चढतसे ॥ ७० ॥ पिता
माता भार्या पुत्र ॥ गुरुशिष्यांसीं कलह अपार ॥ चिंतीत असतां धर्मप्रकार ॥
अधर्म निर्धार घडतसे ॥ ७१ ॥ वनस्पती गाई क्षेत्रांत[3] ॥ फलप्राप्ति न घडे
किंचित ॥ फलप्राप्तिकाळीं नाश होत ॥ औषध सेवितां रोग न जाई ॥ ७२ ॥
सदा करितां पथ्यान्न[4] भक्षण ॥ क्षुधा मंद होई जाण ॥ पत्नीसी स्वकाळीं
ऋतुदान ॥ गर्भधारण नेणेचि परी ॥ ७३ ॥ गर्भ राहिल्या होई पात ॥
स्वकुळांत द्वेष पडत ॥ ब्राह्मणभक्ति सर्व लोपत ॥ स्वकर्म श्राद्ध एकादशी ॥ ७४ ॥
कांहींचि न आवडे तयांसी ॥ पोरें होऊनि अपुत्री परियेसीं ॥ दंपत्यें प्रतिकूळ[5]

१ सवतीला, दुसऱ्या स्त्रियेला. २ उद्विग्नपणा. ३ शेतांत. ४ पथ्यकारक अन्न. ५ हाडवैरी.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अहर्निशीं ॥ दंतकलहासी करिती सदा ॥ ७५ ॥ नित्य करी नीचसंगती ॥ नित्यकर्मीं पराङ्मुख अती ॥ नित्ययज्ञ परित्याग निश्चिती ॥ कर्मपद्धती न करी सदा ॥ ७६ ॥ हत्यादोष अकस्मात ॥ घडे कलंक[2] होई प्राप्त ॥ तरुण पशु पुत्र नासत ॥ क्षय सर्व होत वित्ताचा ॥ ७७ ॥ मित्र ते होती अमित्र[3] ॥ पथ्यचि होई विष तीव्र ॥ ऐशी प्रेतपीडा दुर्धर ॥ होत खगेंद्रा जनांसी ॥ ७८ ॥ तस्मात् प्रेतकोप न करावा ॥ खगश्रेष्ठा विधि जाणोनि बरवा ॥ प्रेताचा उद्धार करावा ॥ न मानी प्रेताला तो मेल्या ॥ ७९ ॥ प्रेतयोनी पावे निश्चित ॥ प्रेतदोष ज्या कुळीं असत ॥ सुखप्राप्ती तेथें नसत ॥ पाप कर्म करीत निर्धन-योगें ॥ ८० ॥ मुखोच्छिष्ट पादोच्छिष्ट ॥ तैसेंचि पाणी स्नानोच्छिष्ट ॥ प्राशन करूं नये स्पष्ट ॥ अन्न उच्छिष्ट तेणेंचि परी ॥ ८१ ॥ जे कोणी प्रेतरूप होती ॥ तयांची ऐक आकृती ॥ विकृत भयानक रूपें दिसती ॥ मुख्य दृष्टि दाढा

---

१ सुखासुखी अचकट विचकट शब्दांनीं भांडण. २ डाग (दोष). ३ शत्रु.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

भयानक ॥ ८२ ॥ विकटरूपी अति दारुण ॥ गोत्रजांसी होती दृश्यमान ॥ सुत दुहिता पितृ भ्रातृ जन ॥ जाया बांधवां न दिसती ते ॥ ८३ ॥ कामरूप क्षणक्षणां धरिती ॥ त्यांची किंचित नसे शुभ मती ॥ भाषणें नानारीती करिती ॥ वित्तभोगीं मति लुब्ध ज्यांची ॥ ८४ ॥ ते दैवें पिशाचयोनी ॥ स्वपापें स्मरती पावोनी ॥ ऐशी घोर प्रेतयोनी ॥ पावे प्राणी मरणांतीं ॥ ८५ ॥ ऐशी कथा निरूपण ॥ गरुडासी करी श्रीभगवान ॥ सूत कथी ऋषींलागून ॥ बाबाजी जाण साधूंसी विनवी ॥ ८६ ॥ इति श्रीगरुडपुराणे प्रेतकल्पे गरुड-नारायणसंवादे प्रेतयोनिकथनं नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ ॥ ७ ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

॥ श्रीगणेशाय नमः ॥ प्रेतयोनीचें लक्षण संपूर्ण ॥ पूर्वाध्यायीं केलें निरूपण ॥ चतुर्दशाध्यायीं श्रीभगवान ॥ बोलता वचन स्वयें झाला ॥ १ ॥ म्हणे गरुडा अवधारीं ॥ प्रेतोपाख्यान श्रवण करीं ॥ श्रवणें महापापांची मोहरी[1] ॥ होई निर्धारीं वैनतेया ॥ २ ॥ पूर्वीं पंचप्रेतें ब्राह्मणें ॥ उद्धरिलीं कृपावलोकनें ॥ ती कथा ऐकें एकमनें ॥ अत्यादरेंकरोनियां ॥ ३ ॥ कोणी एक भला ब्राह्मण ॥ तीर्थयात्रा करी नित्य जाण ॥ सर्व तीर्थांप्रति भक्तीन ॥ जात नेम धरोनियां ॥ ४ ॥ ऐसें फिरत फिरत मरुदेश[2] ॥ पावला खइच्छें[3] तापस ॥ तों देखिलें पंच प्रेतांस ॥ जीं सर्व प्रेतांस दुरासद[4] ॥ ५ ॥ तो विप्र नरसिंहउपासक ॥ भय पावला नाहीं तिळ एक ॥ प्रेतांची आकृति भयानक ॥ तुज सम्यक निवेदितों ॥ ६ ॥ बीभत्स शरीरें दिसती ॥ विकृत[5] वांकडीं तोंडें असती ॥ पांचही नग्न फिरती ॥ शुष्कोदर अति दीर्घ पाद ॥ ७ ॥ हस्त आंखूड उंच कृश ॥

१ चुराडा, नाश. २ मारवाड देश. ३ वश न होणारीं. ४ चमत्कारिक. ५ पोट वाळलेले.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

विस्फारितदंत व्यात्तआस्य[2] ॥ दीर्घ दाढा लाळ वाहे तोंडास ॥ माजी जिव्हा
लळलळीत पैं ॥ ८ ॥ नासिकें जैशा पर्वतदरी ॥ विप्रभक्षणा धांवलीं झडकरी ॥
हाहाकारशब्दें गजरीं ॥ पावलीं समीप विप्राचिया ॥ ९ ॥ विप्रें केला हुंकार ॥
तो ब्राह्मण तापसी थोर ॥ स्तंभित[3] केले चरण समग्र ॥ हुंकारशब्दें प्रेतांचे ॥ १० ॥
विप्रदर्शनमाहात्म्येंकरून ॥ गरुडा झालें पूर्वस्मरण ॥ मग कृपाळू तो ब्राह्मण ॥
प्रेतांलागीं बोलियेला ॥ ११ ॥ कोण तुम्ही विकृताकृती ॥ शीघ्र कथावें मज-
प्रती ॥ व्यर्थ काळ आमुचा निश्चिती ॥ जातो यास्तव झडकरी बोला ॥ १२ ॥
ऐशी ऐकोनि विप्रभारती ॥ प्रेतें बोलती ब्राह्मणाप्रती ॥ आम्ही पंच प्रेतें या
जगतीं ॥ अति निर्जला क्षिति येथें वसों ॥ १३ ॥ कृतकर्माच्या प्रभावान ॥
क्षुधित तृषित रात्रंदिन ॥ छायेसी बैसावया जाण ॥ तिळप्रमाण शक्ति नाहीं ॥१४॥ ॥ ६३ ॥
नद्यादि वाहत्या उदकाचें पान ॥ न करवे ऐशी पीडा दारुण ॥ परस्परें

---

१ पसरल्या दांतांचे. २ तोंड पसरलेले. ३ आंखडलेले (स्तब्ध). ४ ब्राह्मणाची वाणी.

Sri Vidyabharati Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

भोगितों ती बोलावया जाण ॥ शक्ति नसे द्विजराया ॥ १५ ॥ आजि तुझ्या दर्शनें-
करून ॥ वाक्शक्ति आली जाण ॥ बहुधा आमुचीं पापें क्षीण ॥ तव दर्शनें
जाहलीं ॥ १६ ॥ ब्रह्मन् तुझ्या प्रसादेंकरूनी ॥ गति प्राप्त होईल आम्हांलागूनी ॥
यास्तव आजि प्रसादेंकरूनी ॥ आम्हां पापियां उद्धरावें ॥ १७ ॥ ऐशी ऐकोनि
तयांची वाणी ॥ मागुती विप्र पुसे तयांलागुनी ॥ कैशी पूर्वींची दुष्कृत करणी ॥
जिणें ही योनी प्राप्त झाली ॥ १८ ॥ तें मज करावें निरूपण ॥ मग पापें ते बोलती
भिन्न भिन्न ॥ ब्राह्मण ऐके सावधान ॥ पापलक्षण तयांचें ॥ १९ ॥ प्रथम बोले एक
प्रेत ॥ मी एक पाप स्मरत ॥ अन्य पाप केलें नाहीं निश्चित ॥ चित्तीं वसत कल्मष
जें ॥ २० ॥ पूर्वीं होतों मी ब्राह्मण ॥ सदा करीं वेदपठण ॥ बाप मेल्यावरी जाण ॥
त्याचें वित्तें बहुत होतें ॥ २१ ॥ तें घेऊनि मी लोभ पावलों ॥ मग पितयाची
क्रिया नाचरलों ॥ त्या पापें ही योनी पावलों ॥ मुक्त होईन तव प्रसादें ॥ २२ ॥

---

१ बोलण्यासें समर्थ. २ पापरूप. ३ पाप. ४ द्रव्य.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

मग बोले पिशाच दुसरें ॥ मी क्षत्रिय जातीचा जन्मांतरें ॥ ब्राह्मण आणि मनुष्य सारें ॥ समान मी मानिता जाहलों ॥ २३ ॥ मी ब्राह्मणांसी ऐसें विचारीं ॥ तुम्ही पूज्य कां देहधारी ॥ तुम्ही आम्ही समान धरित्रीं ॥ दोरा पुत्र आम्हां तुम्हां ॥ २४ ॥ तुमचा आमुचा जन्म समान ॥ तुम्ही अधिक आहां कशान ॥ ऐसें मी नित्य करीं छळण ॥ त्यांचें पूजन मम भ्राता करी ॥ २५ ॥ असो मी पावलों मरण ॥ यमलोकीं दूतीं नेला धरून ॥ यम न पाहे माझें वदन ॥ विप्रअपमान केला म्हणोनी ॥ २६ ॥ कुंभीपाकादि[2] नरक बहुत ॥ कोटियुगें भोगिले निश्चित ॥ जन्म झाला प्रेतयोनींत[3] ॥ झालों पुनीत तव दर्शनें ॥ २७ ॥ वैनतेया[4] तदनंतर ॥ तिसरें प्रेत बोले उत्तर ॥ म्हणे पूर्वजन्मीं मी वैश्य नर ॥ ऐक कर्म घोर विप्रा माझें ॥ २८ ॥ मी करीं क्रयविक्रय[5] ॥ द्रव्य मेळवीं सोडोनि न्याय ॥ आन्हिकही[6] आचरें रमणीय ॥ स्वउद्धार व्हावा म्हणोनी ॥ २९ ॥ जन धरिती माझा विश्वास ॥ ठेवी राहिल्या

१ स्त्रिया. २ या नांवांचे नरक. ३ भूत, पिशाच योनींत. ४ गरुडा. ५ व्यापार. ६ स्नानसंध्यादि.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

मम गृहीं विशेष ॥ तंव मृत्यु पातला देहास ॥ यमपुरीस नेलें मातें ॥ ३० ॥ सहस्र वारुणपाशें[1] बांधोनी ॥ सहस्र कुंभीपाकस्थानीं ॥ सहस्र अंधतामिस्रीं घालूनी ॥ पूयसमुद्रीं सहस्रसंख्या ॥ ३१ ॥ शीत उष्ण पर्जन्य दारुण ॥ ऐशा यातना भोगूनि जाण ॥ शेखीं प्रेतदेह पावोन ॥ कोटि वर्षगण आयुष्य ॥ ३२ ॥ अतःपर मनीं जाणतों ॥ ब्रह्मस्वातें[2] विष मानितों ॥ विष भक्षितां देह मरतो ॥ ब्रह्मस्व भोगितो जीव यातना ॥ ३३ ॥ कीजे उपाय सुमंगळ ॥ तव प्रसादें मुक्ति केवळ ॥ पावेन ब्राह्मणोत्तमा विमळ ॥ ऐसा विक्राळ बोलोनि सरे ॥ ३४ ॥ चतुर्थ प्रेत बोलियेला ॥ ब्राह्मणा माझा कर्मविपाक भला ॥ श्रवण करीं दयाशीळा ॥ पूर्वजन्माला विप्र होतों ॥ ३५ ॥ परी मी असें स्त्रीजित[3] ॥ आचार गृहकार्य समस्त ॥ स्त्रियेनें केलें तें प्रमाण मानीत ॥ सूँतिका[4] रजोदोष न पाळी स्त्री ॥ ३६ ॥ आणीक स्त्रीभीती-स्तव ॥ महालय अमावास्या अभिनव ॥ क्षयदिवशीं[5] स्त्रीभीतीस्तव ॥ श्राद्धविधि

१ वरुणाचे पाशानें. २ ब्राह्मणाचें द्रव्य. ३ स्त्रियेच्या आज्ञेंत वागणारा. ४ बाळंतीण. ५ मृतदिवशीं.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

न करीं मी ॥ ३७ ॥ आपुला पितृवर्ग माझ्या धनें ॥ नित्य पोशी ती प्रीतीनें ॥ माझ्या पित्याच्या परिवाराकारणें ॥ उदकही देणें न घडे कधीं ॥ ३८ ॥ त्या घोर पापें अनेक नरक ॥ भोगोनि ही योनी पावलों देख ॥ रात्रंदिवस ताप अनेक ॥ भोगितों पातक कर्मास्तव ॥ ३९ ॥ कैसा होईल माझा उद्धार ॥ कैसें पावेन मनुष्य-शरीर ॥ मागुती ऐसा स्त्रीजित नर ॥ न होईन मी कोण्याही योगें ॥ ४० ॥ नरकाचा अतिथी न होईन ॥ ऐसें विप्रोत्तमा करीं माझें कल्याण ॥ ऐसें त्याचें सरतां वचन ॥ पंचम प्रेत बोलियेलें ॥ ४१ ॥ मी काशीमाजी ब्राह्मण ॥ धर्मशास्त्रीं असें निपुण ॥ धर्मशास्त्राधिकार जाण ॥ दिधला असे मजलागीं ॥ ४२ ॥ मी सांग धर्मशास्त्र ॥ पढलों पढविलें बहु विप्र ॥ सिद्धांत पावलों समग्र ॥ याजनें[1] अपार मीं केलीं ॥ ४३ ॥ प्रतिग्रहीं[2] सदा रत ॥ धन केलें बहु संचित ॥ स्वधर्मा-चारें नाचरलों किंचित ॥ आहिताग्नि[3] मी असोनी ॥ ४४ ॥ याचकासी मीं न

Sri Vidyabharathi Book Centre, Shringeri

१ यज्ञयाग. २ दान घेण्यामध्यें. ३ अग्निहोत्री.

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

दिधलें अन्न ॥ आणिक न केलें विष्णुस्मरण ॥ विद्येच्या अभिमानेंकरून ॥ साधु विद्वान न नमिले ॥ ४५ ॥ मग मरण काळेंकरूनी ॥ मी पावल्यावरी क्रिया कोणीं ॥ केली नाहीं आप्तजनीं ॥ नरक निदानीं भोगिले फार ॥ ४६ ॥ भोगिल्या अनेक यातना ॥ शेखीं या योनीसी आलों जाणा ॥ कोण्या उपायें माझी उद्धरणा ॥ करावया ब्राह्मणा योग्य होसी ॥ ४७ ॥ ऐसें प्रेताचें वाक्य ऐकोनी ॥ दयेनें पीडित झाला मनीं ॥ परदुःखें दुखावे जनीं ॥ ऐसा प्राणी दुर्लभ ॥ ४८ ॥ गद्गद कंठें बोले वचन ॥ प्रेतहो मुक्ती तुमची कशान ॥ होईल तें करा निरूपण ॥ लवकरी निश्चयानें कथा मज ॥ ४९ ॥ मग प्रेतें बोलती तयासी ॥ यमलोकीं नरकीं नेतां आम्हांसी ॥ ऐकिलें आम्हीं निश्चयेंसीं ॥ तें तुम्हांसी निरूपितों ॥ ५० ॥ प्रेतोद्धार करावया समर्थ ॥ शीघ्र कर्माचा जेणें क्षय होत ॥ शिवविष्णुक्षेत्र निर्मल तीर्थ ॥ समीप अश्वत्थच्छाया असावी ॥ ५१ ॥ अथवा तुळशीवनें विचित्र ॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

तेथें नारायणबली पवित्र ॥ आमुच्या अर्थीं करीं समंत्र ॥ वृषोत्सर्ग विप्रभोजन करीं ॥ ५२ ॥ जलदान अन्नदान ॥ एकादश श्राद्धें दीपदान ॥ आमुचीं करीं भिन्न भिन्न ॥ कृपा करून आम्हांवरी ॥ ५३ ॥ तुमच्या वाक्येंचि झालों मुक्त ॥ काय पुन्हां त्वां केल्या प्रेतकृत्य ॥ ब्राह्मण शुभाशुभ जें बोलत ॥ तें तें सत्य होतसे ॥ ५४ ॥ ऐसें असे नारायणवचन ॥ गरुडासी म्हणे श्रीभगवान ॥ त्या प्रेतांचीं वाक्यें ऐकून ॥ शास्त्रप्रमाण तैसेंचि ॥ ५५ ॥ लौकरी संपादितां विधान ॥ तत्काळ दिव्यदेह झाले जाण ॥ दिव्य वस्त्राभरणीं भूषित होऊन ॥ विमानारूढ पैं झाले ॥ ५६ ॥ अप्सरागण तयांसी सेवित ॥ कुयोनीपासूनि होऊनि मुक्त ॥ महासंभ्रमें स्वर्गासी जात ॥ विप्र आज्ञा घेऊनी ॥ ५७ ॥ ऐसे पिशाच मुक्त झाले ॥ निर्धनेंही क्रियाकर्म चांगलें ॥ करावें शक्त्यनुसार भलें ॥ प्रेतत्व मोकळें तेणें होय ॥ ५८ ॥ गरुडा न करितां और्ध्वदेहिक ॥

१ वसु सोडणें. २ उत्तरक्रिया. ३ उत्तरक्रियेचा विधी. ४ मोठ्या सन्मानानें. ५ पिशाच योनी.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

नर अथवा नारी देख ॥ प्रेतत्व पावे निश्चयात्मक ॥ म्हणोनि आवश्यक कर्म कीजे ॥ ५९ ॥ ऐसें प्रेतोपाख्यान ॥ गरुडासी कथी श्रीभगवान ॥ शौनकादि कांसी सूत पुराण ॥ कथी संपूर्ण माधव म्हणे ॥ ६० ॥ इति श्रीगरुडपुराणे प्रेतकल्पे गरुडनारायणसंवादे प्रेतोपाख्यानं नाम चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

॥ श्रीगणेशाय नमः ॥ पूर्वाध्यायीं प्रेतोपाख्यान ॥ सांगितल्यावरी मधुसूदन ॥ गरुडासी बोलिला वचन ॥ म्हणे वाक्य माझें अवधारीं ॥ १ ॥ तीन युगें गरुडा उत्तम ॥ कलियुग हें महाविषम ॥ चतुर्दश लोकीं परम ॥ कठिण जाण कलियुग ॥ २ ॥ पूर्वीं कृतादि युगाआंत ॥ तामसी राक्षस झाले बहुत ॥ ब्राह्मणांसी पीडा अत्यंत ॥ रूपें धरीत मत्स्यादिक मी ॥ ३ ॥ अधर्म बळावतां फार ॥ मी करीत तमांचा संहार ॥ मत्स्यादिक घेतले दहा अवतार ॥ धर्मरक्षणार्थ वैनतेया ॥ ४ ॥ गाई-ब्राह्मण-साधुरक्षण ॥ मीं केलें असुर मारून ॥ धर्मस्थापना ऐशी जाण ॥ वारंवार करिता झालों ॥ ५ ॥ या कलियुगामाझारी ॥ अवतार न धरीं मी श्रीहरी ॥ क्वचित[1] मेमांश[2] सात्त्विक धरित्रीं ॥ अवतरोनि करिती धर्मरक्षण ॥ ६ ॥ अत[3] एव कली हा घोर जाण ॥ पापें करिती सर्व वर्ण ॥ धर्म न जाणती तिळप्रमाण ॥ कांहीं उपायानें धन मेळविती ॥ ७ ॥ पापभय नसे चित्तीं ॥ ब्राह्मण स्वधर्म नाचरती ॥

१ अत्यंत विपरीत. २ माझे अंशभूत देव किंवा साधु. ३ यास्तव.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

नीच अधर्म करिती ॥ पुत्र द्वेषिती मातापितरां ॥ ८ ॥ गुरु आणि मातापितर ॥ स्त्री आणि शरणागत नर ॥ धर्म यांचें पाळण करणार ॥ ऐसा खगेंद्रा कोणी नसे ॥ ९ ॥ कोणी अग्नि धारण करूनी ॥ नित्य होम न कीजे ब्राह्मणीं ॥ अग्निहोत्रें होती दंभेंकरूनी ॥ सात्त्विकांलागोनि निंदिती फार ॥ १० ॥ वेदाध्ययन वर्जिती ब्राह्मण ॥ इतस्ततः करिती भोजन ॥ शूद्र अंत्यजादि संकेतान ॥ करिती भोजन कलीमाजी ॥ ११ ॥ निंद्य कर्म करिती अपार ॥ शूद्रान्न भक्षिती विप्र ॥ ब्राह्मणासी धनलोभ फार ॥ होतां म्लेच्छसेवक होती[1] ॥ १२ ॥ प्रीतीनें बोलती म्लेच्छभाषा ॥ तद्वत् आचार खगेशा ॥ म्लेच्छांच्याचि घेती वेषा ॥ लज्जा मानसा नसे ज्यांसी ॥ १३ ॥ कोणाचा त्यांसी नसे धाक ॥ कांहीं न्यून नसतां देख ॥ पापें करिती अनेक ॥ आवडी धरोनि निर्धारें ॥ १४ ॥ ब्रह्मसूत्रविधानान ॥ ब्रह्मचर्याश्रम नसे जाण ॥ विवाह न होतां स्वधर्मान ॥ भलतेंचि स्वधर्मानें होई ॥ १५ ॥

---

१ महारादिकांशीं संकेत करून. २ अविंध, हीन इत्यादिकांची सेवा करणारे.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

ब्राह्मणसेवा शूद्र न करिती ॥ ब्राह्मण शूद्रांसी सेविती ॥ नीचापरी नम्र[1] असती ॥ सेवाकर्म करिती शूद्रांचें ॥ १६ ॥ माझे भक्तीचें दंभ शूद्र ॥ करिती कलीमाजी अपार ॥ विटाळ मानिती स्पर्शतां विप्र ॥ महामूर्ख घोर पापी ॥ १७ ॥ माझी प्रतिज्ञा वेदनिंदक ॥ ते पामर न जाणती निष्टंक[2] ॥ चतुर्भुज हें शरीर देख ॥ ब्राह्मणाहूनि अधिक मातें नसे ॥ १८ ॥ मूर्ख अथवा विद्वान ॥ ब्राह्मण माझी तनू जाण ॥ ते जरी अनाचारी ब्राह्मण ॥ तरी पूजन योग्य त्यांचें ॥ १९ ॥ इतर वर्ण सर्वलक्षणी ॥ पूजा योग्य नव्हे जनीं ॥ दुर्बळ गाई भरली चिखलांनीं ॥ तरी पूजा जनीं तिची कीजे ॥ २० ॥ गर्दभी भागीरथींत स्नान ॥ केली तरी पूजेसी पात्र न ॥ कोणी न करी तिचें पूजन ॥ तस्मात् सर्वांत उत्तम ब्राह्मण जगीं ॥ २१ ॥ या कलियुगामाझारी ॥ तीर्थें अनेक भूमीवरी ॥ तैसे ब्राह्मण निर्धारीं ॥ देशग्रामांतरीं अनेक ॥ २२ ॥ या दोघांची निंदा जे दुष्ट करिती ॥ ते शेखीं निरय[3] पावती ॥ प्रळय-

१ वांकून राहणें. २ नीच, अधम. ३ निःसंशय. ४ गाढवी. ५ नरक.

Sri Vidyabharathi Book Centre, Singeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

काळींही त्यांसी मुक्ती ॥ नाहीं निश्चिती खगेंद्रा ॥२३॥ स्त्रिया पतीशीं न तोषती ॥ भ्रतार स्वस्त्रियेशीं न सुखावती ॥ क्वचित् दंपत्यांत असेल प्रीती ॥ [1]उपाधियोगें-करोनियां ॥ २४ ॥ कोणी कोणाचा नसे मित्र ॥ लोभ करणें असे सर्वत्र ॥ लुब्ध दुराचार शुष्क वैर ॥ निर्दय अपार पैं होती ॥ २५ ॥ दुर्भग आणि आशा बहुत ॥ शेवटीं कली प्रजा समस्त ॥ शूद्र म्लेच्छ प्रजा प्रसवत ॥ [2]क्षुद्र होत अपार जन ॥ २६ ॥ क्षुद्र दृष्टी भाग्य क्षुद्र ॥ भोजन करिती अपार ॥ द्रव्यहीन काम फार ॥ स्त्रिया अपार जारिणी होती ॥ २७ ॥ जिवंत पतीसी त्यागिती ॥ राजा न दंडी तयांप्रती ॥ भ्रतार मेल्या दुसरा करिती ॥ कोणी न निंदिती तयांसी ॥ २८ ॥ उत्तम कुळींचे बहुत चोर ॥ धर्मपाखंड दूषणार[3] ॥ प्रजाभक्षक नरेंद्र ॥ शिश्नोदरपर द्विज होती ॥ २९ ॥ व्रत त्यागिती ब्रह्मचारी ॥ कुटुंबी यती अनाचारी ॥ तपस्वी राहती ग्रामांतरीं ॥ अर्थलुब्ध भारी संन्यासी होती ॥ ३० ॥ शरीर लघु फार आहार ॥

---

१ स्वार्थाच्या कांहीं निमित्तानें. २ क्षुल्लक. ३ भ्रष्ट करणारे.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

निर्लज्ज आणि पोरें फार ॥ नित्य कटु भाषण करणार ॥ चौर्य माया साहस कर्म ॥३१॥ संकटीं सेवक स्वामीतें त्यागिती ॥ पिता माता भ्राता सुहृदांप्रती ॥ सुहृदत्व[1] नसे निश्चिती ॥ दीन जार होती कलींत नर ॥ ३२ ॥ शूद्र धर्म आचरती ॥ तपोवेषें[2] पोट भरिती ॥ संस्थान करूनि धर्म सांगती ॥ नीच करिती ब्राह्मणांसी ॥ ३३ ॥ ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगोनी ॥ बुडविती स्त्रिया भोळे प्राणी ॥ माझी शिवाची भक्ती दाखवुनी ॥ वर्णाश्रम कुळाचार बुडविती ॥ ३४ ॥ कलींत न मिळेल उत्तम वस्त्र ॥ विभूषणें नसतील फार ॥ विद्याहीन सर्व नर ॥ भ्रष्टाचार कुलीन मानिती ॥ ३५ ॥ सहस्रावधि अन्याय करूनी ॥ द्रव्याची करिती मेळवणी ॥ मग त्यांसी लोक म्हणती महागुणी ॥ कवडीसाठीं मैत्री तोडिती ॥ ३६ ॥ शिश्नोदरंभर[3] पुत्र ॥ त्यांसी हांसती त्यांचे पितर ॥ पितरांचा तोचि आचार ॥ म्हणोनि पुत्र हांसती पितरं ॥ ३७ ॥ जन्म आचार उदय गुण ॥ कलीमाजी धनचि प्रमाण ॥ धर्म

१ मित्रपणा. २ तापसाच्या सोंगानें. ३ विषयसेवन व पोट भरणें यांत दंग.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

न्याय व्यवस्थेलागून ॥ बळचि कारण खगेंद्रा ॥ ३८ ॥ स्त्रीपुरुषांची रत्यर्थ प्रीती ॥ सर्व व्यवहार मायिक[2] होती ॥ सामान्य स्त्रीपुरुषीं हेतु रती ॥ विप्रत्वीं कारण सूत्रचि ॥ ३९ ॥ आश्रमचिन्ह[3] मात्र धरिती ॥ आचरण स्वल्पही नाचरती ॥ चपल वाणी तो पंडित म्हणती ॥ निंद्यत्व पावती दरिद्री ॥ ४० ॥ दंभकर्त्यासी म्हणती साधू ॥ स्वीकारमात्र विवाहू ॥ स्नानें आन्हिक[4] विप्रबंधू ॥ झालें म्हणती सर्वदा ॥ ४१ ॥ दूरस्थ होईल तीर्थबुद्धी ॥ केशधारणीं लावण्याची अवधी ॥ उदरपूरणार्थ सर्वांची बुद्धी ॥ धैर्य सत्यत्व जाणिजे ॥ ४२ ॥ कुटुंबपोषकासी दक्ष म्हणती ॥ यशाविषयीं धर्म सेविती ॥ निर्दय राजे प्रजा लुटिती ॥ चोरधर्मैंकरोनियां ॥ ४३ ॥ निर्धन स्त्रीविरहित ॥ प्राणी होतील अपरिमित ॥ वायु उष्ण पर्जन्य शीत ॥ निवारण समर्थ यांचें नसे ॥ ४४ ॥ क्षुधा तृषा व्याधी अपार ॥ संताप चिंता अहोरात्र ॥ यास्तव सर्व वीस तीस वर्षें नर ॥ वांचल्या फार आयुष्य त्यांचें ॥ ४५ ॥

१ विषयभोगाकरितां. २ कपटी. ३ भगवीं वस्त्रें वापरणें वगैरे. ४ संध्यादि कर्म.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अपार होईल पाखंडधर्म ॥ चोरप्राय नरेंद्रोत्तम ॥ सोडिती ब्राह्मण स्वाचारधर्म ॥ अनृत जन सर्व बोलती ॥ ४६ ॥ शूद्रप्राय सर्व वर्ण होतील ॥ शेळीसमान गाई सकळ ॥ गृहप्राय आश्रम दिसतील ॥ चोर होतील सुहृज्जन ॥ ४७ ॥ धान्यें होतील अणुप्रमाण ॥ महावृक्ष होतील लहान ॥ विजा मात्र मेघीं जाण ॥ घरें वोस पडतील फार ॥ ४८ ॥ ऐसा होईल स्वधर्म जाण ॥ स्त्रिया फिरतील लज्जा टाकून ॥ ऐसें कलियुग दारुण ॥ कोटींत एक सद्धर्म आचरे ॥ ४९ ॥ स्त्रियांत होईल धर्म क्वचित ॥ शूद्रांमाजी दिसेल किंचित ॥ ब्राह्मण धर्माचें घर निश्चित ॥ धर्म राहत तेथेंचि सदा ॥ ५० ॥ परी क्वचित लोभें नासेल ॥ लोभें तीर्थासी जातील ॥ लोभें शिवासी भजतील ॥ विष्णु पूजितील लोभेंकरूनी ॥ ५१ ॥ लोभें दुर्गापूजन करिती ॥ लोभेंकरूनि गयेसी जाती ॥ लोभें अग्निहवन करिती ॥ लोभें पढविती शिष्यवर्ग ॥ ५२ ॥ यजन करिती लोभेंकरूनी ॥ ऐसा घोर

१ चोरवत्. २ मित्रादिक. ३ सूक्ष्म, बारीक. ४ अग्नीमध्यें होम करणें. ५ यज्ञ. ६ भयंकर.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

कली वर्ततां जनीं ॥ क्वचित दयाळू स्वधर्माचरणी ॥ वैनतेया होती मम इच्छें ॥ ५३ ॥ शास्त्रविद्या पठण करावी ब्राह्मणें ॥ माझें नामस्मरण करणें ॥ स्वधर्म आचार अन्यवर्णें ॥ सर्व वर्णांनें सर्वदा ॥ ५४ ॥ कांहीं न करितां नरक प्राप्त ॥ यास्तव स्वल्प तरी धर्मकृत्य ॥ करावें तेणें स्वर्गीं सुख होत ॥ तस्मात् कलियुगांत धर्म करावा ॥ ५५ ॥ मनुष्यजन्म कलींत झाला ॥ तरी धर्म आचरतां भला ॥ न आचरतां चौऱ्यायशींचा भला ॥ घेराच लागला त्याचे पाठीं ॥ ५६ ॥ ऐसें कलिमाहात्म्य संपूर्ण ॥ गरुडासी कथी श्रीभगवान ॥ सूतमुखें समस्त ऋषिगण ॥ करिती श्रवण बाबाजी म्हणे ॥ ५७ ॥ इति श्रीगरुडपुराणे प्रेतकल्पे गरुडनारायणसंवादे कलियुगधर्मकथनं नाम पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

॥ श्रीगणेशाय नमः ॥ कलिधर्म ज्ञाल्यावरी ॥ केशव म्हणे पन्नगारी ॥ रजस्वला जी ज्ञाली नारी ॥ सर्व कार्यीं वर्ज्य सदा ॥ १ ॥ स्नान करावें चतुर्थ दिनीं ॥ मग शुद्ध होत ती रमणी[1] ॥ प्रथम दिनीं चांडाळिणी ॥ ब्रह्मघातिनी द्वितीय दिवशीं ॥ २ ॥ तृतीय दिनीं रजकीसमान ॥ चतुर्थ दिनीं शुद्ध जाण ॥ ऐसें शास्त्राचें वचन ॥ जाणोनि स्पर्श न करावा ॥ ३ ॥ रजस्वलेनें आणितां उदक ॥ तें रक्तासमान देख ॥ तिणें केलिया स्वयंपाक ॥ मांस सम्यक तें जाणिजे ॥ ४ ॥ पाहिली आणि केलें भाषण ॥ तरी एक दिवसाचा धर्म नासे जाण ॥ द्वितीय तृतीय दिनीं स्पर्शन ॥ जे नराधम करिताती ॥ ५ ॥ ते मरतां होती प्रेत ॥ जिवंत मेले समान असत ॥ नरक बहु वर्षें भोगित ॥ स्नान उचित चतुर्थ दिनीं ॥ ६ ॥ मग स्पर्शासी योग्य नारी ॥ रजस्वलेनें असावें एकवस्त्री ॥ त्रिदिन असावें अल्पाहारी[2] ॥ गोवन्ह्यीसी[3] न स्पर्शावें ॥ ७ ॥ नष्ट रज दिनत्रयांतीं ॥ सुस्नात देवकार्या कामा येती ॥

१ स्त्री. २ थोडें भोजन करणें. ३ गाई व अग्नि यांस.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

प्रथम दिवसापासूनि गणती ॥ सत्रा दिवसपर्यंत ॥ ८ ॥ रजस्वलेचा नाहीं दोष ॥ अठरावे दिवशीं एक दिवस ॥ द्वय दिन एकुणिसाव्यास ॥ विसाव्यापासून त्रिदिन ॥ ९ ॥ स्ववर्णामाजी रजस्वला ॥ दोघी एकएकींसी स्पर्शल्या ॥ तरी उपास करावा भला ॥ एक दोन तीन क्रमें ॥ १० ॥ अन्नप्राशनापासूनी ॥ चौलमर्यादा[1] पुत्रालागूनी ॥ रजस्वलेसी स्पर्शतां आचमनीं ॥ शुद्ध होई तो शिशु ॥ ११ ॥ चौल झाल्यानंतर ॥ स्नान घालावें यथाप्रकार ॥ रजस्वला आतुर[2] झाल्या फार ॥ नैमित्तिक[3] प्राप्त झाल्यासी ॥ १२ ॥ इतरें तिसी चतुर्थ दिनीं ॥ स्नान करावें स्पर्श करूनी ॥ आंग सुकल्यावरी मागुतेनी ॥ स्पर्शोनि स्नान करावें ॥ १३ ॥ प्रतिस्नानीं आचमन करावें ॥ ऐसें दशवार आचरावें ॥ अंतीं वस्त्र त्यागावें ॥ अन्य वस्त्र नेसावें सोज्वळ ॥ १४ ॥ ऐसेनि तिची शुद्धि होत ॥ दान द्यावें शक्त्यनुचित[4] ॥ रजस्वला-सूतिकेचा मृत ॥ दैवें भ्रतार झालिया ॥ १५ ॥ जरी सहगमनाचा असे निर्धार ॥ तरी शुद्ध

---

१ चौलाचा अवधि तीन वर्षें. २ दुखणाईत. ३ विशेष कार्य. ४ यथाशक्ति.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

करावी ती नार ॥ मग विध्युक्त प्रकार ॥ करोनि सहगमन करावें ॥ १६ ॥ ज्यांच्या कुळीं ब्रह्मचारी ॥ मरण पावला असे जरी ॥ कुळक्षयातें पावे तरी ॥ तोही भारी दुर्गति पावे ॥ १७ ॥ ग्रहत्व[1] पावोनी दुर्धर ॥ पिंपळावरी करी बिढार ॥ त्याच्या वंशजें क्रिया समग्र ॥ सांग विधिप्रकारें करावी ॥ १८ ॥ हस्तमात्र कर्णमात्र दान ॥ आणिक द्यावें कृष्णाजिन ॥ पादुका छत्र गोपीचंदन ॥ पुष्पें दान करावीं ॥ १९ ॥ मुमूर्षु[2] अथवा मरण पावला ॥ षडब्दव्रतविधी[3] आचरावा भला ॥ तीस ब्रह्मचारी ब्राह्मणांला ॥ नवीन कौपीनांला पैं द्यावें ॥ २० ॥ गृहस्थ साधु पूजावे परम ॥ ब्रह्मचारी मिळती अतिउत्तम ॥ कृतादि द्वापरांत नेम ॥ दशविध पुत्रांचा पैं होता ॥ २१ ॥ कलीमाजी दोन पुत्र ॥ औरस अथवा दत्तकप्रकार ॥ त्यांतही औरस थोर ॥ दैवें पुत्र नसे जया ॥ २२ ॥ तयानें जिवंत आपण असतां ॥ स्वक्रिया करावी कश्यपसुता ॥ त्याचा विधि तुज आतां ॥ कथितों वैनतेया निश्चिती ॥२३॥

१ पिशाच ग्रह. २ मरणास टेंकलेला. ३ सहा वर्षांचें प्रायश्चित्त.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अपुत्र अथवा कुपुत्र[1] असे ॥ जरी त्या पुत्राची आशा नसे ॥ गयाश्राद्धादि अनलसें ॥ करावें आपुल्या उद्धारार्थ ॥ २४ ॥ आधीं आचार्य करोनी ॥ सर्व धर्म ऐकावे कानीं ॥ मग प्रवर्तावें क्रियेलागुनी ॥ रवि उत्तरायणीं आलिया ॥ २५ ॥ अथवा श्रावण कार्तिकांत ॥ शुक्ल कृष्णपक्ष असे उक्त ॥ द्वादशीआदि शुभ दिन बहुत ॥ शुभलग्न मुहूर्त पाहोनी ॥ २६ ॥ देश असावा अति पवित्र ॥ विधिज्ञ बोलावूनि विप्र ॥ जपादि दानें अपार ॥ देखोनि कलेवर[2] शुद्ध करावें ॥ २७ ॥ शुभनक्षत्रीं पुण्यदिनीं ॥ ग्रहदेवांची पूजा करोनी ॥ विधिप्रकारीं प्रायश्चित्त करोनी ॥ आज्ञा घ्यावी विप्रांची ॥ २८ ॥ मी करितों वृषोत्सर्ग ॥ मम प्रेतत्वमुक्ति[3]कारक ॥ कर्म करितों और्ध्वदेहिक ॥ सर्व फल प्राप्त व्हावें मातें ॥ २९ ॥ पराधीनत्व मुक्तीकारणें ॥ जिवंत क्रिया शास्त्रप्रमाणें ॥ मी करितों तुमच्या वचनें ॥ कर्म संपूर्ण विष्णु करो ॥ ३० ॥ ऐसे प्रार्थोनि ब्राह्मण ॥ वृषोत्सर्ग करावा जाण ॥

१ दुष्ट मुलगा. २ शरीर. ३ पिशाचयोनींतून सोडविणारें.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

प्रत्यक्ष धर्म तूं वृषरूपान ॥ पूर्वीं निर्माण विधीनें केला ॥ ३१ ॥ तुझ्या उत्सर्ग-
प्रभावान ॥ माझा उद्धार भवार्णवांतून ॥ होवो ऐसें बोलोन ॥ वृषोत्सर्जन करावें
॥ ३२ ॥ रुद्रकुंभोदकेंकरून ॥ शुभ मंत्रें ब्राह्मणें अभिषेचन ॥ विधिपूर्वक झाल्या-
वरी जाण ॥ आत्मश्राद्ध[2] करावें ॥ ३३ ॥ स्वर्गमार्गीं सुख घडे तेणें ॥ वर्ष अन्न
उदक दीपदानें ॥ उपानह[3] शय्या गाई देणें ॥ कुंभ समोदक पदादि ॥ ३४ ॥ तिलपूर्ण
ताम्रपात्रें ॥ घृतपूर्ण सहेमं[4] कांस्यपात्रें ॥ हेमान्वित सजल ताम्रपात्रें ॥ आपुल्या करें
ब्राह्मणांसी दीजे ॥ ३५ ॥ षोडश श्राद्धें पूर्वीं करावीं ॥ मग सपिंडी आचरावी ॥
ताम्रपात्रीं अच्युतपूजा बरवी ॥ द्रोणाधिक कार्पासाची[5] कीजे ॥ ३६ ॥ षोडशो-
पचारें करावें पूजन ॥ मुक्तिदाता श्रीनारायण ॥ नौका इक्षुदंडाची करून ॥
पट्टसूत्रें वेष्टन करावी ॥ ३७ ॥ विशाल कांस्यपात्रीं घृत घालुनी ॥ त्यांत
सोडिजे नौकेलागुनी ॥ त्याचे पुढें वैतरणी ॥ धेनु सुलक्षणी पैं द्यावी ॥ ३८ ॥

१ सोडण्यानें. २ आपलें श्राद्ध. ३ चर्मी जोडा. ४ सुवर्णासह. ५ कापसाची.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

मनें चढावें नावेवरी ॥ मग पूजावा श्रीहरी ॥ कांस्यपात्र संसार भारी ॥ विषयवासना तेंचि घृत ॥ ३९ ॥ ही नौका विष्णूची भक्ती ॥ कार्पास विष्णु वैकुंठ निश्चिती ॥ ऐसें चिंतिल्यावरी मागुती ॥ समंत्र नमस्कार करावे ॥ ४० ॥ भवसागरीं निमग्न झालों ॥ पापलाटांनीं दुःख पावलों ॥ धर्मपंथें हीन झालों ॥ जनार्दनमर्या नौका मज तारू ॥ ४१ ॥ ऐसें हृदयीं चिंतणें ॥ करावीं मग महादानें ॥ ब्राह्मणांकारणें भोजनें ॥ यथेष्ट घालोनि दीजे दक्षिणा ॥ ४२ ॥ दानादिकें तोषवावे ब्राह्मण ॥ मग देवाचें कीजे विसर्जन ॥ नित्य[1] नैमित्तिक[2] कर्माचरण ॥ करावें जाण खगेंद्रा ॥ ४३ ॥ काम्यकर्म[3] न करावें कधीं ॥ ज्ञातीच्या न पडावें संबंधीं ॥ शुभकार्याचा नाचरावा विधी ॥ ज्ञाति आणि पराचिया ॥ ४४ ॥ सत्य करावें भाषण ॥ भूमिशायी नैष्ठिक ब्रह्मचर्याचरण ॥ परपाक परपंक्ति परान्न- ॥ भोजन वर्ज्य जाणिजे ॥ ४५ ॥

१ नित्यकर्म (स्नानसंध्यादि). २ ग्रहण, संक्रांति आदि. ३ फलाची इच्छा धरून कर्म करणें.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

परनिंदा करावी वर्ज्य ॥ तैशी असूया[1] खगराज ॥ वर्जावी न धरोनि लाज ॥ नारायणनाम स्मरावें ॥ ४६ ॥ आणिक करावें पुराणश्रवण ॥ अभ्यासावे वेदांतार्थ पूर्ण ॥ भूमिप्रदक्षिणा अटन[2] ॥ पंचाग्निसेवन करावें ॥ ४७ ॥ शिशिरकाळीं जळसेवन ॥ ऐसें करावें तपाचरण ॥ शरीरसामर्थ्य नसल्या पूर्ण ॥ आपदा कठिण प्राप्त झालिया ॥ ४८ ॥ मरणकालापर्यंत ॥ नाम तरी न सोडावें निश्चित ॥ पापकंचुक[3] टाकोनि मुक्त ॥ नामस्मरणें होतसे ॥ ४९ ॥ या षोडशाध्यायांत ॥ रजस्वलाविधि जिवंतक्रियाकृत्य ॥ दोन विधानें गरुडाप्रत ॥ श्रीभगवंत निवेदिता झाला ॥ ५० ॥ तेंचि तात्पर्य सूत मुनी ॥ शौनकादिकां कथी नैमिषारण्यीं ॥ साधुजनांसी प्राकृत वचनीं ॥ माधव निवेदी शिवकृपें ॥ ५१ ॥ इति श्रीगरुडपुराणे प्रेतकल्पे गरुडनारायणसंवादे रजस्वला-धर्मजीवत्क्रियानिरूपणं नाम षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

१ द्वेष. २ फिरणें. ३ पापाचें आवरण.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-0. In Public Domain. Digitized by eGangotri

॥ श्रीगणेशाय नमः ॥ पूर्वाध्यायीं[1] निरूपण ॥ जिवताचें और्ध्वदेहिक जाण ॥ जाहल्यावरी सप्तदशांत भगवान ॥ खगेश्वरालागून बोलियेला ॥ १ ॥ गरुडा आहिताग्नि[2]दांपत्य ॥ परम शुद्ध जगाआंत ॥ त्यामाजी एक जाहला मृत ॥ अग्नित्रयानें[3] प्रेत दग्ध कीजे ॥ २ ॥ सपिंडादिक सर्व मिळोनी ॥ दहन करावें तयालागूनी ॥ पात्रें ठेवावीं यथास्थानीं ॥ अग्निहोत्री द्विजाचीं ॥ ३ ॥ याचा असे पृथक् प्रयोग ॥ यास्तव येथें टीका सांग ॥ न केली विस्तारभयें देख ॥ श्रोतीं संदेह न मानावा ॥ ४ ॥ असो सहगमनविधि आतां ॥ श्रवण करीं गा कश्यप-सुता ॥ दारुण पाशें बांधोनि प्रेता ॥ नरका नेतां यमदूतें ॥ ५ ॥ पावतांही यातनास्थान ॥ यमकिंकरांचे असे स्वाधीन ॥ स्वकर्मवेष्टित दीनवदन ॥ नरक-स्थानीं तिष्ठत ॥ ६ ॥ त्याची पत्नी करितां सहगमन ॥ उद्धार त्याचा होई जाण ॥ गारुडी सर्प काढी बिळांतून ॥ स्वबळें जाण भ्रतारा सोडवी पत्नी ॥ ७ ॥ पति

---

१ सत्राव्या अध्यायांत. २ अग्निहोत्री. ३ दक्षिण, गार्हपत्य, आहवनीय या तीन अग्नींनें.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

असे ब्रह्महत्यारी ॥ कृतघ्न अथवा मित्रद्रोह करी ॥ ऐशासही सती[2] उद्धरी ॥ सहगमन करोनियां ॥ ८ ॥ भ्रतारासहवर्तमान ॥ स्वर्गीं सुखी वसे जाण ॥ साडेतीन कोटी रोमप्रमाण ॥ अंगावरी तियेच्या ॥ ९ ॥ तितुकीं सहस्र वर्षेंपर्यंत ॥ स्वर्गींचे सोहाळे भोगीत ॥ पितामातेचें कुळ तारीत ॥ सहगमन करीत जे सती ॥ १० ॥ ऐसीं तीन कुळें तारी ॥ जिवंतपणीं अवमान करी ॥ दुष्ट चित्तें प्रतिकूळ नारी ॥ वर्तें जरी काम-क्रोध-मोहें ॥ ११ ॥ अंतकाळीं भ्रतार स्मरून ॥ सहगमन करी प्रीतीन ॥ तरी ती अत्यंत पावन ॥ भुवनत्रयामाझारी ॥ १२ ॥ लहान जिचें बाळक ॥ आणि गर्भिणी असे देख ॥ ऋतु प्राप्त न होतां सम्यक ॥ सहगमन कदापि न करावें ॥ १३ ॥ ती रजस्वला असली ॥ आणि सहगमन करूं लागली ॥ तरी तेविषयीं [3]रीति चांगली ॥ ऐक गरुडा सावधान ॥ १४ ॥ द्रोणपरिमित साळींसी ॥ द्रोण म्हणावें चार पायलींसी ॥ त्या कांडावया द्याव्या तिसी ॥

१ मित्रांशीं विरोध. २ पतिव्रता. ३ सहगमन(सती जाण्याच्या)काळीं करण्याचा विधि.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-0. In Public Domain. Digitized by eGangotri

बळें मुसळासी आघात करवावे ॥ १५ ॥ बळें करितां मुसळाघात ॥ योनीपासूनि रुधिर स्रवत ॥ विरजस्क झालिया निश्चित ॥ मृत्तिकादि स्नानें वेगळीं ॥ १६ ॥ करोनि मग दिनप्रमाण ॥ तीस वीस दहा गाई दान ॥ ब्राह्मणांसी सांग देऊन ॥ त्यांच्या वचनें शुद्ध व्हावें ॥ १७ ॥ मग चितेंत शरीर होमावें ॥ ब्राह्मणी ब्रह्म-[1] शासन बरवें ॥ पृथक् चितेंत न दग्ध करावें ॥ विदेशस्थ[2] स्वभावें पति मेल्या ॥ १८ ॥ त्याच्या अस्थि आणवोन ॥ मग करावें सहगमन ॥ साध्वी स्त्रियेचें ऐसें आचरण ॥ गरुडा जाण निश्चयें ॥ १९ ॥ पति रात्रीं पावला मरण ॥ तरी सूर्योदयीं आचार्य बोलावून ॥ सहयानविधि[3] श्रवण करून ॥ संभार संपूर्ण सिद्ध करावे ॥ २० ॥ शव घेऊनि जावें स्मशानीं ॥ वेदी करावी अग्रस्थानीं ॥ विष्णु-पूजन उपचारेंकरूनी ॥ यथाविधीनें कर्म कीजे ॥ २१ ॥ शुद्ध देशीं चिता रचावी ॥ काष्ठें कुंटी[4] करावी ॥ गोमयें लिप्त बरवी ॥ करोनि स्नान करावें ॥ २२ ॥

---

१ शास्त्रप्रमाण. २ प्रवासांत असतां. ३ सहगमनाचा विधि. ४ झोंपडी.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

वस्त्र नेसावें नूतन ॥ मग करावें स्वस्तिवाचन[1] ॥ लक्ष्मीनारायण द्विजपूजन ॥ धूपादि उपचारें करावें ॥ २३ ॥ संतोषवावे स्वजन ॥ दिक्पाळांचें करावें पूजन ॥ रुद्र पूजावा सगण[2] ॥ देशकालसंकीर्तन[3] करावें ॥ २४ ॥ माझ्या शतजन्मींचें जळो पाप ॥ जें केलें काम अकामरूप ॥ मग मंत्रोच्चारीं मोह अल्प ॥ स्त्रियेलागीं न व्हावा ॥ २५ ॥ मंत्राची टीका न करावी ॥ यास्तव टाकिली स्वभावीं ॥ संस्कृतामाजीं पाहूनि बरवी ॥ श्रोतेजनीं समजावें ॥ २६ ॥ असो संपूर्णता करावी ॥ अर्पावी पुष्पांजली बरवी ॥ वस्त्र अलंकार दानें द्यावीं ॥ पुत्रादिकां आशीर्वाद द्यावा शुभ ॥ २७ ॥ साध्वीनें चितेवरी चढूनी ॥ वन्हीतें नमस्कार करूनी ॥ मंत्र वदावा वदनीं ॥ चितिस्थो भगवानित्यादिक ॥ २८ ॥ मंत्रोक्त अग्नीसी अर्घ्य द्यावें ॥ मग सूर्यासी अर्घ्य अर्पावें ॥ त्याही मंत्राचें श्रवण बरवें ॥ विद्वज्जनें केलें पाहिजे ॥ २९ ॥ असो अर्घ्य सूर्यासी देउनी ॥ पतीचें मग मुख विलोकुनी ॥

१ पुण्याहवाचन. २ प्रमथगणांसह. ३ देश-कालादियुक्त संकल्पाचा उच्चार.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

ऐसें बोलावें वदनीं ॥ चितास्थानी स्त्रियेन ॥ ३० ॥ तूं ब्रह्मा तूंचि रुद्र ॥ तूं रवि तूं प्रजापति इंद्र ॥ अष्टवसु परमात्मा सर्वेश्वर ॥ विष्णो शरण मी तुला ॥ ३१ ॥ पतिरूपी तूंचि जाण ॥ ऐसा विष्णुरूपी पति भावून ॥ स्वर्गीं अथवा नरकीं करितां गमन ॥ मी पाठीमागूनि येईन शीघ्र ॥ ३२ ॥ ब्रह्महत्यादि पापांपासुनी ॥ मी सोडवीन यमलोकांतुनी ॥ ब्रह्मा विष्णु साक्षी सूर्य जनीं ॥ आणि दिक्पति[1] तैसाचि ॥ ३३ ॥ आदित्य[2] चंद्र अनल[3] ॥ वायु आकाश भूमि सलिल ॥ रात्र दिवस देव सकळ ॥ मम साहसें तुष्टोत पैं ॥ ३४ ॥ ऐसें करोनि उच्चारण ॥ हरिद्रा कुंकुम वस्त्रदान ॥ पंच सुवासिनींसी शूर्पात्र[4] ॥ वायनें सुलक्षण द्यावीं तेव्हां ॥ ३५ ॥ देवांची करावी निमंत्रणा ॥ सती सत्त्वपरायणा ॥ बल सत्त्व पूर्ण लक्ष्मी-नारायणा ॥ वायनें संतुष्टोनि गाढ सत्त्व देईजे ॥ ३६ ॥ सहसाहित्य शूर्पवायन[5] ॥ देतें मी भगवंता तुजलागून ॥ सत्त्व द्यावें मज गहन ॥ ऐसें बोलोन आपुल्या

१ दिशांचे स्वामी. २ सूर्य. ३ अग्नि. ४ सुपांतून सौभाग्यवाण. ५ मोठें.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

पदरीं ॥ ३७ ॥ सांजन[1] रत्नपंचक बांधावें ॥ मुक्ताफळ[2] वरीं घालावें ॥ मग मंत्रो-
च्चारण करावें ॥ ब्राह्मणआज्ञेप्रमाणें ॥ ३८ ॥ ऐसें बोलोनि मग कृत्य ॥ करावें
संपूर्ण विध्युक्त ॥ अधिकारानुसार कृत्य ॥ विधि समस्त करावा ॥ ३९ ॥
त्या आहुतीमंत्रांची टीका ॥ न केली श्रोतेहो देखा ॥ सहगमनप्रयोग निका ॥
वेगळा आहे स्वतंत्र ॥ ४० ॥ त्यामाजी असे सर्व विधान ॥ यास्तव येथें आहुती
सोडून ॥ पुढें चालविलें अनुसंधान[3] ॥ श्रोतीं दूषण न ठेवावें ॥ ४१ ॥ अग्न्यादि
रुद्रपर्यंत ॥ दशाहुति जाणा निश्चित ॥ विधान झाल्यावरी समाप्त ॥ विसर्जावे[4]
देव अग्नी ॥ ४२ ॥ मग अनेक करावीं दानें ॥ चितापूजन करावें स्वस्थमनें ॥
तीन प्रदक्षिणा करोनि अर्पणें ॥ पुष्पांजळी अग्नीसी ॥ ४३ ॥ मग बोलावा ऐसा
मंत्र ॥ त्याचा अर्थ ऐका समग्र ॥ तूं अग्नि सर्व भूतांत चराचर ॥ साक्षिवत्
संचार पैं तुझा ॥ ४४ ॥ देवा तूं सर्व जाणसी ॥ मानवयोनीचें तों विशेषीं ॥

१ काजळासह. २ मोतीं. ३ कथानकाचा संबंध. ४ उत्तरपूजा करावी.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

मी भिऊनि वैधव्यासी ॥ भ्रतारेंशीं सहगमन करितें ॥ ४५ ॥ सत्त्वमार्गें[1] नेईं मज ॥ भ्रताराजवळी सहज ॥ हें शरीर दहन करूनि मज ॥ करीं शीघ्र दिव्यदेही ॥४६॥ तैसाचि करीं भ्रतारदेह ॥ जाळोनि सर्व पापसमूह ॥ मज स्वर्गीं नेईं भ्रतारासह ॥ हा देह आलिंगूनि प्रवेश करितें ॥ ४७ ॥ ऐसें बोलोनि कोलीत घ्यावें ॥ कुटी[2]लागीं स्वयें लावावें ॥ पतीसह दग्ध व्हावें ॥ ऐसें करावें सतीनें ॥ ४८ ॥ प्राणोत्क्रमणानंतर[3] ॥ पुत्रें और्ध्वदेहिक[4] समग्र ॥ पृथक् पृथक् यथाप्रकार ॥ भक्तीकरून करावें ॥ ४९ ॥ अंतर पडों न द्यावें किंचित ॥ ऐसें आख्यान सतीचें समस्त ॥ महापवित्र होय यथोचित ॥ तुजप्रति कथियेलें ॥ ५० ॥ ऐसें गरुडासी निवेदन ॥ स्वमुखें करी मधुसूदन ॥ शौनकादिकांप्रति सूत कथन ॥ करी आपण माधव म्हणे ॥ ५१ ॥ इति श्रीगरुडपुराणे प्रेतकल्पे गरुडनारायणसंवादे सहगमनविधिवर्णनं नाम सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ ७ ॥

१ पुण्यमार्गानें. २ झोंपडीला. ३ मेल्यावर. ४ क्रिया.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

॥ श्रीगणेशाय नमः ॥ जय जय देवेशा उमारमणा ॥ भक्तमानसरंजका अंधक-
मर्दना ॥ तुझे कृपेनें लोकपावना ॥ प्रेतकल्पव्याख्या नाम उदेलें ॥ १ ॥ तें तव
कृपेस्तव निरूपण ॥ सप्तदशाध्याय केले कथन ॥ अष्टादशाध्यायीं संपूर्ण ॥
प्रेतकल्प होईल ॥ २ ॥ हा केळसाध्याय परमपवित्र ॥ तव कृपेनें टीका समग्र ॥
होईल ऐसा मागतों वर ॥ प्रार्थना करोनि क्षणक्षणा ॥ ३ ॥ श्रीभगवंत म्हणे
गरुडाप्रती ॥ ऐकें मम वाहना सुमती ॥ गर्भ नष्ट जाहल्या क्रिया नसती ॥ दुग्ध
द्यावें मृतदिनीं ॥ ४ ॥ वाळ मेल्यासी द्यावा पायस ॥ आणि दुग्ध द्यावें सरस ॥
वर्षद्वयांत मरण पावल्यास ॥ त्या प्रेतास पुरावें ॥ ५ ॥ अत ऊर्ध्व दग्ध करावें ॥
मासिक श्राद्ध नाचरावें ॥ विष्णुबलीसी करितां बरवें ॥ सुख पावतसे तें प्रेत ॥ ६ ॥
विष्णुदैवतें करावें तर्पण ॥ वृषोत्सर्ग न करावा जाण ॥ दानें बहुत उपयोग
पाहून ॥ करावीं भक्तीकरोनियां ॥ ७ ॥ पांच वर्षांउपरी मृत झाला ॥ त्याचा

१ गरुडपुराणांतील प्रेतखंडाची टीका. २ शेवटचा. ३ खीर. ४ तिसऱ्या वर्षापासून पुढें.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

वृषोत्सर्ग करावा चांगला ॥ संन्यासी परी परत्र पावला ॥ एकादश दिनीं पुत्रें श्राद्ध कीजे ॥ ८ ॥ पार्वणविधियुक्त श्राद्ध करावें ॥ संन्यासी बोलावूनि आणावे ॥ कौपीन पादुका भेषज द्यावें ॥ ऐसें आचरावें तयाच्या पुत्रें ॥ ९ ॥ सर्व पापक्षय-तत्पर ॥ ब्राह्मणें तो संन्यास घ्यावा सादर ॥ वैराग्ययुक्त असल्या अंतर ॥ नाहीं तरी संन्यास न घेतां भला ॥ १० ॥ वैराग्य नसतां म्रियेमाण[3] झाला ॥ आतुर[2]-संन्यास घेऊनि मेला ॥ तो न पावे निरयभोगाला ॥ यास्तव संन्यास भला ब्राह्मणासी ॥ ११ ॥ कलीमाजी अग्निहोत्र संन्यास ॥ वर्ज्य परी आचरावे सरस ॥ धर्मब्रह्म प्रसिद्ध विशेष ॥ यावांचोनि न होती ॥ १२ ॥ करितां सर्व धर्मकथन ॥ धर्माचें फळ घडे जाण ॥ मी सर्वात्मा भगवान ॥ भक्तिसाधन न घडे माझें ॥ १३ ॥ कलीमाजी नामावांचुनी ॥ तराया भरतखंडींचे प्राणी ॥ अन्य उपाय न दिसे नयनीं ॥ नामें मुक्ति तत्काळ होई ॥ १४ ॥ माझ्या नामस्मरणें जाण ॥

१ बाप, आजा व पणजा या त्रयीस उद्देशून श्राद्ध. २ मरणातुर. ३ मरणकालींचा संन्यास.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

संपूर्ण होती तप क्रिया यज्ञ ॥ न्यून तें होई संपूर्ण ॥ विष्णुस्मरण करितांचि ॥१५॥ माझ्या नामीं पापहरणशक्ती ॥ आहे तितुकी पापकर्त्याप्रती ॥ नाहींच जाण निश्चिती ॥ गोघ्न[1] सुराप उद्धरती नाम घेतां ॥ १६ ॥ मित्रद्रोही ब्रह्महत्यारी ॥ आणिक जो गुरूतें मारी ॥ चांडालादि दुराचारी ॥ मम नामोच्चारीं उद्धरले ॥ १७ ॥ कृतयुगीं ध्यान विशेष ॥ त्रेतीं मख[3] जाण सरस ॥ द्वापरीं पूजन-कर्मास ॥ करोनि प्राणी उद्धरे ॥ १८ ॥ कलीमाजी नामकीर्तन ॥ हाचि धर्म विशेष जाण ॥ चांडाळही माझ्या नामान ॥ उद्धरे ब्राह्मण न बाहिर्मुख ॥ १९ ॥ तीर्थां-माजी हेंचि तीर्थ ॥ व्रतांत उत्तम हेंचि व्रत ॥ यज्ञ हाचि सर्व यज्ञांत ॥ दानांत उत्तम हेंचि दान ॥ २० ॥ पवित्रांमाजी अति पवित्र ॥ राम हा द्व्यक्षरी मंत्र ॥ काशीपुरींत विश्वेश्वर ॥ म्रियेंमाण[4] नरासी उपदेशी ॥ २१ ॥ तो राममंत्र उप-देशुनी ॥ मोक्ष देई शूलपाणी ॥ काशींत प्राणोत्क्रमणीं[5] ॥ शरीरज्वालागोनि[6] तारक

१ गाय मारणारा. २ दारू पिणारा. ३ यज्ञ. ४ मरणोन्मुख. ५ मरतांना. ६ जीवाला.

CC-O. Vasishtha Tripathi Collection. Digitized by Siddhanta eGangotri Gyaan Vidyabhandhi Book Centre, Mumbai.

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

मंत्र ॥ २२ ॥ उपदेशी श्रीभगवान ॥ एकवार केलें नामस्मरण ॥ कास घातली करावया गमन ॥ मोक्षसदना तयानें ॥ २३ ॥ ब्रह्म सगुण निर्गुण ॥ एकचि कृष्णरूप जाण ॥ तें नाम करितां उच्चारण ॥ पापें जळून सर्व जाती ॥ २४ ॥ कैसा तरी घडो नामोच्चार ॥ पडतां अडखळतां नर ॥ दंश होतां संतापतां फार ॥ नाम घेतां यातना सर्व चुकती ॥ २५ ॥ अज्ञानें अथवा ज्ञानें ॥ उत्तमश्लोकाचें नाम घेणें ॥ कर्पूरासी अग्नीप्रमाणें ॥ पापें भस्म होती क्षणांत तैसीं ॥ २६ ॥ हरिनाम तेंचि औषधरस ॥ मुक्त करी भवबंधास[२] ॥ कलीमाजी अन्य गति विशेष ॥ नाहीं नाहीं निश्चयें ॥ २७ ॥ महादेव महादेव महादेव ॥ ऐसें उच्चारी जो मानव ॥ त्यासी गोवत्सन्यायें[३] महादेव ॥ भोळा शंकर धांवोनि रक्षी ॥ २८ ॥ अगा उरगशत्रु तूं ऐसें करीं ॥ ऐसी ही नामावळी उच्चारीं ॥ तीं नामें कोणतीं म्हणसी तरी ॥ ऐक खगपति निवेदितों ॥ २९ ॥ राम कृष्ण शिव शंकर ॥

१ विष्णूचें. २ संसारसंबंधी बंधनास. ३ गाय जशी वासराचें हंबरणें ऐकल्यावर धांवते तसा.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

शंभु वासुदेव धरणीधर ॥ विष्णु माधव अच्युत मंत्र ॥ जनार्दना रक्षीं मातें ॥ ३० ॥ यज्ञ आणि सर्व तीर्थें ॥ यम-नियमादि व्रतें ॥ माझें नाम न उच्चारी त्यातें ॥ सर्वथा पावन न करिती ॥ ३१ ॥ यज्ञादि कर्में जो करिता ॥ आणि मन्नाम उच्चारिता ॥ तो स्वयें तरोनि तारिता ॥ पापी जनांसी पैं होई ॥ ३२ ॥ माझा मंगल नामोच्चार ॥ एकमनें करी सादर ॥ त्याचा योगक्षेम[2] संसार ॥ मी निर्धारें चालवीतसें ॥ ३३ ॥ रामनाम अग्नि जाण ॥ क्षणांत कर्मांचें करी दहन ॥ नामस्मरणें ब्रह्मस्वरूप होऊन ॥ माझ्या स्वरूपीं समरसे[3] ॥ ३४ ॥ गंगा गया रेवा गोमती ॥ यमुना तापी न उद्धरिती ॥ माझें नाम तैशिया पापाप्रती ॥ उद्धरी जाण खगेंद्रा ॥ ३५ ॥ तस्मात् सर्वकाळ माझें स्मरण ॥ सर्व कर्में करितां जाण ॥ करावें नियमेंकरून ॥ अपुत्रही तेणें तरती ॥ ३६ ॥ धर्म कर्म संध्या स्नान ॥ हीं सर्व परतंत्र जाण ॥ स्वतंत्र असे नामस्मरण ॥ ज्ञानें नाममहिमा जो ऐके ॥ ३७ ॥

१ इंद्रियें स्वाधीन ठेवणें. २ उपजीविका (निर्वाह). ३ एकत्व पावतो.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

तो पावे परम गती ॥ अर्थवादक नामासी दूषिती ॥ ते न पावतां मजप्रती ॥
नरकातिथि होती पैं ॥ ३८ ॥ सुरापी आणि ब्रह्मघातकासी ॥ मातृगामी सोनें
चोरी त्यासी ॥ प्रायश्चित्तें आहेत विशेषीं ॥ मद्बहिर्मुखासी प्रायश्चित्त नसे ॥ ३९ ॥
नाहीं अन्नासम दान ॥ न देव भ्तारासमान ॥ न मातेसमान तीर्थ पावन ॥
तैसा न धर्म नामासारिखा ॥ ४० ॥ अग्निहोत्रासम कर्म नसे ॥ सत्यासम न जप
विशेषें ॥ दयेहूनि श्रद्धा न दिसे ॥ ब्रह्मांडमंडपामाझारी ॥ ४१ ॥ क्रोधासमान
अन्य शत्रू ॥ कामासमान दोष फारू ॥ लोभासमान क्षयकरू ॥ दोष निर्धारू
असेना ॥ ४२ ॥ पतिव्रता पत्नीसमान ॥ अन्य सुहृद नसे जाण ॥ गुरूहूनि
अधिकपण ॥ कोण्या पदार्थीं नसेचि ॥ ४३ ॥ गुरु नसे मत्समान ॥ गुरु तो
आहवनीयाग्नि जाण ॥ गार्हपत्य पिता पावन ॥ दक्षिणाग्नि जननी जाणिजे
॥ ४४ ॥ जो नित्य या अग्नित्रयाची भक्ति करीत ॥ त्रेताग्नि तोचि निश्चित ॥

१ कर्ममार्गी. २ माझ्याविषयीं पराङ्मुख. ३ आस्तिकबुद्धी. ४ या नांवांचे अग्निहोत्रांतील तीन अग्नि.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

गुर्वादिकांचा जो अनादर करीत ॥ मिथ्या समस्त त्याचीं कर्में ॥ ४५ ॥ तो सर्वयज्ञमय मी जाण ॥ त्या माझें करितां नामस्मरण ॥ सर्वसंगपरित्याग करून ॥ मत्सायुज्यीं[1] मिळे तो ॥ ४६ ॥ ऐसें नामाचें महिमान ॥ स्वमुखें निवेदी श्रीभगवान ॥ हें श्रवण करोनि सदा मन ॥ नामस्मरणीं योजावें ॥ ४७ ॥ असो ऐका आणिक धर्म ॥ पतिव्रता स्त्रियांचा परम ॥ ब्रह्मा विष्णु महादेव उत्तम ॥ तीर्थ व्रत तप नीति अमी ॥ ४८ ॥ यज्ञ आणि इष्टापूर्त[2] ॥ भ्रतारासी जी संतोषवीत ॥ तिणें सर्व पुण्य केलें ऐसें होत ॥ संशयार्थ नसे येथें ॥ ४९ ॥ इतुकेही धर्म आचरोनी ॥ आणि जारकर्म करी निदानीं ॥ तें सर्व निष्फळ होउनी ॥ दारुण नरकीं ती पडे ॥ ५० ॥ स्त्रियेसी उत्तम सहगमन ॥ पुरुषासी तैसें संन्यसन ॥ हीं दोघें सर्व पापें जाळून ॥ शाश्वत ब्रह्म पावती ॥ ५१ ॥ अगा अनघा विनतासुता ॥ संन्यास दोन प्रकारचा आतां ॥ पुरातनींचा ऐकें ताता ॥ एकाग्रचित्तें

१ माझ्या स्वरूपीं. २ यज्ञ, देवालय व तलावादि. ३ निष्पापा.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

करोनियां ॥ ५२ ॥ विविदिषे आणि विद्वत्संन्यास ॥ मागुती चौंप्रकारचा विशेष ॥ वैराग्य उद्रेक कुटीचक सरस ॥ बहूदक हंस परमहंसनाम ॥ ५३ ॥ उत्तरोत्तर अधिकाधिक ॥ तयांची फलमुक्तिही तैशीच देख ॥ ब्राह्मणासी मात्र सम्यक ॥ संन्यासाधिकार जाणिजे ॥ ५४ ॥ अन्य जरी झाले विरक्त ॥ तरी त्यांसी अधिकार नरो किंचित ॥ मद्भजनें ते होती मुक्त ॥ लोकीं संगती टाकिलिया ॥ ५५ ॥ शीघ्र मुक्ति मद्भजनें ॥ तैसी नोहे अन्य साधनें ॥ संन्यास देतां आतुराकारणें ॥ प्रेषमात्र[2] विधि त्यासी ॥ ५६ ॥ मन होतां त्याचें एकाग्र ॥ त्रिवार वदतां मुक्ति पावे समग्र ॥ शरीरस्वस्थाचा विधिप्रकार ॥ सावधान ऐकें गरुडा ॥ ५७ ॥ शुक्लपक्ष उत्तरायण ॥ एकादश्यादि पंच दिन जाण ॥ सामिकासी दर्श पूर्णिमा दक्षिणायन ॥ देशकालादि संकीर्तन त्या दिनीं ॥ ५८ ॥ करोनि करावी गणेशपूजा ॥ पुण्याहवाचनांत पक्षिराजा ॥ करावें वृद्धिश्राद्ध[3] वोजा ॥ संन्यासदीक्षे-

१ तत्त्व-ज्ञानाची इच्छा ज्यास असते तो. २ मंत्राचा उच्चार. ३ नांदीश्राद्ध.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

लागुनी ॥ ५९ ॥ श्रौत स्मार्त लौकिकाग्नींत ॥ त्रय समिधा होमाव्या निश्चित ॥ त्याचे मंत्र द्विज जाणत ॥ उपस्थकक्षाविना श्मश्रु मुंडावे ॥ ६० ॥ सावित्रीप्रवेश विधिप्रकार ॥ करोनि आहवनीयाग्नींत निर्धार ॥ ब्रह्मोपवेशन करोनि सुंदर ॥ चतुर्गृहीताज्यें होम करावा ॥ ६१ ॥ उपोषण आणि जागरण ॥ होमासी करावें सज्जन ॥ उत्तरेकडे उपवेशन ॥ प्रातःकाळीं होम निवर्तावा ॥ ६२ ॥ प्राजापत्येष्टि करावी ॥ आहिताग्नीची हे विधि बरवी ॥ दर्शपौर्णमास स्वभावीं ॥ करावा चरु प्राजापत्य ॥ ६३ ॥ वेद द्यावा ऋत्विगादिकां ॥ ब्रह्म्यासी मधु कांस्य गौ ॥ दारुपात्रें अग्नीसी देखा ॥ यथाविधि अर्पावीं ॥ ६४ ॥ मृन्मय पात्रें जलांत ॥ कृष्णाजिन करावें दत्त ॥ विरंजाहोम आचरावा युक्त ॥ हा विधि नेमस्त साग्निकांचा ॥ ६५ ॥ जो साग्निक नसेल जाण ॥ त्यासी उक्त लौकिकाग्न ॥ पूर्णाहुति परम पावन ॥

१ अग्निहोत्र. २ विवाहांतील अग्नि. ३ गुह्यांग व कास्खेंतील सोडून. ४ चार वेळां घेतलेल्या तुपानें. ५ गाय. ६ याज्ञिकांचीं लांकडी भांडीं. ७ संन्याशाचा होम. ८ पत्नी मेल्यामुळें विच्छिन्नाग्नि.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

अन्य समान पूर्ववत ॥ ६६ ॥ विरजाहोम करोनि समाप्त ॥ गुरुपूजा करावी
शास्त्रोक्त ॥ शरण जावें तयाप्रत ॥ अभीष्ट तयासी अर्पावें ॥ ६७ ॥ ब्रह्मरूप घ्यावा
गुरू ॥ गुरूनें हा विधिप्रकारू ॥ उपदेश करावा समग्रू ॥ षोडश महावाक्यादि
॥ ६८ ॥ पंचीकरण विद्या समस्त ॥ संपूर्ण सांगावा प्रणवार्थ ॥ उदङ्मुख शिष्या-
प्रत ॥ प्राङ्मुख गुरूनें उपदेश कीजे ॥ ६९ ॥ ऊर्ध्व बाहू हरिस्मरण ॥ त्रिवार
उच्चार करोनि जाण ॥ पुढें सर्व विधिप्रमाण ॥ उच्च शब्दें बोलिजे ॥ ७० ॥ ऐसें
नम बोलोनी ॥ त्रिवार स्नानें अंजली तीनी ॥ सोडाव्या सर्व भूतीं अभय
म्हणोनी ॥ संप्रदायांनीं कीर्तन करावें ॥ ७१ ॥ एकाराम परिव्रजन[1] ॥ भिक्षार्थ
ग्राम आश्रयावा जाण ॥ अप्रमत्त भिक्षा सायान्ह[2] ॥ आशा सोडून करावी ॥ ७२ ॥
कौपीन घ्यावें समंत्र ॥ दंड वैणव[3] घ्यावा नंतर ॥ सरल असावा समग्र ॥ पेरें ज्या
सात तीन चार पैं ॥ ७३ ॥ संन्याशाचें पात्र एक ॥ मृत्तिका वेणू काष्ठ निष्टंक ॥

१ यात्रा करणें. २ संध्याकाळीं. ३ वेळूचा (बांबूचा).

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

पांढरा भोपळाही सम्यक ॥ उदक [1]गोमयें शुद्धि त्यांची ॥ ७४ ॥ इंद्रियें सर्व नेमावीं ॥ द्वेषरागादि सोडूनि द्यावीं ॥ सर्व भूतीं अभयवृत्ति असावी ॥ तेणें पदवी मोक्षाची पावे ॥ ७५ ॥ हृदयशुद्धी भिक्षुकें विशेष ॥ करावी तेणें ज्ञानास ॥ ज्ञान स्वतंत्र घडे वास ॥ सर्व उदास असावें सदा ॥ ७६ ॥ पहावें समान ब्रह्म सर्वत्र ॥ चिंतन करावें अहोरात्र ॥ मी ब्रह्म हा निर्धार ॥ ब्रह्म परमपद जाणावें ॥ ७७ ॥ अहं सर्व वासुदेव ॥ अहं सर्व असे शिव ॥ ऐसा अभ्यास अभिनव ॥ शिष्य कोणीं न करावे ॥ ७८ ॥ ग्रंथ न अभ्यासावे बहुत ॥ कोणाचें भक्ष्य न घ्यावें बहुत ॥ आपण अन्याचें [2]जीवित ॥ त्रस्त करूं नये खगेंद्रा ॥ ७९ ॥ गांवांत रहावें एक रात्र ॥ नगरांत रहावें पंच रात्र ॥ जोंवरी असे शरीर ॥ तोंवरी वास काशींत कीजे ॥ ८० ॥ विरह काशीचा साहूं नये ॥ मूलमंत्राचा जप रमणीय ॥ द्वादश सहस्र वैनतेय ॥ संन्यासियानें जपावा ॥ ८१ ॥ न करावें वेदपठन ॥ अर्थमात्र

१ शेणानें. २ प्राण.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

पहावा पावन ॥ शरीर हें असार संपूर्ण ॥ सारभूत चैतन्यासी जाणावें ॥ ८२ ॥
शारीरवक्त्या गुरूप्रती ॥ आश्रयीत जावें निश्चिती ॥ जरी क्षत्रिय वैश्य विरक्त
अती ॥ अध्यात्मगती जाणता ॥ ८३ ॥ त्याचा समागम करावा नरीं ॥ वेद जो
श्रवण न करी ॥ आणि वेदार्थ समजे अंतरीं ॥ [1]आत्मविज्ञान पावे तो ॥ ८४ ॥
शेखीं तो मुक्ति पावत ॥ हें साधन पूर्वजन्मार्जित ॥ यास्तव ह्या जन्मीं हें प्राप्त ॥
हो निश्चित खगेश्वरा ॥ ८५ ॥ ऐशी सर्वत्र प्रेतसंबंधी ॥ तुज कथिली आदि विधी ॥
शेवटीं जेणें परमावधी ॥ पुरुषार्थाची होतसे ॥ ८६ ॥ तेही केली निरूपण ॥ संन्यासी
मत्स्वरूपी जाण ॥ प्रेतकल्प जाहला संपूर्ण ॥ अनुक्रम येथून अवधारीं ॥ ८७ ॥
आदिशासी प्रायश्चित्तविधान ॥ हें प्रथम केलें निरूपण ॥ मग शवाहुतिविधान ॥
क्रिया अस्थिसंचयन अनंतर ॥ ८८ ॥ दशाह कृत्य जाहल्यावरी ॥ एकादशाचीं
कर्में सारीं ॥ द्वादशाहाचीं कर्में बरीं ॥ यानंतर बरा श्रवणविधी ॥ ८९ ॥ तैशीच

---

१ तत्त्वज्ञानाचा वेदांतमार्ग. २ स्वस्वरूपज्ञान.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

कथिली पाप्यांची गती ॥ पुण्यवानांची कथिली तुजप्रति ॥ दुर्मृत[1] जे प्राणी जगतीं ॥ कथिला त्यांप्रती नारायणबली ॥ ९० ॥ रजस्वला सूतिकाविधान ॥ गर्भिणीचें कर्म संपूर्ण ॥ तुज कथिलें प्रेतोपाख्यान ॥ कथिलें सहगमन[2] तदनंतर ॥ ९१ ॥ सदाचार आन्हिकाचार ॥ सांगितला तुज समग्र ॥ गोप्रदान अन्नदान समग्र ॥ माहात्म्यपूर्वक निवेदिलें ॥ ९२ ॥ साग्नि-निरग्नीचा[3][4] विधि समस्त ॥ तुज बोलिलों यथोचित ॥ संन्यासविधि कथिला समस्त ॥ जेणें मत्स्वरूप पाविजे ॥ ९३ ॥ श्लोक ॥ य इदं शृणुयात्तार्क्ष्य यः श्रावयति चादरात् ॥ तयोः पापानि सर्वाणि विनाशं यांति तत्क्षणात् ॥ १ ॥ श्रुते पुराणे पक्षींद्र वाचकं पूजयेत्ततः ॥ वस्त्राभरणदानाद्यैस्तत्संतोषं समाचरेत् ॥ २ ॥ संतुष्टे वाचके विप्रे सद्गतिं प्राप्नुयान्मृतः ॥ टीका ॥ अगा गरुडा हें पुराण ॥ जो भक्तीनें करील श्रवण ॥ अथवा

१ आत्महत्या करून अगर व्याघ्र, सर्प इत्यादिकांच्या दंशानें मेलेला किंवा फांशीं दिलेला.
२ सतीगमनाचा विधि. ३ अग्निसेवकांचा. ४ अग्निसेवा न करणारांचा.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

ऐकवील जाण ॥ आदरेंकरून सर्वांसीं ॥ ९४ ॥ त्या सर्वांचीं पापें समस्त ॥ तत्क्षणींच
विलया जात ॥ पुराण श्रवण होतां समाप्त ॥ पूजावा यथोचित पुराणिक ॥ ९५ ॥ वस्त्रा-
भरणें दानेंकरूनी ॥ संतोषवावा धन देउनी ॥ संतोष होतां पुराणिकालागुनी ॥ मृत
प्राणी सद्गती पावे ॥ ९६ ॥ ऐसें गरुडपुराणांतील ॥ प्रेतकल्पोपाख्यान सरळ ॥ टीका
केली धरोनि मूळ ॥ अर्थ विमळ विलोकुनी ॥ ९७ ॥ प्रथम अनंगार्क ग्रंथ ॥ केला
कामशास्त्र - उपयोगार्थ ॥ तें मनासी वाटे दुश्चित ॥ यास्तव प्रेतकल्प मग केला ॥ ९८ ॥
कोंकण देशामाजी ग्राम ॥ कळंबुशी नामें क्षेत्र परशुराम ॥ अंजनवेल तालुका
उत्तम ॥ तेथें वास्तव्य पूर्वापर ॥ ९९ ॥ परशुराम अष्ट कोशांवरी ॥ साक्षात् तो अव-
तारी ॥ बुरंबाड ग्रामामीतरी ॥ वास करी स्वलीलें ॥ १०० ॥ उपनाम तयाचें जोशी ॥
ब्राह्मणोत्तम महातापसी ॥ अंतरीं सद्भावें शरण त्यासी ॥ जावोनि ग्रंथासी आरं-
भिलें ॥ १ ॥ काय पामरें वर्णावें त्याचें महत्त्व ॥ साक्षात् शंकर तो निश्चित ॥ कळंबुशी
ग्रामीं बाण स्थापित ॥ केला निश्चित जनकृपें ॥ २ ॥ जनविश्वासास्तव तयांतूनी ॥

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

सिंहनाद करी शूळपाणी ॥ ऐशी त्या महाराजाची करणी ॥ रामचंद्र गुरु पैं माझा ॥३॥ माझा पितामह त्या कळंबुशींत ॥ वसे गोविंद नामें आनंदयुक्त ॥ तत्पुत्र विट्ठल विख्यात ॥ तद्देहाप्त तनू माझी ॥ ४ ॥ माझें नाम माधव ॥ पित्यानें ठेविलें अभिनव ॥ जनरूढींत वावाजी नांव ॥ विख्यात तेंचि जाहलें ॥ ५ ॥ त्या बाबाजीनें अल्पमतीनें ॥ प्रार्थिलें श्रीशंकराकारणें ॥ तयाचे कृपेनें प्राकृत वचनें ॥ ओंवीरूप बोलियेलों ॥ ६ ॥ श्लोक ॥ असंबद्धमसंबद्धं क्षंतव्यं तच्च पंडितैः ॥ शोधनीयमशुद्धं यद्दयाशीला हि साधवः ॥ १ ॥ टीका ॥ अशुद्ध अथवा शुद्ध अक्षर ॥ अर्थ सत्य मिथ्या प्रकार ॥ पंडितीं पाहोनि समग्र ॥ आद्यंत विलोकुनी ॥ ७ ॥ न्यून असेल तो करावा पूर्ण ॥ दयाशील साधुजन ॥ साधु परम कारुणिक म्हणोन ॥ माधव विनवी आदरें ॥ ८ ॥ बाळकाचे अपराध अपार ॥ परी माता मानी तिळभर ॥ तैसे साधुजन कृपाळू समग्र ॥ कृपा करोत मजवरी ॥ ९ ॥ त्या साधूंसी माझा नमस्कार ॥ कुळाचें उपनाम गडबोले सुंदर ॥ आणिक जाणा कौशिक गोत्र ॥ वास निरंतर कळंबुशी

CC-O. Mumukshu Bhawan Varanasi Collection. Digitized by eGangotri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

ग्रामीं ॥ ११० ॥ हा ग्रंथ मुंबईपुरांत ॥ यथामति केला प्राकृत ॥ कोठें कोठें श्लोक संस्कृत ॥ वेदार्थयुक्त सोडिले ॥ ११ ॥ असो दयापर साधुजन ॥ ते दया करितील परिपूर्ण ॥ हा ग्रंथ प्राकृत म्हणोन ॥ अनादर न करावा ॥१२॥ मुळींचा अर्थ पाहोनी ॥ तैशीच प्राकृत वदलों वाणी ॥ स्वबुद्धीं कल्पना करूनी ॥ आंत मिसळणी केली नाहीं ॥ १३ ॥ यास्तव संस्कृत आणि प्राकृत ॥ श्रोत्यांसी समान असत ॥ समान-फळ होईल प्राप्त ॥ श्रद्धायुक्त असल्यासी ॥ १४ ॥ स्वस्ति श्रीशालिवाहन ॥ शके सत्राशें एकावन ॥ मधुमास[1] धवलपक्ष[2] आद्यदिन[3] ॥ ग्रंथ संपूर्ण त्या दिनीं झाला ॥ १५ ॥ अष्टादशाध्याय ग्रंथ संपूर्ण ॥ बाराशें दहा ओव्या प्रमाण ॥ श्रीआम्नायेश्वरचरणीं मन ॥ निशिदिनीं राहो सर्वदा ॥ १६ ॥ मोरभट्ट नामें मम ज्येष्ठ भ्राता ॥ वाराणसी नामें मम माता ॥ विठ्ठल नामें मम पिता ॥ तयांसी नमन माझें असो ॥ ११७ ॥

❖ इति श्रीगरुडपुराणे प्रेतकल्पे गरुडनारायणसंवादे अष्टादशोऽध्यायः ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥ ❖

---

१ चैत्र महिना. २ शुक्लपक्ष. ३ प्रतिपदा. ४ वेदपुरुषाच्या पायांजवळ.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

॥ इति गरुडपुराणं समाप्तम् ॥

अनमोल प्रकाशन, पुणे - २

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

आवृत्ती : २००६

● प्रकाशक ●
मो. द. नांदुरकर
अनमोल प्रकाशन
६८३ बुधवार पेठ,
पुणे ४११ ००२

● मुद्रक ●
नरेंद्र मा. नांदुरकर
अनमोल पेपर कन्व्हर्टिंग प्रा. लि.
पोस्ट केळवडे, गट क्र. ५६२
ता. भोर, जिल्हा - पुणे.

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri

CC-O. In Public Domain. Digitized by eGangotri

हरिभक्तांसाठी उपयुक्त पुस्तके

पारायणासाठी सोयीस्कर

सचित्र व सटिप

।। श्री ज्ञानेश्वरी ।।

(प्रत्येक अध्यायाचा सारांश, ज्ञानदेव हरिपाठासह)

(१) श्री पंचरत्न हरिपाठ, (२) श्री ज्ञानदेव हरिपाठ, (३) संत मुक्ताबाईकृत ताटीचे अभंग,
(४) भज गोविंदा, (५) संत तुकारामाचे नित्यपाठाचे बारा अभंग, (६) संत ज्ञानेश्वरांच्या गोष्टी,
(७) संत तुकारामांच्या गोष्टी, (८) संत नामदेवाच्या गोष्टी, (९) संत एकनाथाच्या गोष्टी,
(१०) संत जनाबाई यांच्या गोष्टी, (११) संत सावळा माळी यांच्या गोष्टी, (१२) भागवतातील गोष्टी,
(१३) संत सेनामहाराज, (१४) संत नरहरी सोनार, (१५) संत कबीर (१६) श्री पांडुरंगाच्या गोष्टी,
(१७) अनमोल एकादशीच्या २६ गोष्टी आणि एकादशी माहात्म्य
(१८) मुक्ताई (मुक्ताईच्या जीवनावरील कादंबरी) ले. मृणालीनी जोशी

अनमोल प्रकाशन, ६८३, बुधवार पेठ, अप्पा बळवंत चौक, पुणे - २

Sri Vidyabharathi Book Centre, Sringeri